# गोमंतकीय मराठी संत साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास

## (Gomantakiy Marathi Sant Sahityacha Sanshodhanatmak Abhyas)

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION

**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**


अभ्यासक

**आदर्श रामनाथ नाईक**

हजेरी क्र. 22P0190001

ABC ID 328385370766

पी. आर 201912165

मार्गदर्शक

**डॉ. विनय मडगांवकर**

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा


गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 – 2024**

# GOMANTAKIY MARATHI SANT SAHITYACHA SANSHODHANATMAK ABHYAS

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**

**MA in Marathi**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

by


**Adarsh Ramnath Naik**

Seat No: 22P0190001

ABC ID: 328385370766

PRN: 201912165


Under the supervision of


**Dr. Vinay Madgaonkar**

(Assistant Professor)

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature


**Goa University**

**2023 – 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report titled, "'गोमंतकीय मराठी संत साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास'" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Dr. Vinay Madgaonkar and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

(Adarsh Ramnath Naik)

Seat no: 22P0190001

Date: 16/04/2024

Place: Goa University

## COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report "**गोमंतकीय मराठी संत साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास’**" is a bonafide work carried out by Mr. Adarsh Ramnath Naik under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of **Master of Arts** in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

Dr. Vinay Madgaonkar

Date: 16/04/2024

Signature of Dean of the School

School Stamp

GOA UNIVERSITY SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE TALEIGAON PLATEAU

Date:

Place: Goa University

# मनोगत

प्राचीन काळापासून भारताला संतपरंपरेचा सुबोध सुहास लाभलेला आहे. मराठी भाषेची उदर्गत व तिचा प्रचार, प्रसार करण्यामागे संत साहित्याचे मोठे योगदान असलेले दिसून येतो. आपल्या साहित्य वाङ्मयाने संतांनी भारताला पूर्ण करण्याचे एक अलौकिक कार्य केलेली आहे. भारतीय  संतांच्या अभंग रचना, पद रचना ग्रंथरचना इत्यादी विविध रचनांचा विविध आयामाने अभ्यास आजवर झालेला आहे. भारतीय संताच्या परिप्रेक्ष्यात गोमंतकीय संतांच्या वाङ्मयाचा त्यांच्या अभंग रचनांचा, पद रचनांचा, ग्रंथरचनांचा अभ्यास  काही प्रमाणात झालेला आहे आणि तो पुढे होणारही आहे याची खात्री आहे.

गोमंतकीय  मराठी संत साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास या विषयातर्गत मी गोमंतकतील पाच संतांची निवड केलेली आहे. संत सोहिरोबानाथ आंबिये, संत कृष्णभट्ट बांदकर, संत कवयित्री सोंसूबाई सावर्डेकर, संत पूर्णप्रकशानंदनाथ तथा नायकस्वामी व सद्गुरु जीवनमुक्त महाराज या पाच संतांचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये माझ्या क्षमतेनुसार मी केलेला आहे. 'गोमंतकीय संत साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास' अशा विषयांतर्गत वर उच्चारलेल्या गोमंतकीय संतांच्या साहित्याचा त्यांच्या पद रचनांचा, अभंग रचनांचा, ग्रंथरचनांचा इत्यादी त्यांच्या अलौकिक कार्याचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये केलेला आहे.

माझे मार्गदर्शक डॉ. विनय मडगावकर यांनी गोमंतकीय संत साहित्यावर आजवर विविध आयामानी अभ्यास करून या गोमंतभूमीला तिचे वैभव प्राप्त करून दिलेली आहे. मी माझ्या प्रस्तुत प्रबंधिकेतुन त्या अभ्यासाला आणखी सक्षम करण्याचा प्रयत्न केलेला आहे. असे मला वाटते. डॉ. विनय मडगावकर यांनी माझ्या प्रबंधिकेसाठी मला उपयुक्त पडणारी संत साहित्यावर अवलंबून असलेली विविध पुस्तके मला उपलब्ध करून दिली. प्रा विनय मडगावकर सरांनी संत साहित्यावर संशोधन व्हायला हवी या वाचून मला गोमंतकीय संतावर संशोधन करण्यास आव्हान केली आणि ती आव्हान मी स्वीकारले. सरांनी वेळेत वेळ काढूनही मला प्रबंधिकेसाठी उत्तम मार्गदर्श करून संत साहित्यामधील विविध संज्ञा संकल्पनाची तोंड ओळख ही करून दिली.

त्याचबरोबर प्रा. आशा मणगुतकर मॅडमचेही खूप सहाय्य लाभले जी पुस्तक मला मिळत नव्हती ती त्यांच्याकडे असल्यामुळे माझ्यावर विश्वास ठेवून त्यांनी ती पुस्तके घरी नेण्यासाठी मला दिली. त्याचबरोबर मंगेशी येथील संत नायकस्वामी यांचे वंशज श्री प्रमोद करंडे देसाई सरांनी नायकस्वामी बद्दल जी मौलीक स्वरूपाची माहिती मला उपलब्ध करून दिली त्याविषयी मी त्यांचे ऋण व्यक्त करतो आणि खूप धन्यवाद ही देतो कारण सहसा अशी माहिती पिढ्यानपिढ्या त्यांच्याकडून चालत आलेली आहे आणि ती त्यांनी योग्य प्रकारे मला कथन करून सांगितली काही एक शब्दही न वगळता यांनी सुबोध अशी लाभदायी माहिती मला उपलब्ध करून दिली. त्या वाचून त्यांचे मनःपूर्वक आभार माझ्या कुटुंबीयांचेही मी आभार व्यक्त करतो कारण काही अभ्यासकांना मिळण्यासाठी त्यांची मुलाखत घेण्यासाठी मला एका जागेवरून दुसऱ्या जागी जाण्यासाठी त्यांनी मला परवानगी दिली.

गोवा विद्यापीठात चे ग्रंथालय मला सर्वोत्तम फायद्यात पडले काही जुनी संत साहित्यावरील पुस्तके मला संशोधन करत असताना मिळत नव्हती ती पुस्तके आमच्या गोवा विद्यापीठातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी मला उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी त्यांचे ऋण व्यक्त करतो. तसेच पणजीतील कृष्णदास शामा हा ग्रंथालय सुद्धा फार उपयोगी पडला. तसेच कुडचडे येथील ग्रंथालयाचाही उपयोग  लाभला. श्री शांतादुर्गा प्रसन्न व श्री कामाक्षी प्रसन्न यांच्या आशीर्वादाने मी माझे संशोधन पूर्ण केले आहे.

# अनुक्रमणिका


| प्रकरण कृ. | विषय | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| Declaration | | |
| Completion certificate | | |
| मनोगत | | 1 - 2 |
| | प्रस्तावना | 1 - 5 |
| प्रकरण १ | गोमंतकीय मराठी संत साहित्याची परंपरा | 6 – 23 |
| प्रकरण २ | गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये यांचे जीवनचरित्र आणि साहित्यसंपदा | 24 – 60 |
| प्रकरण ३ | कृष्णभट्ट बांदकर यांची नाट्य व काव्यसंपदा यांचा विवेचक अभ्यास | 61 – 93 |
| प्रकरण ४ | गोमंतकीय संत कवयित्री सोंसूबाई सवर्डेकर यांच्या अभंगांचा अभ्यास | 94 – 113 |
| प्रकरण ५ | गोमंतकीय संत कवी पूर्णप्रकाशानंदनाथ तथा नायकस्वामी यांच्या झुलवे या काव्याचा विवेचक अभ्यास | 114 – 129 |
| प्रकरण ६ | सद्गुरू जीवनमुक्त महाराज यांच्या अभंगांचा परामर्श | 130 – 139 |
| प्रकरण ७ | समारोप | 140 – 143 |
| | निष्कर्ष | 143 – 146 |
| परिशिष्ट | | 147 – 150 |
| संदर्भ सूची | | 151 – 152 |

प्रास्ताविक ........................................ 7

१.२. 'संत' शब्दाची व्युत्पत्ती व व्याख्या ........................................ 9

१.२.१. संत : शब्दाचा अर्थ ........................................ 9

१.२.२. 'संत' शब्दाची व्याख्या ........................................ 12

१.३. भारतीय संतसाहित्य परंपरा ........................................ 13

१.४. देवभूमी गोमंतक ........................................ 16

१.४.१. गोवा - गोमंतक शब्दाची व्युत्पत्ती आणि अर्थ ........................................ 16

१.५. गोमंतकीय मराठी संतसाहित्य परंपरा ........................................ 17

१.६ समारोप ........................................ 20

१.७ निष्कर्ष ........................................ 20

१.८ संदर्भ सूची ........................................ 21

# प्रकरण पहिले

# गोमंतकीय मराठी संत साहित्याची परंपरा

## प्रास्ताविक

मराठी साहित्यविश्वात प्रचलित असलेली संत साहित्याची पकड आजही अखंडीतपणे टिकून राहिलेली आहे. भक्ती, अध्यात्म आणि तत्त्वज्ञान या तिघांचा त्रिवेणी संगम संत साहित्यामध्ये प्रकर्षाने आढळतो. प्राचीनत्वाचा विचार करत असताना संत साहित्याचा विचार प्रामुख्याने करावा लागतो. कारण संत हे एक प्रकारे 'सतपुरुष' असल्याचे आपण मानतो. संतांनी आपल्या अभंग वाणीतून किंवा साहित्यातून सदैव ईश्वर भक्तीचा, परमार्थाचा आणि जनहितांचाच पुरस्कार केलेला दिसतो. समाजातील माणसांना परमार्थाच्या मार्गावर घेऊन जाण्यासाठीची त्यांची तळमळ दिसून येते. संत हे आजच्या अर्वाचीन कालखंडात नसले तरीसुद्धा त्यांची साहित्य संपदा, अभंगवाणी इत्यादींच्या माध्यमातून ते आपल्याबरोबरच आपल्या मंगल कार्यात उभे असल्याची जाणीव आजही होते. संत साहित्याचे वाचन केल्यास मानवी मनाला चैतन्य मिळते, मानवी जीवनावर संस्काराचा धन वर्षाव होतो, शारीरिक मानसिक व बौद्धिक क्षमतेला नवी चेतना मिळते. त्यामुळे संत साहित्य हे एक प्रकारे 'संस्कार धन'च आहे. असेच म्हणावे लागेल. अशा या सर्वगुणसंपन्न साहित्याचे वाचन आधुनिक काळातही होणे गरजेचे आहे.

संतांचे आचार, विचार, जीवन, चरित्र या सर्वांचे प्रतिबिंब सहजपणे त्यांच्या साहित्यातून प्रकट झालेले दिसून येते. संतांना ईश्वर भक्तीची, देवप्राप्तीची अनन्य आस असते. संतांना आपल्या आराध्य दैवतेशी भेट होत नाही. यासाठीची त्यांची तळमळ दिसून येते. आपल्या आराध्य दैवतेची स्तुती करण्याकरीता संतांनी वापरलेले साधन म्हणजे 'अभंग', 'ओवी' वा 'भक्तीगीत' होय. ईश्वराला प्राप्त करण्यासाठी, आत्मा परमात्म्याशी एकरूप होण्यासाठी त्यांनी या भक्ती काव्याचा आधार घेतलेला दिसतो. ही भक्ती केवळ ईश्वर

प्राप्तीपूर्तीच मर्यादित नसते, तर समाजातल्या लोकांना उद्बोधन, मार्गदर्शन करण्यासाठी आणि परमार्थाच्या मार्गावर नेण्यासाठी संत मंडळींनी अभंग रचना केलेली दिसते.

ऐतिहासिक काळापासून चालत आलेली ही संत साहित्याची परंपरा मराठी भाषेने आणि मराठी साहित्याने आजही जपून ठेवलेली आहे. प्राचीन मराठी साहित्याचा विचार करत असताना संत,पंत, तंत अशा तीन आयामांचा विचार प्रामुख्याने करावा लागतो. या तीनही आयामात महत्त्वाचा आणि भक्ती भावाने श्रेष्ठ – कनिष्ठ सर्वसामान्य जनांना आपल्यात सामावून घेणारा मध्यवर्ती आयाम म्हणजे ‘संत साहित्याचा आयाम’ या आयामात जे साहित्य निर्माण झाले त्याला ‘संत साहित्य’ म्हणजे ‘संतांनी निर्माण केलेले साहित्य’ असे म्हटले जाते.

संत साहित्याची परंपरा ही खूपच जुनी आहे. आपल्या पंथाचा प्रसार, प्रचार आणि संचार करण्यासाठी संतांनी ‘द्वैत, अद्वैत, भक्ती, तत्त्वज्ञान, अध्यात्म, परमार्थ’ या तत्त्वांचा पुरस्कार केलेला दिसून येतो. संत साहित्याच्या परंपरेमुळे पंडिती व शाहिरी परंपरांना लोकप्रसिद्धी प्राप्त झालेली आहे. आजवर कधीही काव्याच्या क्षेत्रात काही नवे वळण आणायचे झाले तर सर्वप्रथम संत साहित्याला स्पर्श केल्याखेरी काव्यात ते बदल / वळण आणणे शक्य नाही. कारण एका परीने अस्सल मराठीपणाशी या संत साहित्य तथा संत काव्याचे नाते इतके घनिष्ठ आहे की त्यांना वेगळे करतातच येत नाही असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही.

आजच्या या परिवर्तनशील आणि तंत्रज्ञानाच्या युगात विविध संज्ञा, संकल्पना आणि वेगवेगळे विषय रुढ झालेले आहेत. पैसा, नोकरी आणि जीवनात मिळणाऱ्या सुखाचा उपभोग घेण्यासाठी माणूस कुठेतरी संतसाहित्य आणि इतर ऐतिहासिक गोष्टींना विसरत चाललेला आहे. आधुनिकीकरणात उत्पन्न होणाऱ्या या वस्तूंच्या मागे पळणारा माणूस स्वतः आपल्या आयुष्यमान असलेल्या जीवनाची नाशाडी करून घेतो आणि स्वतःला अधोगतीच्या मार्गावर नेतो. आजचे इंटरनेटचे युग हे इतके प्रभावशाली आहे की माणसे नको त्या गोष्टीकडे खेचली जातात. संतसाहित्य हे माणसाला सतमार्गावर नेणारा आणि चांगल्या संस्काराची शिकवण देणारा तो एक मंगलमय झरा आहे; या मंगलमय झऱ्याचे तीर्थोदकाचे सेवन केल्यास माणसाला

स्वतःच्या जीवनाचा सूर नक्कीच सापडेल. संतसाहित्याने भारतीय संस्कृतीची आणि मराठी भाषेची उभारणी केलेली आहे. त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतीने आणि मराठी भाषेने संतसाहित्याला आपल्यात सामावून घेतले आहे. त्यामुळे संपूर्ण मानवजातीला संत साहित्याचा सहवास लाभलेला आहे.

## १.२. 'संत' शब्दाची व्युत्पत्ती व व्याख्या

'संत' हा शब्द 'सत्' या संस्कृत धातूपासून प्रकट झाल्याचे सहज लक्षात येते. 'संत' हा शब्द मराठीत एकवचनी म्हणून वापरण्यात येतो. मात्र मूळ संस्कृतमधील 'सन्' या शब्दाचे ते बहुवचनी रूप आहे. अस् ( होणे ) या धातूपासून 'सन्' हे रूप तयार झाले. 'होणारा' किंवा 'असणारा' असा त्याचा वाच्यार्थ आहे. त्यामुळे 'संत' हा शब्द अस्तित्वदर्शक आहे. जी 'सदैव एकरस' व 'अविकृत रूपात आढळते', तशी वस्तू किंवा 'सत्य' या अर्थी 'सत्' याचा उल्लेख केलेला आढळतो. 'सत्' या शब्दाचा उलगडा करत असताना 'नरहर रघुनाथ फाटक' लिहितात, ''योगवासिष्ठात जीवनमुक्त, साधु, पंडित, शिष्ट, प्राज्ञ, वृद्ध अशा अनेक वेगवेगळया शब्दांनी संतांची वर्णने आलेली आहेत. महाभारतातही यातले बरेच शब्द संतवाचक अर्थाने सापडतात. त्यातल्या एका वर्णनाने हा विषय स्पष्ट होण्याला हरकत नाही''[१] ''महाभारतामध्ये 'संत' (चांगल्या वर्तनाचे पुरुष) शब्दाचा उपयोग पुष्कळ प्रसंगी केलेला आहे.''[२] '' 'संत' या शब्दाचा असा एक विशिष्टार्थ कोणता ? 'संत' हा शब्द जवळ जवळ विठ्ठल संप्रदायातील पारिभाषिक शब्द बनला आहे''[३] अशी ग्वाही रा. द. रानडे यांनी दिलेली आहे.

### १.२.१. संत : शब्दाचा अर्थ

'संत' म्हणजे 'साक्षात्कारी, परोपकारी, सज्जन, उदार, दयाळू, सदाचारी, सत्कर्मरत, निरपेक्ष, सत्पुरुष, निष्पाप, शुद्धात्मा, श्रद्धायुक्त, जितेंद्रिय इत्यादी गुणांनी परिपूर्ण असलेल्या व्यक्तीला आपण 'संत' म्हणतो. संत हे ईश्वरभक्तीत रमून गेलेले आणि समाजातल्या लोकांना मार्गदर्शन, कल्याणाकरिता या

भूतलावर अवतरलेल्या विभूती आहे. 'संत' कोणाला म्हणावे? असा एक बलदंड देहाचा प्रश्न उद्भवतो. या विषयी संत तुकाराम आपल्या अभंगात म्हणतात.

**हिरा ठेवितां ऐरणीं,**

**वांचे मारितां जो घणीं.**

**तोचि मोल पावे खरा,**

**करणीचा होय चुरा.**

**मोहरा होय तोची अंगे,**

**सूत न जळे ज्याचें संगें**

**तुका म्हणे तोचि संत,**

**सोसी जगाचे आघात** [४] ( संत तुकाराम )

घणाचे घाव सहन करता हिरा भंग पावत नाही. त्याचप्रमाणे लोकनिंदेचे घाव, आघात जो सहन करतो तोच खरा संत होय. असे संत तुकाराम आपल्या अभंगातून खऱ्या संतांची ओळख करून देतात.

संतांचे चरित्र हे गंगेप्रमाणे पवित्र, निखळ असते. कोणत्याही दुःखात, संकटात असलो तरी सुद्धा संत हे आनंदाने, शांतपणे हसत - खेळत त्या दुःखातून स्वतःही आणि इतरांनाही उभरतात. हेच खऱ्या संताचे लक्षण होय. 'संत हा निर्वैर, निष्काम, ईश्वरभक्त व विषयविरक्त असावा'. 'जो सांसारिक संबंधातील ममतेचे धागे तोडून टाकतो. त्या धाग्यांची दोरी तयार करून ती प्रभुचरणी बांधतो; आणि समदर्शी बनून कोणतीही वासना शिल्लक ठेवत नाही. त्याला संत म्हणावे. असे तुलसीदासांनी 'रामचरितमानस' या काव्याच्या सुंदरकांडात म्हटले आहे' [५]

संत हे आकाशाप्रमाणे परिपूर्ण असतात. त्यांचा स्वभाव दुधाच्या लोणीप्रमाणे मऊ आणि अमृताप्रमाणे गोड असतो. लोभ, मोह, माया, क्रोध, मत्सर इत्यादी षडरिपुंना जवळ न करणारे संतांचे चरित्र

अंतर्बाह्य शुद्ध असते. या संदर्भात विचार करत असताना संत मुक्ताबाईंनी लोकांवर रागावलेल्या ज्ञानदेवाची समजूत घालण्यासाठी रचलेले ताटीचे अभंग या नावाने प्रसिद्ध झालेली अभंग रचना संत या शब्दांचे अर्थ व महात्म्य दर्शविणारी आहे. उदाहरणार्थ :

**योगी पावन मनाचा | साही अपराधी जनाचा |**

**विश्वरागे झाले वन्हि | संती सुखे व्हावे पाणी ||**

किंवा

**इह परलोकी सुखी | शुद्ध ज्ञान ज्यांचे मुखी |**

**मिथ्या कल्पना मागे सारा | ताटी उघडा ज्ञानेश्वरा ||**

'सार्थ दासबोध' या ग्रंथात समर्थ रामदासांनी 'संत' या शब्दाचा उत्तम अर्थ सांगितलेला आहे उदाहरणार्थ :

**संत आनंदाचें स्थळ | संत सुखाचि केवळ |**

**नाना संतोषाचें मूळ | ते हे संत ||**

**संत मोक्षाची विश्रांती | संत तृप्तीची निजतृप्ती |**

**नांतरी भक्तीची फळश्रुती | ते हे संत ||** [६] ( संत रामदास स्वामी )

अशा गोड आणि पवित्र शब्दात समर्थ रामदासांनी संत कोणाला म्हणावे ? यासंदर्भात दासबोध या ग्रंथातून उत्तम प्रकारे लोकांना मार्गदर्शन केलेले आहे.

**गुजरातचे प्रसिद्ध संत 'नरसी मेहता' म्हणतात**

**वैष्णव जन तो तेने कहिये | पीड परायी जाने रे ||**

**पर दुःखे उपकार करे तो ये | मन अभिमान न आणे रे ||**

गुजरातचे संत नारसी मेहता म्हणतात जे कोण दु:खी आहे, कष्टी आहे त्यांच्यावर उपकार करावा त्यांची मदत करावी पण मनामध्ये कधीही अभिमान आणूनये

### १.२.२. 'संत' शब्दाची व्याख्या

'संत' हे परोपकारी, दयाळू, सदाचारी, साक्षात्कारी याच शब्दांनी 'संत' या शब्दाचा 'अर्थ' आणि 'संतांची लक्षणे' ओळखता येतील. संत या शब्दाची व्याख्या अभ्यासकांनी पुढील प्रमाणे मांडलेली आहेत.

**१. प्रा. विनय मडगांवकर**

"ज्यांनी स्वतः भगवतभक्ति केली. समाजात राहून प्रसंगी दुःख सहन करून समाजाचे हितचिंतन - मार्गदर्शन केले. उत्तम जीवनमूल्यांची जोपासना करत जनता जनार्दनाशी सख्य साधत स्वतः बरोबर इतरांचाही उद्धार करण्यास जे तत्पर राहिले ते संत होय".[७]

**२. गुरुदेव रा. द. रानडे**

"महाराष्ट्रात संत या शब्दाचा एक विशिष्ट अर्थ आहे. जो भक्त वारकरी पंथाचा प्रचारक असतो आणि आपली साधना निर्गुण भक्तीने करतो त्याला संत म्हटले जाते".[८]

## १.३. भारतीय संतसाहित्य परंपरा

भारत हा बहुभाषिक आणि विविध धार्मिक क्षेत्राने नटलेला असा हा देश आहे. अशा या भूप्रदेशात प्राचीन काळापासून चालत आलेली साधु, संत, महंतांची परंपरा आणि ती परंपरा आपल्या साहित्यातून मांडणारे संत हे आपल्या साहित्यातून आजही सजीवत्वच आहे. संत तुकाराम महाराजांच्या साहित्य लेखनातील वचनानुसार **'जे का रंजलें गांजलें, त्यासि म्हणे जो आपुले. तो चि साधु ओळखावा'** अशा विचाराने साधु - संतांचे महात्म्य सांगणारी संत साहित्याची परंपरा महाराष्ट्राला लाभली तशीच संत साहित्याची परंपरा भारताच्या इतर प्रांत प्रदेशांनाही लाभलेली दिसून येते. संत साहित्याची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. भारतात संतांची परंपरा कोणत्या काळात, कोणत्या वेळी किंवा भारताच्या कोणत्या देशात सर्वप्रथम उदयास आली याचा नेमका कालखंड निश्चित पणे सांगता येत नाही. 'दक्षिण भारतात इ.स. पूर्व पहिल्या किंवा दुसऱ्या शतकात 'तमिळ संत तिरुवल्लूवर' होऊन गेले. त्यांचा नीतिविषयक सुभाषितांचा ग्रंथ म्हणजे 'तिरूक्कुरल' हा ग्रंथ सर्व तमिळ ग्रंथामध्ये प्राचीन असावा असे मत अभ्यासक सांगतात.

आद्य गुरु शंकराचार्य हे सुद्धा तमिळ प्रदेशातले संत गुरु होऊन गेले. इ.स. च्या चौथ्या ते आठव्या शतकात तमिळ प्रांतात संत निर्माण झाले. त्यांनी भक्तीला मुक्तीचे साधन मानले. 'शैव संप्रदाय' या संप्रदायाला ( नायन्मार ) असे तमिळ भाषेत म्हणतात. या संप्रदायात विशेषता ६३ संतांचा समावेश असल्याचे सांगण्यात येते, तर ( आळवार ) हा संप्रदाय इ.स. च्या ५०० ते ८५० या कालखंडात उदयास आल्याचे सांगण्यात येते. 'आळवार' हा 'वैष्णव संतांचा संप्रदाय' होय. या संप्रदायात १२ संतांची संख्या होती; असे सांगण्यात येते. दक्षिण भारतात वसलेल्या प्रख्यात अशा तमिळनाडूतील 'वैष्णव संत स्त्री' म्हणजे संत 'अंडाळ' या आळवार वैष्णव संप्रदायातील होत्या.' [९]

मध्ययुगीन संतांचा विचार करत असताना कर्नाटकामध्ये बाराव्या शतकातील साधारणत: '११३२ ते ११६७' हा कालखंड प्रामुख्याने महात्मा 'संत बसवेश्वरांचा' कालखंड म्हणून बघता येतो. "महात्मा बसवेश्वर हे समतावाद आणि मानवतावादाचे कट्टर समर्थक होते. प्रत्येक मानवाचा 'माणूस' म्हणून सदोदित गौरव झाला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती".[१०]

भारतात वेगवेगळ्या प्रांत प्रदेशातून संत निर्माण झाले. त्या संतांनी आपल्या भक्तीच्या आणि बुद्धीच्या जोरावर शुद्ध, निर्मळ, सुगम, उद्बोधन करणारी, फलश्रुती देणारी, अशी चिरकाल टिकणारी ग्रंथरचना केली. आध्यात्मिक, तत्त्वज्ञान व भक्ती या तत्त्वांबरोबर त्यांनी समाज प्रबोधन, अंधश्रद्धा निर्मूलन या सामाजिक घटकांनाही स्पर्श केलेला दिसून येतो. उत्तर भारतातील 'संत कबीर' किंवा 'महात्मा कबीर' असेही त्यांना म्हटले जाते. माणसाला माणुसकीची व्याख्या सांगणारे, सतमार्गावर घेऊन जाणारे आणि माणसाला स्वतःचे जीवन कसे जगायचे आणि इतरांनाही कसे जगू द्यायचे याचे पक्के उदाहरण म्हणजे 'संत कबीर'चे दोहे  सौ. पद्मा देशपांडे लिहितात "संत कबीर हे एक अक्खड संत होते. त्यांनी कधीही कोणाची पर्वा केली नाही. भारतीय सहिष्णुता आणि समन्वयाचे ते उत्तम उदाहरण होते".[११]

**"ऐसी बानी बोलिये मन का आपा खोय.**

**ओरों को सीतल करे, आपहुं सीतल होय |"**

वर नोंदवलेला संत कबीरांचा प्रसिद्ध दोहा आहे. त्यांचे वागणे, आचार, विचार, जीवन, चरित्रही असेच होते.

उत्तर भारतात होऊन गेलेले 'गोस्वामी तुलसीदास', 'गुरुनानक देव' ( हे शिखांचे आद्य गुरु चौदाव्या शतकातील थोर शिख  गुरु होते ), 'गुरु गोविंदसिंह' यांनी परकीय सत्तेच्या आक्रमणानंतरही पंजाबला भारतात जोडून ठेवण्याचे कार्य केले. माणसालाही आत्मभान आणण्याचे सामाजिक कार्य गुरु गोविंदसिंहांनी केले. डॉ. मो. दी. पराडकर याविषयी लिहितात की "गुरु गोविंदसिंहांनी नैतिकतेचे सामर्थ्य जातींची बंधने तोडून टाकण्याच्या समतेच्या मंत्राच्या जोरावर निर्माण केले. सर्वांच्या मनात आपण एकच पंथातले, ईश्वराचे सेवक आहोत असा भाव निर्माण केला. खालसाच्या प्रत्येक सदस्याला समानतेच्या सूत्रात गोवून टाकले".[१२]

आसाम मधील संत शंकरदेव, गुजरातचे संत नरसी मेहता, राजस्थानची संत कवयित्री मीरा तसेच दक्षिण भारतातील संत पुरंदरदास, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज तसेच महाराष्ट्रातील ११ व्या शतकात उदयास आलेला नाथ संप्रदाय होय शैव उपासक नाथ संप्रदाय समाजात आपले सातत्याने कार्य करत होता या पंथाचे कर्ताधर्ता गोरक्षनाथ मत्स्यंद्रनाथ होय याच संप्रदायातील कवी ग्रंथकार म्हणजे मुकुंदराज यांनी 'विवेकसिंधू' हा ग्रंथ रचला. मुकुंदराजानंतर आणि ज्ञानेश्वराच्या काही काळ अगोदर महाराष्ट्रात 'महानुभाव संप्रदाय' उदयास आला. मोठ्या तेजाने युक्त असलेल्या लोकांचा मार्ग तो परमार्थ किंवा महानुभाव पंथ असे म्हटले जाते. या पंथाचे मूळ पुरुष गोविंद प्रभू उर्फ गुंडम राऊळ  होते, पण या पंथाचे प्रणेते मात्र श्री चक्रधर स्वामी होते. याच पंथात मराठीतील आद्य कवयित्री म्हणून महदंबा हिचा विशेष करून उल्लेख करावा लागतो याच पद्धतीने मराठीतला आद्य चरित्रात्मक ग्रंथरचना 'लीळाचरित्र' हा या पंथाचा मूळ ग्रंथ होय. श्री चक्रधर स्वामी यांच्या लीळा (आठवणी) यांचे संकलन करून म्हाइंभट्टाने रचलेला हा ग्रंथ होय. याच पंथामध्ये रचलेले साती ग्रंथ ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात यादवांची राजवट होती. या कालखंडात भागवत संप्रदायाचा झेंडा फडकविणारी संत मंडळी उदयास आली. भागवत संप्रदायाला वारकरी संप्रदाय, भक्ती संप्रदाय, माळकरी पंथ असेही संबोधले जाते. वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत म्हणजे 'विठ्ठल', 'विठोबा', 'पंढरीचा पांडुरंग' होय. सर्वसामान्य जनता जनार्दनांना श्रेष्ठ, कनिष्ठ वर्गातल्या लोकांना आपल्यात सामावून घेणारा असा हा लोकप्रिय वारकरी संप्रदाय आहे. या  संप्रदायांमध्ये संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर, संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव, संत मुक्ताबाई, संत सोयराबाई, संत चोखामेळा, संत निळोबा, संत नरहरी सोनार, संत सावता माळी, संत एकनाथ, संत ज्ञानदेव, संत कान्होपात्रा, संत सेना नाव्ही, संत गोरा कुंभार , संत तुकाराम, संत जनाबाई, संत बहिणाबाई इत्यादी संत या संप्रदायात होऊन गेले. या संतांनी विठ्ठल भक्ती करण्याची एक कसरही सोडलेली नाही. त्यानंतर महाराष्ट्रामध्ये दत्त संप्रदाय आणि रामदास संप्रदाय उदयास आले या संप्रदायाच्या साहित्य व्यवहार आणि ग्रंथरचनेने भारतभूमी पुण्यवान झाली. वरील उच्चारलेल्या भारतीय संतांचा आणि त्यांच्या साहित्य विषयाचा विविध आयामानी आणि विविध क्षेत्रातही बहुसंख्येने अभ्यास झालेला आहे आणि पुढे होणारही आहे. या व्यतिरीक्त गोमंतकीय संतांचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

## १.४. देवभूमी गोमंतक

'गोमंतक' हा महाराष्ट्र राज्याच्या जवळचा असा हा भूप्रदेश आहे. लहान असला तरीही त्याची कीर्ती मोठी आहे. मराठी भाषेचे वैभव आणि साहित्याचा वारसा घेऊन पुढे जाणारा हा प्रदेश आहे. पोर्तुगीज सत्तेच्या आक्रमणानंतरही त्यांनी मराठी साहित्याची परंपरा आणि गोमंतकीय संस्कृतीची अस्मिता पुढे नेण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. गोमंतक हा महाराष्ट्र प्रदेशच्या जवळचा भाग असल्याने भक्ती, अध्यात्म आणि तत्त्वज्ञान या परमार्थाच्या तत्त्वांना स्पर्श केल्याखेरीज त्याला राहता आले नाही; म्हणून विठ्ठल भक्ती आणि गोमंतकात अखंडपणे टिकून राहिलेली देवळां राऊळांच्या इतिहासाची कथा सांगणारा आणि आपल्याबरोबर आपली म्हणून काही वैशिष्ट्ये घेऊन येणारा असा हा 'गोमंतक' आहे.

### १.४.१. गोवा - गोमंतक शब्दाची व्युत्पत्ती आणि अर्थ

अति प्राचीन काळापासून भारत हा भूप्रदेश अस्तित्वात होता त्याचप्रमाणे भारताचाच एक अंग म्हणून 'गोमंतक' या प्रदेशाकडे बघता येते. प्राचीन काळापासून गोमंतकाचा निर्देश 'गोवा' किंवा 'गोवे' असाही केल्याचे आढळते किंवा गोमंत या शब्दापासूनच गोवा हा शब्द व्युत्पन्न झाला असावा असा अभ्यासाकांकडून उल्लेख सापडतो. प्राचीन काळातील गोमंतकाची व्याप्ती ही उत्तरेकडील कुडाळपासून दक्षिणेकडील सदाशिव गडापर्यंत विस्तृत झालेली होती. आताचा गोवा किंवा गोमंत म्हणजे पूर्वी सह्याद्री पश्चिमेस अरबी समुद्र उत्तरेस तेरेखोलची खाडी आणि दक्षिणेस बसलेला कारवार जिल्हा या भौगोलिक सीमांनी व्यापलेला गोमंतक म्हणजेच गोवा. श्री.ज.स सुखठणकर यांनी आपल्या 'गोमंतकाचा संक्षिप्त इतिहास' या अत्यंत माहितीपूर्ण लेखात म्हटल्याप्रमाणे "आजच्या लघु गोमंतकाचा इतिहास म्हणजे फक्त पोर्तुगीज आमदानीपासूनचा इतिहास, आणि त्यापूर्वीचा इतिहास म्हणजे एक विस्तृत प्रदेशाचा इतिहास हे

लक्षात ठेवले पाहिजे"[१३] 'डॉ.रा.शं.वाळिंबे' 'महाभारत मराठी अनुवाद खंड चौथा' या ग्रंथाच्या 'भीष्मपर्व' या प्रकरणात 'गोवा - गोमंतकाचा' उल्लेख "गोमंत, गोपराष्ट्र म्हणून सापडतो"[१४]

१८ व्या शतकातले रघुनाथ शेणवी यांचे 'कोकणाख्यान' हे काव्य फारच प्रसिद्ध आहे या कोकणाख्यान काव्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन विभाग आहेत कोकणाख्यानाच्या दुसऱ्यात अध्यायात गोमंतकाचा संदर्भ सापडतो. गोमंतकाला 'गोमांचळ' असे म्हणणारे रघुनाथ शेणवींनी 'गोमांचळ देशाचें कथन' या नावाचे काव्य लिहिले आहे ते असे.

**गोमांचळ देशाचें कथन || करुनी विवरण सांगेन ||**

**हा देश असे कोंकण || त्याचे प्रमाण ऐका गा ||५||**

**गोमांचळ दक्षिणभागा || अष्ट्योजनावरी गंगा ||**

**दुसरी अष्ट योजना पैं गा || उत्तरभागीं असे तीं ||६||** [१५]

## १.५. गोमंतकीय मराठी संतसाहित्य परंपरा

'अमृतातेही पैज जिंकणारा' हा मराठीचा स्फुर्तीमंत्र किंवा मराठी भाषेचे महात्म्य दर्शविणारा मूलमंत्र जेव्हापासून महाराष्ट्राच्या मराठी मातीत रुजला तेव्हापासून मराठी संत साहित्याची परंपरा गोमंतकातही सुरू झालेली दिसून येते. गोमंतकीय मराठी संतांची किंवा साहित्याची परंपरा या विषयी विचार करत असताना आधुनिक काळात जशा राज्य किंवा राष्ट्र यांच्या भौगोलिक सिमारेषा आहेत; तशा सिमारेषा प्राचिनकाळात नव्हत्या. आजच्या तंत्रज्ञानाच्यामाध्यमातून वा संशोधनाच्यामाध्यमातून भारतामध्ये अस्तित्वात असलेल्या प्रांत प्रदेशांचे नकाशे दाखविणाऱ्या सीमारेषा हळूहळू आकारास आल्या.

पूर्वी गोमंतकाचा उत्तरेचा अर्धा भाग महाराष्ट्रात पडत होता आणि दक्षिणेकडचा अर्धा भाग कर्नाटक राज्यात झुकत होता. या दोन्ही भागांचे साक्ष देणारे पूर्वी गोमंतकावर आपले राज्य स्थापित करणाऱ्या राजवटी होय. त्यात राष्ट्रकूट, भोज, सातवाहन, मौर्य, चालुक्य, बदामीचे आदिलशाही, देवगिरीचे यादव यांची सत्ता गोमांतकावर होती. या राजवटीने गोमंतकावरही राज्य केले याची साक्ष देणारे म्हणजे या राजवटींनी विविध प्रकारच्या लिपी भाषेत निर्माण केलेले शिलालेख, कोरीवलेख, ताम्रपट इत्यादी साधने आजही गोमंतकात आपले अस्तित्व दर्शवीत आहे.

'गोमंतकीय संत साहित्याची परंपरा या विषयी विचार करत असताना सर्व प्रथम डोळ्यासमोर नाव येते ते म्हणजे पंधराव्या शतकातील 'कृष्णदास शामा' म्हणजेच 'शामराज' यांनी श्रीकृष्णकथांचे वर्णन करणारा 'श्रीकृष्णाचरित्रकथा' हा ग्रंथ शके १४४८ म्हणजे इ. स. १५२६ मध्ये रचलेला हाच तो आद्य गोमंतकीय ज्ञात कवी, ग्रंथकार आणि हाच तो आद्य गोमंतकीय ग्रंथ होय. 'श्रीकृष्णाचरित्रकथा' हा ग्रंथ ओवीछंदात असून या ग्रंथात एकूण '३१३५ ओव्या' व '१९ अवस्वरू' आहेत. भगवतातील दशम स्कंधातील '४५ अध्याय' यांनी आपल्या कथेसाठी निवडला. कृष्णदास शामा पासून सुरू झालेली ही ग्रंथ निरूपणाची परंपरा पुढे गोमंतकीय कवींनी आणि संतांनी आपल्या साहित्य लेखनातून पुढे सरसावली आहे.' [१६]

'श्रेष्ठ संतांची नावे धारण करणारे १७ व्या शतकातील गोमंतकीय दोन कवी म्हणजे 'ज्ञानदेव' व 'निवृत्ती' हे होय. ज्ञानदेवांच्या नावावर 'योगवसिष्ठ' व ' द्रोणपर्व' हे दोन ग्रंथ आहे. तसेच महाभारतातील काही कथा, काही स्फुट प्रकरणेही त्यांच्या नावावर आहे. निवृत्तीदेव यांनी 'निवृत्तेश्वरी' हा भगवतगीतेवरील टीका ग्रंथ ओवीबद्ध स्वरूपाचा आहे. त्याच परंपरेने पुढे सोळाव्या–सतराव्या शतकातले 'पूर्णप्रकाशानंदनाथ', 'नायकस्वामी' किंवा 'कवी मंगेश' या टोपणनावाने त्यांनी श्री मंगेश देवाची स्तुती करणारे 'झुलावे' हे काव्य रचले. त्यांचा 'श्रीपूर्णप्रबोधचंद्रोदय', 'शिवदर्पण' व 'राधाविलास' हे तीन ग्रंथ प्रसिद्ध आहे. नायकस्वामींचे शिष्य म्हणून 'कवी व्यंकट' यांचा उल्लेख करता येईल कवी व्यंकट यांचा 'पंचपथानुभव' इ. स .१७६७ मध्ये रचलेले हा त्यांचा सर्वात महत्वाचा आणि मोठा ग्रंथ आहे' [१७]

'सतराव्या - अठराव्या शतकातले गोमंतकीय संत कवी सोहीरोबानाथ आंबिये यांचे 'सिद्धांतसंहिता','अव्दयानंद','अक्षयबोध', 'महदनुभवेश्वरी' आणि 'पूर्णाक्षरी' हे पाच ग्रंथ महत्वाचे आहेत. 'देहदुर्ग' नावाची एक बखरही त्यांच्या नावावर आहे. त्यांची अभंगरचना व पदरचना हे तर लोकप्रियच आहे. १७ व्या शतकातले 'विठ्ठल केरीकर' म्हणजे 'विठ्ठल नरसिंह सांखोळकर' त्यांना 'दुपाटी विठ्ठल' असेही म्हणतात. गोव्यात आणि महाराष्ट्रतही आपल्या कवी मनाने भूरळ घालणारी **'घनःश्याम सुंदरा माधवा अरुण उदय झाला|'** ही प्रसिद्ध 'भूपाळी' त्यांनी लिहिलेली. इतर स्फुट प्रकरणे, ओवीबद्ध आख्यानेही त्यांनी रचली. रघुनाथ शेणवी हे १८ व्या शतकातले यांचे सर्वात प्रसिद्ध व लोकप्रिय काव्य म्हणजे 'कोंकणाख्यान' होय. पांडोबा कैसरे यांचे 'द्रौपदी स्वयंवर' हे प्रसिद्ध काव्य आहे.

१८ व्या १९ व्या शतकातील रामभक्त 'कृष्ण जगन्नाथ भट्ट बांदकर' यांनी संगीत नाटकाचा पाया घालून एकंदरीत गोमंतकीय मातीतून सुवर्ण शोधून काढण्याचे अलौकिक कार्य केलेले आहे. त्यांचा जन्म गोव्यात डोंगरी या गावी झाला. त्यांनी 'शुकरंभासंवाद', लोपामुद्रासंवाद', 'नटसुभद्राविलास' व 'अहिल्योद्धार' अशी चार संगीत नाटके लिहिली. त्यांनी आख्यानकाव्येही रचाली. त्यांचा 'स्वात्मतत्वामृतशतक' हा त्यांचा लघु ग्रंथ असून त्यात १०१ अभंग आलेले आहेत. त्यांची पदरचनाही साध्या, सोप्या, सरळ शब्दार्थाने व्यापलेली आहे. [१८]

'गोमंतकीय पुरुष संत मंडळीबरोबर स्त्री संत कवयित्रींचाही विचार करणे अपेक्षित आहे. त्यात 'गोकुळाबाई तळावलीकर' यांचे 'श्रीसिद्धारुढ चरित्र' प्रसिद्ध आहे. 'गोदावररीबाई नायक' इ.स. १८९७ – १९५७ यांचे 'चाखूं आम्ही ज्ञानामृत' हे काव्य प्रसिद्ध आहे. 'सीताबाई कुंडईकर' यांचा जन्म १८७७ – १९४२. त्यांच्या कविता ह्या राम भक्तीने भरलेल्या आहेत. 'सोंसुबाई सावर्डेकर' यांचा 'अभंग कुसुमावली' नावाचा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. अशी ही गोमंतकीय संत साहित्याची परंपरा आणि त्या परंपरेतून उदयास आलेल्या सदगुरू, संतांच्या निर्मळ पाऊल खुणानी गोमंतभूमी पवित्र झालेली आहे'. [१९]

## १.६ समारोप

'गोमंतकीय मराठी संत साहित्याची परंपरा' या प्रकरणावर अभ्यास केल्यावर असे जाणवते की गोमंत किया संतसाहित्याची परंपरा ही खूप जूनी आहे. आपल्या हृदयात सदैव जनासाठी हितचिंतन करणारे संत स्वतः चांगल्या गुणांना आत्मसात करणारी भक्ती, तत्वज्ञान सांगणाऱ्या संतांचे महत्त्व किंवा खरा योगी, साधू कसा ओळखावा याविषयी समाजाला दृष्टी देणारे संत आपल्या अभंग वाणीतून लोकांना मार्गदर्शन करताना दिसतात. आपल्या भक्तीला मुक्तीचे साधन मानणारे उत्तरे कडून ते दक्षिणेकडे आणि पूर्वेकडून ते पश्चिमेकडील असंख्य भारतीय संतांचा अल्पपरीरीचयाने इकडे अभ्यास झालेला आहे. त्याचबरोबर गोमंतकीय संत कवींचाही त्यांच्या साहित्याबरोबरही इकडे अभ्यास झालेला आहे.

## १.७ निष्कर्ष

'गोमंतकीय मराठी संत साहित्याची परंपरा' या प्रकरणांतर्गत आलेल्या विषयांचा अभ्यास करत असताना काही महत्त्वाचे निष्कर्ष नोंदविण्यात आलेले आहेत ते पुढील प्रमाणे नोंदवता येईल :

१. भारतात जशी संत साहित्याची परंपरा अत्यंत प्राचीन आहे तशीच गोमंतकातही संतसाहित्याची परंपरा खूप जूनी असलेली दिसून येते.

२. संत साहित्यामध्ये भक्ती, अध्यात्म आणि तत्वज्ञान यात्रीसूत्रीची एकता होणे गरजेचे ठरते.

३. संत हा शब्द सत् या संस्कृत धातूपासून प्रकट झाल्या चे लक्षात येते संत हा शब्द अस्तित्व दर्शक आहे जी सदैव एकसर व अविकृत रूपात आढळते अशी वस्तू किंवा सत्य या अर्थी सत् याचा उल्लेख केलेला आढळतो.

४. अभ्यासाकांनी केलेल्या संत या शब्दाची व्याख्या बघून संतांचे कार्य आणि वृत्ती कशी असावी याचा अंदाज येतो.

५. 'तुका म्हणे तोचि संत सोसि जगाचे आघात ||' या अभंगाच्या ओळीवरून संत तुकारामांनी खऱ्या साधू, संत, योगी, महंताची वृत्ती पारखण्याची दृष्टी समाजाला दिलेली आहे.

६. संत हा निर्वैर, निष्काम, ईश्वरभक्त व विषयविरक्त असावा असे संत लक्षण संत कबीरने सांगितले आहे. त्यामुळे खऱ्या संताला सुख – दुःखाची, धन - श्रीमंतीची आशा नसते मोक्ष हाच शेवटचा मार्ग असल्याचे संत सांगतात.

७. भारतीय संतांच्या परिप्रेक्षात गोमंतकीय संतांचा अभ्यास होणे अपेक्षित ठरतो.

८. प्राचीन काळापासून गोमंतकावर आपली सत्ता गाजविणाऱ्या राजवटी त्यात राष्ट्रकूट, सातवाहन, चालुक्य, मौर्य, बदामीचे आदिलशाही, देवगिरीचे यादव इत्यादी राजवटींनी गोमंतकावरही राज्य केलेले दिसते त्यांनी निर्माण केलेल्या शीलालेख, कोरीव लेख, ताम्रपटातही उल्लेख सापडतो.

९. 'गोमंत' या शब्दापासून 'गोवा' किंवा 'गोवें' हे शब्द उत्पन्न झाल्याचे लक्षात येते.

१०. अतिप्राचीन काळात व्यासांनी रचलेल्या महाभारत या ग्रंथात भीष्मपर्व या प्रकरणात 'गोमंतक' या प्रांताचा उल्लेख 'गोपराष्ट्र' म्हणून सापडतो त्यामुळे 'भारत' हा भूप्रदेश किती जूना आहे हे लक्षात येते. पूर्वी भूगोलाच्या सीमारेषा नव्हत्या तरीही या प्रांत - प्रदेशांना पूर्वी नावे असल्याचे दिसून येते

११. आजवर भारतीय संतांचा अभ्यास मोठ्या प्रमाणात झालेला आहे किंबहुना होत आहे त्या परिप्रेक्ष्यात गोमंतकीय संत साहित्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे किंवा आणखी गोमंतकीय संतावर अभ्यास होणे अपेक्षित आहे.

## १.८ संदर्भ सूची


१. श्री ज्ञानेश्वर वाङ्मय आणि कार्य, लेखक : नरहर रघुनाथ फाटक, मौज प्रकाशन, प्रथमावृत्ती - १९५२, पुष्ठ क्र.५

२. श्री ज्ञानेश्वर वाङ्मय आणि कार्य, लेखक : नरहर रघुनाथ फाटक, मौज प्रकाशन, प्रथमावृत्ती – १९५२, पृष्ठ क्र. ४

३. काळे, कल्याण, नगरकर, रा.श. (संपा) संत साहित्य अभ्यासाच्या काही दिशा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर १९९२. पृष्ठ क्र.३५

४. संत तुकारामांचे निवडक १०० अभंग, संपादक डॉ. श्री. पिंगे, व्हिनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली १९६२, अभंग क्र.४४, पृष्ठ क्र.४७

५. संत साहित्य आणि दालित संवेदना, संपादक प्राचार्य रा. तु. भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र.१०२

६. सार्थ दासबोध, संपादक - ह . भ. प. कै. ल. रा. पांगारकर, प्रकाशन - वरदा बुक्स, पुणे, प्रथामावृत्ती वरदा बुक्स)- १९९६, पृष्ठ क्र. १५

७. प्रा. विनय मडगावकर, भक्तिज्ञानमार्ग साधन संस्था, शिवोली, गोवा, पृष्ठ क्र.१३

८. संत साहित्य आणि दालित संवेदना, संपादक प्राचार्य रा. तु. भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र.१०२

९. संत साहित्य आणि दालित संवेदना, संपादक प्राचार्य रा. तु. भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र. २७

१०.संत साहित्य आणि दालित संवेदना, संपादक प्राचार्य रा. तु. भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प्रथामावृत्ती, २००३, पृष्ठ क्र.५१

११.संस्कार - दर्शन, लेखिका मालती वैद्य, सौ.पद्मा देशपांडे, प्रकाशक - मालती वैद्य, सौ.पद्मा देशपांडे, मैत्रिण प्रकाशन दिन १९८८, पृष्ठ क्र. ७१

१२.संत साहित्य आणि दालित संवेदना, संपादक प्राचार्य रा. तु. भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र.१३७

१३.गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला, संपादक – डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र. ६३

१४.महाभारत मराठी अनुवाद, खंड चौथा, (संपा) डॉ. रा. शं. वाळिंबे, भिष्मपर्व, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणे, प्रथमावृत्ती १९८३. पृष्ठ क्र.४५०

१५.गोमंत - शरद, संपादक - रामदास प्रभु, प्रकाशन गोमंतक साहित्य सेवक मंडळ, पहिली आवृत्ती १९७२, पृष्ठ क्र.६६

१६. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला, संपादक – डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र. २५६ - २५७

१७. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला, संपादक – डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र. २६१

१८. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला, संपादक – डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र. २६७ - २८६

१९. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला, संपादक – डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र. २९० - २९२

प्रास्ताविक ........ 25

२.१ संत सोहिरोबानाथ आंबिये यांचे जिवनचरित्र ........ 26

२.२ संत सोहिरोबानाथांनी मराठी भाषेला दिलेले योगदान ........ 34

२.३ संत सोहिरोबानाथांची ग्रंथ रचना ........ 35

२.३.१ सिद्धांतसंहिता ........ 36

२.३.२ अद्वयानंद ........ 38

२.३.३ अक्षयबोध ........ 39

२.३.४ श्रीमहदनुभवेश्वरी ........ 40

२.३.५ पूर्णाक्षरी ........ 42

२.३.६ देहदुर्ग बखर ........ 44

२.४ संत सोहिरोबानाथांची पद रचना ........ 45

२.४.१ उपदेशपर पदे ........ 46

२.४.२ वेदान्तपर पदे ........ 49

२.४.३ तत्वज्ञानपर पदे ........ 52

२.४.४ राम – कृष्ण अवतारलीलावर्णनपर पदे ........ 53

२.४.४.१ श्रीरामाची पदे ........ 53

२.४.४.२ श्रीकृष्णाची पदे ........ 53

२.४.५ सद्गुरूविषयक पदे ........ 54

२.५ समारोप ........ 55

२.६ निष्कर्श ........ 55

२.७ संदर्भ सूची ........ 56

## प्रकरण दुसरे

## गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये यांचे जीवनचरित्र आणि साहित्यसंपदा

### प्रास्ताविक

गोमंतकीय संत साहित्याची परंपरा या पहिल्या प्रकरणात भारतीय संतांची परंपरा, गोमंतकीय संतांची परंपरा, संतांचा अल्प परिचय तसेच  गोमंतक या शब्दांची व्युत्पत्ती आणि संत कोणाला म्हणावे? याविषयी अभ्यास केला आहे. प्रस्तुत प्रकरणात 'गोमंतकीय संत कवी सोहरोबानाथ आंबिये यांचे जीवनचरित्र आणि त्यांची साहित्यसंपदा' या विषयावर अभ्यास केला आहे.

"**हरिभजनावीण काळ घालवू नको रे |**" अशा पवित्र आणि रसाळ शब्दांची सुमने करून ईश्वर भक्ती करणारे आणि जनांना ईश्वर भक्तीचे वर्म सांगणारे गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये यांच्या जीवनचरित्राचा उल्लेख 'श्रीमहदनुभवेश्वरी', 'सिद्धांतसंहिता', 'संत सोहिरोबानाथ आंबिये चरित्र आणि काव्यपरिचय' या ग्रंथात बाळकृष्ण भगवंत बोरकर यांनी संत सोहिरोबानाथांचे चरित्र लिहिले आहे. 'गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला' या ग्रंथात  प्रा. आशा मणगुतकर लिखित सोहिरोबांच्या अल्पपरिचयावरून नाथांच्या जीवनाचा, त्यांच्या साहित्याचा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करता येईल.

"आधुनिक ऐतिहासिक दृष्टि आपल्या समाजाला कधींच नव्हती. त्यामुळें आपल्याकडील थोर पुरुषांच्या चरित्राचा मागोवा घ्यायचा झाल्यास त्यांच्या मागील चरित्रकारांनीं ऐकीव माहितीवर जें काहीं लिहून ठेवलें आहे किंवा त्यांच्या वंशजांकडून परंपरेने चालत आलेल्या ज्या हकीकती मिळू शकतात आणि खुद्द त्या थोर पुरुषांच्या लेखनावरून जी थोडीं अनुमानें निघतात त्यांची डोळसपणे संगति लावावी लागते आणि त्यांतून जे निष्पन्न होईल त्यावर संतोष मानावा लागतो".[१] हे बाळकृष्ण भगवंत बोरकर यांचे विधान निसंदेह पटण्यासारखे आहे. बोरकरांचे असे विधान गृहीत धरून आणि उपलब्ध सुसंगत चरित्र साधनांच्या आधारे सुरस असे चरित्र मांडले आहे.

## २.१ संत सोहिरोबानाथ आंबिये यांचे जिवनचरित्र

संत सोहिरोबानाथ आंबिये यांचे मुळचे कुटुंब 'गोव्यातील'. ते जातीने 'गौड सारस्वत ब्राह्मण' होते. त्यांचे गोत्र 'वत्स' होते. त्यांचे कुलदैवत 'श्री मंगेश' आणि गाव 'कुट्ठाळी' होते. त्या गावचे एक संस्थापक म्हणून आंबिये घराण्याला मान - सन्मान होता. परंतु १६ व्या शतकात जेव्हा गोमंतकावर पोर्तुगीजांचे आक्रमण झाल्यामुळे कुट्ठाळी रहीवास्यावर संकटाचे डोंगर कोसळले. पोर्तुगीजांनी स्वधर्मप्रसाराच्या नावाखाली तिसवाडीतील देवळांचा विध्वंस सुरू केला. तेथून सासष्टी तालुक्यावर हल्ला केला. पोर्तुगीजांनी तीसवाडी, बर्देश आणि सासष्टी ह्या तालुक्यातील विविध गावातील हिंदू देवी - दैवतांची हजारो देवळांचे - राऊळांचे अस्तित्व उध्वस्त केले. तेव्हा कुट्ठाळीवासीयांनी 'श्री मंगेशाचे' लिंग रातोरात हलवून ते घेऊन त्यांनी फिरंगी हद्द पार केली. यात आंबिये कुटुंबही होते. त्या काळी ते कुट्ठाळी गावातून स्थलांतरीत होऊन सावंतवाडी संस्थानातील पेडणे महालातील 'पलिये' या गावी स्थायिक झाले.

'पेडणे' या तालुक्यात वसलेले आणि निसर्गाने नटलेले असे हे 'पालिये' गाव. याच गावात शालिवाहन शके १६३२ म्हणजेच इ.स. १७१४ या वर्षी संत सोहिरोबानाथ आंबिये यांचा जन्म झाला. सोहिरोबानाथांचे पाळण्यातील नाव 'अच्युत' असे ठेवण्यात आले होते. पण मुलाला एखाद्या दिवंगत पूर्वजांचे नाव ठेवले तर त्याला हाक मारण्याची ती दुसऱ्या एखाद्या लाडक्या नावाने, ही जी प्रथा आपल्यामध्ये आजही रुजते तिला धरून घरात त्यांना 'सोयरु' या नावाने संबोधले जाऊ लागले. तसेच पुढे 'सोहिरोबा' या रूपात मान्यता पावले. सोहिरोबांच्या वडिलांचे नाव 'अनंत शणैं' होते. कुट्ठाळीहून स्थलांतरीत होऊन पालिये गावी आल्यावर या कुटुंबातले पुरुष सुविद्य आणि गावात मोठ्या मनाचे असल्याने या गावातल्या गावचे कुलकर्णीपद वाडी सरकारने सोहिरोबांच्या वडिलांकडे सोपविले.

घरात मुलगा झाला आणि तोही गोरागोमटा त्यामुळे सोहिरोबांच्या आई वडिलांना अत्यानंद झाला. परंतु तो इतर सर्वसामान्य मुलांप्रमाणे हसत खेळत नव्हता. त्यामुळे काळजीपोटी उपाय म्हणून त्यांच्या आईवडिलांनी अंगारे धुपारे करण्यास सुरुवात केली. सुदैवाने त्याच सुमारास त्यांच्याकडे एक सिध्दपुरुष आले. त्यावेळी सोहिरोबांच्या वडिलांनी सोहिरोबांना त्यांच्या पायावर घातले व काळजी त्यांच्या पुढे व्यक्त

केली त्यावरती सिद्धपुरुष म्हणाले ‘काळजीचे मुळीच कारण नाही तुमच्या कुळात आजवर जी भगवद्भक्ती चालत आली आहे. तिची फलश्रुती या मुलाच्या रूपाने तुम्हाला प्राप्त झाली आहे. पूर्वजन्मीचा हा योगीराज तुमच्या कुळाचा उद्धार करील ह्याला नीट जपा’ त्या दिवसापासून सोहिरोबांचे आई वडिल त्यांना जास्तच सांभाळू लागले.

सोहिरोबांच्या जन्माच्या वेळी त्यांच्या वडिलांची गृहस्थिती फारशी चांगली नव्हती. पण पुढे हळुहळू ती सुधारत गेली.पालिये गावचे कुलकर्णीपण नेकीने, हुशारीने आणि चांगल्या पद्धतीने चालवलेले पाहून वडी सरकरने धारगळ गावचेही कुलकर्णीपदही त्यांच्याकडे सोपविले. त्यामुळे त्यांनी सावंवाडीच्या जवळपास कायमचे वास्तव्य करायचे असे त्यांनी ठरवले. त्याचवेळी सुदैवाने बांदे गावचेही कुलकर्णीपदही त्यांच्याकडे आले. पूर्वी ‘बांदे’ ऊर्फ ‘एलिदाबाद’ असा उल्लेख बांदे या गावाचा केला जात असत. सोहिरोबांच्या वडिलांनी तेथेच थोडी शेतीवाडी विकत घेतली. पलये आणि धारगळची कुळकर्णे आपल्या भावाकडे सोपवून बांदे येथे घर बांधून तेथेच स्थायिक झाले.

‘आंबिये जेव्हा बांदे या नव्या गावी आले तेव्हा सोहिरोबानाथांची मुंज झाली होती. कुलकर्ण्याच्या मुलाला त्याकाळी ज्या तऱ्हेचे प्राथमिक शिक्षण मिळत असे ते पुरे करून तेव्हाच्या पद्धतीप्रमाणे सोहिरोबांचे कौमुदी धातुरूपावली वगैरे संस्कृतचा अभ्यास करू लागले होते. ‘बांदयाला हिंदू वस्तीबरोबरच मुसलमान वस्तीही होती. मुसलमान समाजाची संपर्क आल्यामुळे त्यांना धर्म कल्पना आणि परंपराचा परिचय घडला त्याकाळी इथले मुसलमान मूळच्या हिंदू परंपरेपासून फारसे तुटलेले नव्हते. एवढेच नव्हे तर तेव्हा साऱ्या दक्षिण कोकणावर आपला प्रभाव गाजविणाऱ्या नाथ संप्रदायाची उपासना ही मोठ्या प्रमाणावर झाली या उपासनेचे प्रणेते ‘गहिनीनाथ’ हे होते. मुसलमान त्यांना ‘गैबी पीर’ या नावाने भजायचे. नाथ संप्रदायाबरोबर त्यांचा सूफी पंथही रूढ होता. अशा या द्विधर्माच्या वातावरणात सोहिरोबानाथ वाढले’.[२]

‘सोहिरोबानाथांना एक लहान बहीणही होती तिचे नाव ‘मुक्ता’ होते. तिचे लग्न वयाच्या ८ - ९ व्या वर्षी लावले व पुढे सोहिरोबांचे लग्न वयाच्या जवळजवळ १६ - १७ व्या वर्षी थाटामाटात केले. सोहिरोबानाथांच्या बहिणीबद्दल फार अशी काही माहिती उपलब्ध नाही. उदाहरणार्थ : तिचे सासर कोणत्या

गावी होते ? कोणाच्या घरी तिला दिले होते ? तिच्या पतीचे नाव काय ? इत्यादींची कशाचीही माहिती आज उपलब्ध नाही पण असे सांगण्यात येते की तिच्या पतीचे अकाळी निधन झाल्यामुळे मुलीस परत माहेरी नेण्याची सूचना सोहिरोबांच्या वडिलांना तिच्या सासरहून मिळाली. अनंतरावांना मुलीच्या कोवळया वयाची काळजी होती. तिच्यावर विधवेचे दुःखद प्रसंग ओढले होते पुढे तिचे कसे होणार ? असे मानसिक बुद्धीला आघात करणारे प्रश्न अनंतराव व त्यांच्या पत्नीला येत असत याच दुःखातच एके दिवशी अनंतरावांचे निधन झाले'.[३]

वडिलांच्या निधनानंतर सहिरोबांनी आपल्या विधवा बहिणीला प्रौढ होईपर्यंत विद्यासंपन्न केले. तिला लेखन, वाचन उत्तम शिकविले होते ज्ञानेश्वरी भागवत यासारख्या ग्रंथांचे पाठांतर उत्तम करून घेतले होते ती मराठी अक्षर फार सुंदर काढत होती. सोहिरोबानाथ ज्यावेळी ब्रह्मानंद निमग्न स्थितीत असताना ज्या ज्या कविता रचल्या त्या कविता तिनी बहुतांशी जशाच्या तशा लिहून ठेवल्या होत्या.सोहरोबांची बहुतेक पदे आजही अस्तित्वात असल्यास त्याची बहीण कारणीभूत होती. घरच्या गरिबीमुळे आपल्या कवितालेखनासाठी लागणार कागदही ते विकत घेऊ शकत नसल्यामुळे त्यांची बहिण फणसाच्या कोवळया पानावर त्यांच्या कविता लिहून ठेवायची एकदा सोहिरोबा आणि त्यांच्या बहिणीच्या अनुपस्थितीतील त्यांच्या आईने पाचोळा समजून ती फणसाची पाणी सरळ न्हाणीच्या चुलीत घातली त्यामुळे सोहिरोबांची अशा कित्येक कविता चुलीतल्या राखेबरोबरच नष्ट झाल्या.

'वडीलांच्या निधनानंतर सोहिरोबानाथ एकटेच खोलीत बसून नित्य आत्मचिंतन करत. भगवंताच्या चरणी लीन होत. 'भागवत', 'महाभारत', 'गीता', 'ज्ञानेश्वरी' यासारख्या ज्ञानप्रदान व ज्ञानप्रसार करणाऱ्या ग्रंथांचे वाचन करत असे. असेच त्यांचे दिवस चालत होते. सोहिरोबांचे वडिल जेव्हा कैलासवासी झाले तेव्हा सोहिरोबांना नोकरी शोधण्याची गरज पडली नाही. कारण त्याकाळी परंपरेने नोकरीचा वारसा पुढच्याला मिळत असे. कुलकर्णीपणही परंपरेने चालत असे. सोहिरोबांच्या हाती जेव्हा कुलकर्णीपद आले तेव्हा ते १८ वर्षाचे होते'.[४] त्याकाळी सावंतवाडी संस्थानामध्ये रामचंद्र सावंतांची कारकीर्द चालू होती; आणि महासूलखात्यात त्यांचे चुलते सोमसावंत यांची देखरेख असे. रामचंद्र सावंताचेच चिरंजीव राजश्री

खेमसावंत गादीवर आले तेव्हा त्यांचे वय आठ वर्षे होते. सोहिरोबनाथांना ते गुरुसारखे वागवायचे. त्यांची पदेही ते ऐकायचे कधी - कधी सोहिरोबांना ते स्वतःच्या राजवाड्यातच काही दिवस आणून ठेवित असत.

खेमसावंत व सोहिरोबनाथांचा संबंध जसजसा वाढू लागला तसतसा सोमसवंतांना राग येऊ लागला. राजश्री राजकारभारात लक्ष न देता भलत्याच मार्गाकडे वळलेले त्यांना पसंत नव्हते. सुरवातीपासूनच सोमसावंतांना सोहिरोबनाथांचा छळ करण्याचे ठरविले. एक दिवस राजश्री राजवाड्यात नसताना सोहिरोबांची व सोमसावंतांची गाठ पडली. तेच सोमसावंतानी सोहिरोबांनाथाजवळ देव पाहण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानंतर सोमसावंतांनी सोहिरोबांना एका शस्त्रागारामध्ये नेले व त्या ठिकाणी कोंडले तलवार हाती घेऊन त्यांना म्हणाले की खेमसावंत तुला थोर साघू मानतो. तू जर साधू आहेस तर तुझा देव कुठे आहे तो दाखव मला; नाहीतर तुझा शिरच्छेद करीन. त्यांच्या या धमकीला सोहिरोबानाथ घाबरले नाहीत, सोहिरोबांनी मनोमनी ईश्वराची प्रार्थना केली आणि चमत्कार झाला. सोहिरोबानाथांच्या तेजस्वी वाणीने सोमसावंतांना त्यांची शक्ती निघून जाते की काय असा भास झाला. सोहिरोबानाथांचा तो तेज पाहून सोमसावंतांना लगेच त्यांच्या व्यक्तिमत्वाची आणि अध्यात्माची प्रचिती झाली. त्याचवेळी त्यांनी सोहिरोबानाथांचे पाय धरले. सोहिरोबानाथांची उपदेशपर वाणी सोमसावंतांना हरिभजनाच्या तत्वाचे मार्गदर्शन केले. या सर्व प्रसंगाने सोहिरोबांच्या मनावर भलताच परिणाम झाला, जन्मापासून त्यांची वृत्ती विरागी असल्यामुळे ईश्वरभक्ती, देवावरश्रद्धा अधिकच दृढ झाली. आपण उगाचच तारुण्यातली वीस वर्षे ईश्वरभक्ती ऐवजी नोकरीत घालवली असे त्यांना वाटू लागले. नोकरीत त्यांचे लक्ष लागेनासे झाले. परंतु , विधवा , पत्नी आणि दोन मुलगे यांच्यासाठी त्यांना नोकरी करणे भाग पडत असे.

‘एके दिवशी सकाळी सोहिरोबानाथ स्नान वगैरे करून देवपूजेला बसले होते. तेवढ्यात सावंतवाडीहून काही आवश्यक कामासाठी निरोप घेऊन दरबारातून एक दूत आला. सोहिरोबांनी देवपूजा लवकरच आटोपली व भोजन न करताच ते सावंतवाडीला जाण्याकरीता घरातून बाहेर पडले; उपहाराकरता म्हणून त्यांनी बरोबर एक पिकलेला फणस घेतला. बांद्याहून सावंतवाडी तीन कोसाच्या अंतरावर आहे. त्यावेळी आजच्यासारखे रस्ते नव्हते ; होती ती फक्त पायवाट तीही रानावनातून जाणारी. अर्धे अंतर तोडून झाल्यावर थकवा आल्यामुळे इन्सुली गावाजवळच्या रानातून वाहत जाणाऱ्या एका ओढ्याच्या काठी ते

विश्रांतीसाठी थांबले, बरोबरचा फणस फोडून ते खायला सुरुवातच करणार होते तेवढ्यात जवळूनच शब्द त्यांच्या कानावर पडले, 'बाबूजी, हमकू कुछ देता है ?' सोहिरोबांनी वळून पाहिले. तो एक सिद्धपुरुष उभा होता. त्यांनी त्या सिद्ध पुरुषाला साष्टांग दंडवत घातला व त्याला प्रेमाग्रहांनी अख्खा फणस खायला दिला. त्या सिद्धपुरुषांने तो अख्खा फणस चार क्षणातच फस्त केला आणि फक्त पाच गरे प्रसादाच्या रूपाने सोहिरोबांच्या हातावर ठेवले. परत जाण्यापूर्वी सिद्धपुरुषांने आपला वरदहस्त सोहिरोबांच्या मस्तकावर ठेवला व 'तुझी मनीषा सफल होईल' असा आशीर्वाद दिला. त्याच वेळी सोहिरोबानाथ काही वेळ शून्यावस्थेत गेले. परत भानावर आले तेव्हा तो सिद्धपुरुष अदृश्य झालेला होता. त्या विभूतिने दिलेले फणसाचे पाच गरे सोहिरोबांनी खाऊन टाकले आणि मनोमन त्या विभूतीला प्रणाम केला. ही विभूती म्हणजे नाथसप्रदायातील 'गैबीनाथ' असल्याचे सोहिसोबानाथांनी ओळखले आणि परत सावंतवाडीची पायवाट धरली'.[५]

सोहिसोबानाथ कुलकर्णीपदची जबाबदारी सोडविण्याकरिता दप्तर घेऊन सावंतवाडीस आले. लेखणी कायमची ठेवण्याचा त्यांचा निश्चय होता. समोर रामचंद्र सावंत सिंहासनावर बसले होते. राजासमोर उभे राहून त्यांनी सरकारी कामाचे दप्तर राजापुढे ठेवली व म्हणाले, 'महाराज आजपासून मी नोकरीचा राजीनामा दिला आहे. यापुढे या लेखणीचा उपयोग मी करणार नाही. आपल्याला या जबाबदारीतून मोकळे करावे.' अशी विनंती करून सोहिरोबा परत फिरले आणि त्यांनी बांद्याचा रस्ता धरला राजीनाम्याच्या या घटनेनंतर वीस - पंचवीस वर्षे म्हणजे वयाच्या साठीपर्यंत सोहिरोबा घरीच राहिले. भजन, पूजन, ग्रंथ वाचन, ग्रंथ लेखन हा त्यांच्या रोजचाच कार्यक्रम बनला होता. आपल्या गुरूच्या आज्ञेवरून त्यांनी लेखनास प्रारंभ केला. अवघ्या एक वर्षातच म्हणजे इ.स. १७४८ मध्ये 'सिद्धांतसंहिता' हा ग्रंथ त्यांनी लिहून पूर्ण केला. पुढच्या अडीच वर्षात 'अद्वयानंद', 'अक्षयबोध', 'श्रीमहदनुभवेश्वरी', आणि 'पूर्णाक्षरी' हे चार अध्यात्मपर ग्रंथ त्यांनी लिहिले त्याचबरोबर अभंग, पदे, श्लोक, आरत्या अशी स्फुट कवितांची रचनाही त्यांनी केली.

शके १७०२ म्हणजे इ.स. १७७९ म्हणजे वयाच्या ६५ किंवा ६६ व्या वर्षी सोहिरोबा उत्तरेकडे यात्रेस निघाले. तेव्हा त्यांच्यासोबत त्यांचे दोन मुलगे होते व त्यांना प्रत्येकी एक - एक पुत्र होता. सोहीरोबानाथांना दोन सुना होत्या. एक सुन त्यांची मनोभावे सेवा करीत असे. सोहिरोबा यात्रेला निघताना

तिचा निरोप घ्यायला गेले तेव्हा ती सुन रडू लागली. तिचा तापामुळे मृत्यूच्या द्वारी उभा असलेल्या मुलाबद्दल ती दुःख व्यक्त करू लागली. सुनेच्या सांगण्यावरून सोहिरोबानाथ मुलाकडे गेले. मुलाच्या अंगावरून मायेने हात फिरवला अन् आशीर्वाद दिला. मुलगा एकाएकी उठून बसला. सुनेलाही समाधान वाटले. त्यानंतर त्यांनी यात्रेस जायला प्रारंभ झाला.

'देशपर्यटन करीत सोहिरोबानाथ पंढरपुरात पोहोचले. तेथे काही काळ वास्तव करून पुढे यात्रेच्या निमित्ताने उत्तर भारतातील पवित्र यात्रास्थाने पाहण्याकरीता निघाले. द्वारका, मथुरा, वृंदावन, काशी प्रयाग वगैरे पुण्यक्षेत्रे पाहत - पाहत शेवटी सोहिरोबानाथांनी बद्री आश्रमापर्यंत जावून इ. स. १७८६ च्या सुमारास 'उज्जयिनी' येथे आपले आसन स्थिर केले. उज्जयिनी येथील 'मल्लिनाथ' मठात राहून सोहिरोबा वैराग्यपूर्ण स्थितीत ईश्वरध्यानात मग्न राहू लागले. हळूहळू त्यांची कीर्ती आणि योगतेज उज्जयिनी शहरात पसरू लागले. त्यावेळी 'महादजी शिंदे' हे ग्वाल्हेरच्या राज्यपदी होते. पेडणे तालुक्यातील केरी या गावचे 'जीवबादादा केरकर' हे त्यांचे सेनापती होते. सोहिरोबा हे गोव्याचे आहेत व विरक्त संत आहेत हे ऐकून जीवबादादा त्यांना आपल्या घरी ग्वाल्हेरला नेले. त्यांची मनोभावे, आदरांने सेवा केली. जीवबादादांच्या घरी त्यांच्या गावची कोणी एक सिद्धपुरुष आले असून ते चांगले शीघ्रकवीही आहेत, अशी त्यांची कीर्ती महादजी शिंदे यांच्या कानावर पडली. त्यांनी सोहिरोबांना आदरपूर्वक आपल्या भेटीस घेऊन येण्याविषयी जीवबादादांना सांगितले.

महादाजी शिंदे स्वतः कविता, अभंग, पदे लिहीत असत. शिंदे हा धूर्त, अहंकारी होता. शिंदेच्या दरबारात सोहिरोबानाथ आणि जीवबादादा पोचले. दरबाराच्यावतीने सोहिरोबांचा चांगला सन्मान करण्यात आला. शिंदेनी आपले सर्व वैभव दाखविले, देवधर्म, योगमार्ग, अध्यात्म, तत्त्वज्ञान विषयी काही गोष्टी झाल्या. हे सर्व करत करत शेवटी महादजी शिंदे यांच्या पदांची चोपडी सोहिरोबानाथांच्या हाती देण्यात आली. आपल्या पदावर काही अभिप्राय द्या? असे शिंदेंनी सोहिरोबांना सांगितले. काहीवेळ चोपडी हातात ठेवून सोहिरोबांनी शिंदेंची पदांची चोपडी परत केली आणि म्हणाले 'हा सारा विधवेचा शृंगार आहे!' हे ऐकताच राजदरबारातील सर्वजण स्तब्ध राहिले. शिंदे रागाने संतापून आपल्या वैभवाचा टेंभा मिरवू लागले'.[६] तेच सोहिरोबांना शिंदेंनी जो वैभवाचा दिखावा दाखविला होता त्याचे गर्वहरण करण्याकरिता

आणि अहंकाराचे निर्दालन करण्याकरिता सोहिरोबानाथांनी निर्भयपणे एका पदातून शिंद्यांना दिलेले उत्तर म्हणजे हे खालचे पद आहे.

**'अवधूत नही गरज तेरी । हम बेपर्वा फकीरी ॥**

**तुम हो राजा मै हूं जोगी । पृथक् पंथका न्यारा ॥**

**चार कोट जहागीर तुमारी । वोही पंथ हमारा ॥**

**सोना चांदी हमकु नहि चाहिये । अलख भुवनका वासी ॥**

**तुमबी डुबे हम भी डुबाये । तेरा हम क्या लिया ॥**

**कहे सोहिरा सुनो महादजी । प्रकाश जोत गमाया ॥'** [७]

या पदावरून सोहिरोबानाथांचे हिंदी भाषेवरील असलेले प्रभुत्वाही लक्षात येते. सोहिरोबानाथांनी शिंदेंना सतमार्गावर नेले म्हणून शिंदेंच्या मनात सोहिरोबानाथांबद्दल आदर, प्रेम उत्पन्न झाला. त्यांनी सोहिरोबानाथांना भेट म्हणून सुवर्ण मोहरा, वस्त्र अशा प्रकारची भेट दक्षिणा स्वरूपात दिली पण सोहिरोबांनी ते स्वीकारले नाही. त्यानंतर सोहिरोबांनाथांनी महादजी शिंदे आणि जीवबादादा केरकर यांचा निरोप घेऊन परत उज्जयिनीमध्ये मल्लीनाथाच्या मठामध्ये वास्तव केले. सोहिरोबानाथ उज्जयिनीत वास्तव करत असताना तेथेच बाजूला 'विठ्ठलाचार्य दीक्षित' यांचे घर होते. ते एक शास्त्री व कीर्तनकार होते परंतु स्त्री मोहात अडकून पडलेले स्वधर्म सोडून ते 'चंपा' नामक एका परस्त्री सोबत राहत होते. विठ्ठलाचार्य आणि चंपा यांच्या अनैतिक गोष्टीबद्दल सोहिरोबानाथांना कळले. वाईट मार्गावरून सतमार्गावर कसे न्यायचे यांना याविषयी सोहिरोबानाथांचा विचार चालला होता'.[८]

'विठ्ठलाचार्य आणि चंपा यांचा एकांतवास चालला असताना दुसरीकडे सोहिरोबानाथांची बोधवाणी चालूच होती. सोहिरोबांच्या मुखातून अशी पदे बाहेर पडत होती की त्यातून विठ्ठलाचार्यांनी बोध घ्यावा. पण सोहिरोबांच्या पदांचा काहीच परिणाम त्यांच्यावर झाला नाही. उलट विठ्ठलाचार्य हा उपदेश करणारा जोगी कोण हे पाहण्यासाठी सोहिरोबासमोर आला. विठ्ठलाचार्य फारच भडकले आपल्या चरित्रावर

डाग पडू नये यासाठी विठ्ठलाचार्यांनी सोहिरोबांचा काटाच काढून टाकण्याचा विचार केला. चंपाही या विचारात पूर्णपणे सहमत होती. उज्जयिनी शहरामध्ये वाहणाऱ्या क्षिप्रा नदीच्या जवळच एक विहीर होती. एके दिवशी संधी साधून विठ्ठलाचार्यांनी सोहिरोबानाथांना याच विहिरीत ढकलून दिले. सकाळच्या वेळी काही बायका पाणी नेण्यासाठी गेल्या असता त्यांना एक दिव्य पुरुष तिथे पाथरीवर ध्यान मग्न झालेला दिसला. गावातले काही लोक तिकडे जमले त्याचबरोबर विठ्ठलाचार्यही स्वतः केलेल्या दुष्कर्माचे फलित बघायला आले. सोहिरोबांना जीवंत बघून ते आश्चर्यचकित झाले. शेवटी मठात येऊन विठ्ठलाचाऱ्यांनी आणि चंपाने सोहिरोबानाथांशी क्षमा मागितली. तेव्हापासून विठ्ठलाचार्यांनी सोहिरोबानाथांचे शिष्यत्व स्वीकारले'.[९]

मृत्यू समोर असूनही संकटाकडे बघून भयभीत होऊ नये. त्या संकटातही देवाची भक्ती शोधावी. अशा शांत वृत्तीने जगण्याची जीवनदृष्टी सोहिरोबानाथ देताना दिसतात. सोहिरोबानाथाबरोबर विठ्ठलाचार्यांनी केलेल्या दुष्कर्माबद्दल उपदेश करताना सोहिरोबांनी खालील पदाची रचना केलेली आहे.

**'स्थान बरे जलवास । जेथे स्वप्नि नसे खलवास ।।**

**म्हणे सोहिरा शेषशायी हा । झाला विठ्ठलदास ।।**

**खल मित्रांसह मानुनि केला । क्षीरसागरी हा वास ।।'** [१०]

'सोहिरोबानाथ उज्जयिनी येथे वास्तव करत असताना एके दिवशी शके १७१४ म्हणजे इ. स. १७९२ रोजी रामनवमीचा उत्सव होता. सकाळी उठून सगळा शिष्यवर्ग राम नवमीच्या तयारीला लागला होता. दुपारी राम जन्माचा सोहळा सुहास रित्या पार पाडला. अनेकांनी भजने म्हटली, कीर्तने झाल, आरत्या झाल्या, गुलाल, फुले उधळून रामजन्मोत्सवाची सांगता झाली. रात्री सर्व शिष्यवर्ग झोपले. सोहिरोबानाथ नेहमीप्रमाणे ध्यानस्थ झाले. दुसऱ्या दिवशी उठून पाहता तर सोहिरोबानाथ नव्हते. सर्वांनी सर्वत्र शोध घेतला मठातच नव्हे तर आजूबाजूला कुठेही नव्हते. त्यांच्या अंथरुणाजवळ एक पद सापडले त्यात त्यांनी आपल्या निर्वाणाबद्दल लिहिले होते. ते पद असे होते'.[११]

**'दिसणे हे सरले। अवघे प्राक्तन हे मुरले॥**

**आलो नाही, गेलो नाही। मध्ये दिसणे हे भ्रांती॥**

**जागृत होता स्वप्नचि हरपे। कर्पूरन्याये जग हरले॥**

**दिसणे हाची जन्म योगिया। ना दिसणे हा मृत्यू म्हणा॥**

**गैबि प्रसादे गैबचि जाहले। आप आपणामध्ये लपले॥**

**मच्छिंदर, गोरख, जालंदर हे। न्याया आले स्वस्वरूपी॥**

**जाता जाता गमनग्राम ते। समूळ कोठे ना गमले॥**

**म्हणे सोहिरा सतरा चवदा। मधुमासाच्या नवमी दिनी॥**

**सगुणस्वरूपी निर्गुण ठेले। अनुभव हरले स्वरुप कळे॥'** [१२]

## २.२ संत सोहिरोबानाथांनी मराठी भाषेला दिलेले योगदान

संत सोहिरोबानाथांच्या चरित्राचा अभ्यास दुसऱ्या प्रकरणाच्या पहिल्या अनुच्छेदात सुसंगतपणे झालेला आहे. संत सहिरोबानाथांनी मराठी भाषेला समृद्ध करण्याचे एक मौलिक कार्य केलेले आहे. आपल्या अभंग रचनेने, पद रचनेने, ग्रंथ रचनेने १८ व्या शतकाच्या मराठी भाषेत जे अध्यात्मिक, तत्त्वज्ञानपर वाङ्मय निर्माण झाले त्यात सोहिरोबानाथांचे वाङ्मय संख्यात्मक तथा गुणात्मक दृष्ट्या पाहता अतिशय मोठे आणि श्रेष्ठोत्तम वाङ्मय असल्याचे सांगता येईल. मराठी भाषेच्या वटवृक्षाला आपल्या योगसाधनेने आणि विस्तृत भाषेच्या बळावर उष:काळ प्राप्त करून दिला. याविषयी श्री अनिल सामंत लिहितात ''गोमंतकातील मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या संवर्धनात संत सोहिरोबानाथांचे योगदान अतिशय मौलिक अशा योग्यतेचे आहे. गोमंतकाचे 'ज्ञानेश्वर' म्हणावे असे बहुमोल वाङ्मय लिहूनही त्यांचे चरित्र आणि वाङ्मयावर मराठीत फारच कमी लिहिले गेले आहे''.[१३]

संत सोहिरोबानाथांच्या वाङ्मयीन कर्तुत्व आणि त्यांच्या साहित्य योगदानाविषयी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. श्रीकृष्ण अडसूळ लिहितात "मराठी संत परंपरेला आध्यात्मिकतेचा जो एक भक्कम पाया संत ज्ञानेश्वरांनी घालून दिला त्या परंपरेचे खरे वारसदार शोभतील इतके सोहिरोबानाथांचे वाङ्मयीन कर्तुत्व विविधांगी स्वरूपाचे आणि उच्चतम दर्जाचे आहे".[१४] संत सोहिरोबानाथांनी आपल्या योगसाधना, भक्ती आणि वैराग्य या तत्त्वावरून असाध्य ते साध्य करून दाखवले आहे. इतकी बुद्धिमान व्यक्ती, तेज:पुंज दिव्य पुरुष आपल्या गोमंतकाच्या मातीत रुजली याच्या इतकी गौरवास्पद दुसरी गोष्ट होऊच शकत नाही.

## २.३ संत सोहिरोबानाथांची ग्रंथ रचना

गोमंतकीय संतांविषयी विचार करत असताना गोमंतवासियांच्या ओठावर पहिले नाव यावे असे गोमंतकीय संत कवी म्हणजे 'संत सोहिरोबानाथ आंबिये' होय. संत सोहिरोबानाथांनी आपल्या गुरुच्या आज्ञेवरून अवघ्या तीन - साडेतीन वर्षाच्या म्हणजे इ.स. १७४८ ते इ.स. १७५१ या अल्पकालावधीतच त्यांनी पाच अध्यात्मपर आणि तत्त्वज्ञानपर अशा स्वरूपाचे वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथांची रचना केलेली आहे. सोहिरोबानाथांच्या एकूण ग्रंथरचना पाहिल्या तर ज्ञानेश्वरी, दासबोध, अमृतानुभव यासारख्या आध्यात्मिक ग्रंथांची छाप त्यांच्यावर पडलेली दिसते. योग, अध्यात्म, भक्ती आणि आत्मविद्या या चौकोनी तत्वांचा सुंदर समन्वय सोहिरोबांनी आपल्या पाचही ग्रंथात साधलेला आहे. सोहिरोबानाथांचे ग्रंथ हे भक्तीयोग, ज्ञानयोग, आत्मस्वरूपाची अनुभूतीतून येणारे वैराग्य, संतांची लक्षणे, गुरु - शिष्य संवाद, अद्वैत भक्तीयोग, कर्मयोग, राजयोग, साधना मार्ग, अध्यात्म, तत्त्वज्ञान, भक्ती - मुक्ती योग, इत्यादी अनेक विषयांना अनुसरून निर्माण झालेले आहे. सोहिरोबानाथांचे ग्रंथ जसे संपूर्ण गोमंतकात प्रसिद्धीला पावलेले आहेत, तसेच भारताच्या इतर प्रांत प्रदेशातही नावारूपाला पावले आहेत. संत सोहिरोबानाथांच्या उपलब्ध ग्रंथ वाङ्मयाचा इकडे अभ्यास करण्यात आलेला आहे.

### २.३.१ सिद्धांतसंहिता

संत सोहिरोबानाथांचा 'सिद्धांतसंहिता' हा सर्वात पहिला ग्रंथ त्यांनी शके १६७० म्हणजे इ. स. १७४८ साली लिहिला. सिद्धांतसंहिता या ग्रंथात एकूण १८ अध्याय असून ७२९ संस्कृत श्लोक आणि ४९१७ ओव्या आलेल्या आहेत. हा ग्रंथ पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा दोन भागात विभागलेला आहे. नाथपंथी गुरु श्रीगोरक्षनाथांच्या आज्ञेवरून सोहिरोबानाथांनी या ग्रंथाची रचना केलेली आहे. सोहिरोबानाथांनी या ग्रंथात स्वतःला झालेल्या पूर्णज्ञानाचा अनुभव वर्णन केला आहे. या ग्रंथरचनेविषयी स्वतः सोहिरोबानाथ लिहितात -

**'केवळ मूढत्वचि वसे। चित्तेशी पै।**

**तेथ अवचटे इच्छा झाली।**

**सहज संस्कृत टिपी आली**

**तयी सिध्दांते आरंभिली। सर्व वाणी ।।**

**तेथे गगनाचे ठायी सहज।**

**बोलता नसेचि हे चोज।**

**दाखवूनि दे समाजा प्रतियोनि**

**सोहिरारचितं शास्त्र चैतन्योक्त तुमुक्तिदम्'** [१५]

अशा उस्फुर्त आणि मधूर वाणीने सहिरोबानाथांनी 'सिद्धांतसंविता' हा ग्रंथ कसा निर्माण झाला? या ग्रंथाचे निर्माण होण्यामागचे प्रयोजन काय? या ग्रंथाची फलश्रुती काय? अशा प्रश्नांचे निवारण या ओवीद्वारे सहिरोबानाथ करताना दिसतात. सोहिरोबानाथांना सिद्धांतसंहिता या ग्रंथातून साधकांना कोणता उपदेश करायचा आहे हे त्यांच्या या ग्रंथांमध्ये आलेल्या अध्यायांच्या विषयावरून समजते. सिद्धांतसंहिता या ग्रंथामध्ये आलेल्या १८ अध्यायांची नावे पुढील प्रमाणे नोंदवता येईल.

१) सदात्मस्वरूपयोग

२) भूतकर्दमसंगम

३) त्रिविधतापकथन

४) आर्तजिज्ञासुस्वर्थार्थीमुमुक्षुलक्षणकथन

५) शमदमाभ्यासायोग

६) जिज्ञासुज्ञानप्राप्तियोग

७) अर्थार्थीज्ञानयोगकथन

८) अज्ञानसंगफलयोग

९) विहगमीनमार्गसाधनयोग

१०) पिपीलिकामार्गसाधनयोग

११) षष्ठावतारतत्वकथन

१२) ज्ञानस्वरूप श्रीरामावतारकथन

१३) ज्ञानस्वरूप - कृष्णावतारकथन

१४) बौध्दकल्किज्ञानकलावतारयोग

१५) शुध्दव्यतिरेकयोग

१६) जन्मदुःखकथन

१७) नैष्कम्यसिध्दियोग

१८) पूर्णसमाधियोग [१६]

सिद्धांतसंहिता या ग्रंथात संत सोहिरोबानाथांनी एकूण साधना - साधक, योग, मुक्ती, भक्ती, अध्यात्मज्ञान, तत्वज्ञान, वैराग्य त्याचबरोबर प्राणी, निसर्ग, पुराण, पृथ्वीप्रतिमातून साकारलेले मनुष्य शरीर याविषयी विवेचन केले आहे.

**२.३.२ अद्वयानंद**

संत सोहिरोबानाथ आंबिये यांचा 'अद्वयानंद' हा दुसऱ्या ग्रंथ शके १६७१ म्हणजेच इ.स. १७४९ मध्ये लिहिलेला ग्रंथ होय. 'द्वैत्य' म्हणजे 'दोन' आणि 'अद्वैत्य' म्हणजे 'एक' यावरून 'अद्वयानंद' म्हणजे भेद नव्हे तर अभेद आणि दोन नव्हे तर एक म्हणजे अभेदाचा एकात्मतेचा आनंद म्हणजे 'अद्वयानंद' अशा अलौकिक ग्रंथाच्या शीर्षकावरून सोहिरोबानाथांच्या अध्यात्म, ज्ञान आणि तत्त्वज्ञानाचा विचार करता येईल. 'अद्वयानंद' या ग्रंथात एकूण आठ प्रकरणे आहेत. त्याचबरोबर ५५४ ओव्यांनी नटलेला असा हा ग्रंथ आहे. 'हरी ॐ' या पूर्वानुभवी परब्रम्ह गुरुला नमन करून या ग्रंथाची सुरुवात झालेली आहे. अद्वयानंद या ग्रंथात आलेल्या आठ प्रकरणांची नावे पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) प्रकरण पहिले - विश्वरुपनिजतत्त्वयोग**

**२) प्रकरण दुसरे - स्थूलदेहनिरुपण**

**3) प्रकरण तिसरे - सूक्ष्मदेहनिरुपण**

**४) प्रकरण चैथे - कारणमहाकारणशरीरनिरुपण**

**५) प्रकरण पाचवे - हठराजयोगे भेदाभेदविवरण**

**६) प्रकरण सहावे - सहजसमाधियोगोनाम**

**७) प्रकरण सातवे - अनादिस्वरूपयोग**

**८) प्रकरण आठवे – सद्सत्स्वरूपयोग** [१७]

**२.३.३ अक्षयबोध**

संत सोहिरोबानाथांचा ‘अक्षयबोध’ हा त्यांचा तिसरा ग्रंथ इ.स. १७४९ मध्ये लिहिलेला असून अद्वयानंद या ग्रंथाप्रमाणे अक्षयबोध या ग्रंथातही एकूण आठ प्रकरणांचा समावेश झालेला आहे. अक्षय बोध या ग्रंथाची ओवी संख्या ४०८ इतकी आहे. ‘अक्षय’ म्हणजे ‘अमर’, ‘अनंत’, ‘अनादी’ आणि ‘बोध’ म्हणजे ‘ज्ञान’, ‘बुद्धिमत्ता’, ‘विवेक’ अक्षयबोध म्हणजे सर्वव्यापी, अनंत, अमर, अनादी अशा परब्रम्हाच्या स्वरूपाचे बोध करून घेणे, ज्ञानर्जित करणे, विवेक, बुद्धिमत्ता यांच्या जोरावर आत्मस्वरूपाची ओळख करून घ्यायचा साधन मार्ग होय. असाच या ग्रंथ शीर्षकाचा अर्थ निघतो आणि असाच तो सोहिरोबानाथांनी सुद्धा घेतलेला असावा अक्षयबोध या ग्रंथात आलेल्या आठ प्रकरणाची नावे पुढील प्रमाणे नोंदवता येईल.

**१) प्रकरण  पहिले – स्वस्वरूपसमाधिराजयोग**

**२) प्रकरण दुसरे - स्वस्वरूप अद्वैत्य भक्तियोग**

**3) प्रकरण तिसरे - स्वस्वरूप वैराग्य**

**४) प्रकरण चैथे - स्वस्वरूप ज्ञानयोग**

**५) प्रकरण पाचवे - सव्दिवेक योग**

**६) प्रकरण सहावे - स्वस्वरूप विवेक**

**७) प्रकरण सातवे - स्वस्तरूप  बोधलक्षण**

**८) प्रकरण आठवे - मुक्तलक्षण निरूपण** [१८]

संत सोहिरोबानाथांच्या अक्षयबोध या ग्रंथाच्या प्रकरणांचे विषय पाहता ते सर्वच स्वस्वरूप या आध्यात्मिक भक्तीयोगाने साकारलेले आहेत. एकूणच अक्षयबोध हा अध्यात्म, तत्त्वज्ञान आणि भक्तीयोग या

तिन्ही तत्त्वांना स्पर्श करणारा हा ग्रंथ आहे. आत्मस्वरूपाची ओळख करून देणारा साधन मार्ग म्हणून या ग्रंथाचे वैशिष्ट्य नोंदवता येईल.

**२.३.४ श्रीमहदनुभवेश्वरी**

संत सोहिरोबानाथ आंबिये यांनी ‘श्रीमहदनुभवेश्वरी’ हा ग्रंथ इ. स. १७५० मध्ये लिहिलेला आहे. त्यांच्या अन्य चार ग्रंथापैकी हा ग्रंथ सर्वात मोठा असून एकूण या ग्रंथामध्ये १८ अध्याय आणि ९०९३ ओव्या आलेल्या आहेत. सोहिरोबानाथांचा श्रीमहदनुभवेश्वरी हा ग्रंथ त्यांच्या सिद्धांतसंहिता, अद्वयानंद, अक्षयबोध व पूर्णाक्षरी या चार ग्रंथाप्रमाणे पारमार्थिक विषयाला समर्पित असलेला हा ग्रंथ आहे. प्रामुख्याने महदनुभवेश्वरी या ग्रंथाचे स्वरूप गुरु - शिष्य संवादात्मक असे आहे. महदनुभवेश्वरी या ग्रंथाच्या शीर्षकावरून सोहिरोबानाथांनी या ग्रंथाचे सार सुचित केले आहे. ‘मानवाचे जीवन म्हणजे विविध अनुभवांचे गाठोडे. जीवनात आनंद मिळविण्यासाठी माणूस विविध अनुभवांच्या वाटेवरून पुढे जात असतो. या सगळ्या अनुभवातील महत् अनुभव म्हणजे ईश्वराच्या साक्षात्काराचा अनुभव. हा अनुभव माणसाचे जीवन अर्थपूर्ण करतो. ह्या अनुभवाचे स्वरूप काय?, त्याचे साधन काय?, तो कसा प्राप्त करायचा? हे सांगण्यासाठीच नाथांनी ‘श्रीमहदनुभवेश्वरी’ हा ग्रंथ लिहिला आहे.[११] संत सोहिरोबानाथ आंबिये वीरचित श्रीमहदनुभवेश्वरी या ग्रंथाच्या अठरा अध्यायांची नावे पुढीलप्रमाणे सांगण्यात आलेली आहेत.

**१) अध्याय पहिला – परमार्थयोग**

**२) अध्याय दुसरा - परतत्त्वयोग**

**३) अध्याय तिसरा - स्वात्मप्रभादैविकीयोग**

**४) अध्याय चौथा - महतत्त्वयोग**

**५) अध्याय पाचवा - गुणत्रययोग**

**६) अध्याय सहावा - पंचमहाभूतयोग**

**७) अध्याय सातवा - जीवेश्वरयोग**

**८) अध्याय आठवा - कर्मयोग**

**९) अध्याय नववा - राजविद्याराजगुह्ययोग**

**१०) अध्याय दहावा - ज्ञानयोग**

**११) अध्याय अकरावा - संन्यासयोग**

**१२) अध्याय बारावा - अभ्यासयोग**

**१३) अध्याय तेरावा - राजयोग**

**१४) अध्याय चौदावा - भक्तियोग**

**१५) अध्याय पंधरावा - वैराग्ययोग**

**१६) अध्याय सोळावा - तत्त्वमसिमहावाक्ययोग**

**१७) अध्याय सतरावा - क्षराक्षर उत्तम पुरुषयोग**

**१८) अध्याय अठरावा - पूर्वार्जित ईश्वरेच्छायोग** [२०]

संत सोहिरोबानाथांचा 'श्रीमहदनुभवेश्वरी' हा संपूर्ण ग्रंथ योगशास्त्रावर आधारलेला अध्यात्मिक ग्रंथ आहे. एकूण १८ अध्यायावर केवळ योगशास्त्राचा प्रभाव नसून 'योग' हेच या ग्रंथाचे मूळ तत्व आहे. श्रीमहदनुभवेश्वरी या ग्रंथाच्या अध्यायांचे विषय पाहिले तर ते सर्वच योग साधनेने व्यापलेली आहेत. विविध अध्यायाद्वारे सोहिरोबानाथांनी परब्रह्माचे एकरूपत्व मान्य केले आहे. हे तत्त्वज्ञान, ज्ञान, भक्ती, वैराग्य व बोध याबद्दल आहे. गुरुच्या माध्यमातून शिष्याला पारमार्थिक स्वरूपाचे अनुभव प्राप्त होते. याचे तत्व प्रतिपादन करणारा श्रीमहदनुभवेश्वरी हा ग्रंथ आहे. सोहिरोबानाथातील कवी, साधक, तत्त्वज्ञ, अध्यात्म, योग साधना,

आत्मानुभावी योग व भक्ती अशा कितीतरी गुणांचे दर्शन या ग्रंथांमध्ये आढळते. भक्ती आणि योग यांचे ज्ञानेश्वरीसारखे वर्णन या ग्रंथात येते. बा. द. सातोस्कर लिहितात “सोहिरोबानाथांनी जे भक्ती, ज्ञान, वैराग्यपर पाच ग्रंथ लिहिले त्यातील ‘महदनुभवेश्वरी’ हा सर्वात मोठा ग्रंथ असून तो ज्ञानेश्वरीच्या धरतीवर ओवी छंदात लिहिलेला आहे. तो ज्ञानेश्वरी एवढाच म्हणजे नऊ हजार ओव्यांचा आहे व त्यात ज्ञानेश्वरी प्रमाणेच १८ अध्याय आहेत. पण हे साम्य फक्त ग्रंथ विस्तार, अध्यायांची रचना व त्यांची नावे अशा बाह्य गोष्टी पुरतेच आहे.” [२१]

### २.३.५ पूर्णाक्षरी

गोमंतकीय संत कवी सोहरोबानाथ आंबिये यांनी ‘पूर्णाक्षरी’ हा ग्रंथ इ. स. १७५१ साली लिहिला. या ग्रंथात एकूण ४८९ ओव्या असून ९ प्रकरणे आहेत. या ग्रंथात सोहिरोबानाथांनी साधूची लक्षणे सांगितलेली आहेत. साक्षात्कारी, सिद्धयोगी साधूची ओळख कशी जाणून घ्यावी यासंबंधीचा उपदेश या ग्रंथात सोहिरोबानाथांनी केलेला आहे. अज्ञानी लोकांचे वर्णन, भक्ती, ज्ञान, वैराग्य आणि विवेक, बोध, समाधी यांचे वर्णन करून शेवटी सद्गुरुमहिमा वर्णन केलेला आहे. परमार्थाच्या मार्गावर घेऊन जाणारी आणि समाजात साधूंचे मुखवटे घालून मिरवणाऱ्या खोट्या साधूंची आचरणे पूर्णाक्षरी या ओवीबद्ध काव्यग्रंथात सोहिरोबानाथांनी मांडलेले आहेत. पूर्णाक्षरी या ग्रंथाच्या नऊ प्रकरणाची रचना ही अर्थपूर्ण व विषयानुरूप झालेली आहे. संत सोहिरोबानाथ आंबिये विरचित पूर्णाक्षरी या ग्रंथामध्ये समावेश झालेल्या नऊ प्रकरणाच्या विषयांची नावे पुढीलप्रमाणे नोंदवता येईल.

**१) प्रकरण पहिले - संतांतःप्रतीतियोग**

**२) प्रकरण दुसरे - अज्ञानलक्षणनिरूपण**

**३) प्रकरण तिसरे - एकात्मभक्तियोग**

**४) प्रकरण चौथे - ज्ञानयोग**

**५) प्रकरण पाचवे - वैराग्ययोग**

**६) प्रकरण सहावे - विवेकनिरूपण**

**७) प्रकरण सातवे - पूर्णबोधनिरूपण**

**८) प्रकरण आठवे - सहजसमाधियोग**

**९) प्रकरण नववे – गुरुवाक्यप्रसादस्तवन** [२२]

वैष्णव प्रिय संत तुकारामांनी आपल्या अभंगाद्वारे साधू संतांचे महात्म्य वर्ण लिहिलेले आहे आपल्या अभंगवाणीतून त्यांनी खरा साधू कसा असावा खरा साधू कसा ओळखावा याचे वर्णन आपल्या अभंगातून मांडलेले दिसून येते.

**'जे कां रंजले गांजले,**

**त्यासि म्हणे जो आपुले**

**तोचि साधू ओळखावा**

**देव तेथे ची जाणावा'**. [२३] (संत तुकाराम)

तेच गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये आपल्या पूर्णाक्षर या ग्रंथात 'तोचि साधू' म्हणून खऱ्या साधू संताचे आचरण, लक्षण कसे असते याविषयी साधकांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन करतात. खऱ्या साधूचे आचरण सांगताना सोहिरोबानाथ म्हणतात.

**"आपुलिया वेषा न भुले । अंतर जाणूनि आपुलें ।**

**देखें जगाचे निर्जिव बाहुले । तोचि साधु ॥२१॥"** [२४]

खऱ्या साधूच्या विवेकरुपी आचरणाचे दर्शन घडविताना सोहिरोबानाथ म्हणतात की,

**"जो अक्षय भुवनीचा भूप । कवणी न लाविता दीप ।**

**विवेकनचे रूप। असे तोचि साधु॥ ३७॥"** [२५]

### २.३.६ देहदुर्ग बखर

गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये यांनी भक्ती, ज्ञान आणि वैराग्य या तत्त्वांना आपल्या देहात आत्मसात करून तत्त्वज्ञान व आध्यात्मिक स्वरूपाचे पाच ग्रंथ निर्माण केले. 'सिद्धांतसंहिता, अक्षयबोध, अद्वयानंद, श्रीमहदनुभवेश्वरी आणि पूर्णाक्षरी' हे ते पंचांगुणांनी भरलेले पाच ग्रंथ होय. सोहिरोबानाथांनी आपली ग्रंथरचना ओवीबद्ध स्वरूपात केली. तर पद रचना, अभंग रचना या काव्या स्वरुपात केल्या असल्या तरी 'देहदुर्ग बखर' हा त्यांचा ग्रंथ गद्य स्वरूपात व बखरीच्या शैलीत लिहिलेला आढळतो. 'इतर बखरी प्रमाणे संस्कृत वाक्यांनी प्रारंभ करून पुढे पेशवाईतील जुन्या वळणाची मराठी भाषा वापरली आहे. तसेच उर्दू, फारसी शब्दांचा उपयोगही खूप केलेला आहे. आपला उपदेश सहजपणे श्रोत्यांना समजावा म्हणून सहज आणि सुंदर रूपक, दृष्टांताचा वापर सोहिरोबांनी केलेला आहे. सोहिरोबानाथ हे प्रसंगानुसार रूपके वापरण्यास वा खेळविण्यात कुशल होते हे त्यांच्या पद्यावरून व काव्यावरून दिसून येते. त्याचप्रमाणे देहदुर्ग बखर ही मानवी देहाचे रूपक साधून निर्माण केलेली ही बखर आहे. 'देह' म्हणजे 'मानवी शरीर' आणि 'दुर्ग' म्हणजे 'किल्ला' 'किल्ल्याचे रूपक रचून योगशास्त्राच्या पारिभाषिक शब्दांच्या साहाय्याने परमार्थ यथायोग्य विशद केला आहे'.[२६]

'देहदुर्ग' या बखरीचा प्रारंभ ऐतिहासिक कागदपत्रांच्या थाटात लिहिला असून शेवट मात्र मराठी ओव्यांनी केला आहे. सर्वब्रह्मंडव्यापी सकलगुणालंकृत असा निरंजन, सच्चिदानंद परमात्मा हा सोहिरोबानाथांचा ईशस्वामी आहे. त्यानेच सोहिरोबानाथांना म्हणजे मानवाला देहदुर्ग सांभाळण्याचे कार्य दिले'.[२७]

'देहाला किल्ल्याचे रूपक व परमात्मा हा त्याचा धनी अशी कथा सांगणारा हा गद्यग्रंथ आहे'[२८] 'देहदुर्ग म्हणजे अध्यात्मिक स्तरावर हे युद्ध कसे झाले व त्यात परमात्मतत्त्वांचा कसा विजय झाला याचे

सोहिरोबानाथांनी काढलेले हे स्वानुभवनिष्ठ, योगशास्त्रीय, राजकारणगत शब्दचित्र आहे, हा मराठी बखर वाङ्मयाचा एक अनोखा नमुना आहे'[२९] असे भक्ती महाजन यांनी आपल्या प्रबंधिकेत मांडले आहे.

## २.४ संत सोहिरोबानाथांची पद रचना

संत सोहिरोबानाथ आंबिये यांनी अध्यात्म व तत्त्वज्ञानपर महात्म्य सांगणारे आणि जनांचे हितचिंतन व उद्बोधन करणारे पाच श्रेष्ठ ग्रंथ रचले. सोहिरोबानाथांचे 'सिद्धांतसंहिता, अक्षयबोध, अद्वयानंद, श्रीमहदनुभवेश्वरी आणि पूर्णाक्षरी' हे पाच आध्यात्मिक ग्रंथ जसे वैशिष्ट्यपूर्ण आणि अभ्यासनीय आहेत; त्याचबरोबर सोहिरोबानाथांची  पद रचनाही वैशिष्ट्यपूर्ण व उच्च दर्जाची आहे. सोहिरोबानाथांच्या पदांचे स्वरूप विशद करत असताना त्यात नाम महिमापर पदे, कारुण्य पदे, उपदेशपर पदे, वेदांतपर पदे, भगवंत स्वरूपर पदे, संत महिमानपर पदे, सद्गुरु महिमानपर पदे, प्रासंगिक पदे, संत लक्षणे वर्णिलेली पदे, मुमुक्षुस्थिती निदर्शक पदे, स्वानुभवपर पदे, सगुण भक्तीपर पदे, अवतारलीलावर्णनपर पदे, नाथपंथी लक्षणे दर्शविलेली पदे, तत्त्वज्ञानपर पदे, प्रापंचिक पदे, इत्यादी विविध विषयांना घेऊन नाथांनी पद रचनांची निर्मिती केलेली आहे. त्याचबरोबर श्रीराम भक्तीपर पदे, श्रीकृष्ण भक्तीपर पदे, श्री शंकराविषयी पदे, रचलेली आहे.

सोहिरोबानाथांच्या पदाद्वारे त्यांच्या सामाजिक कर्तृत्वाचा विचार करता येईल. वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यासाचाही विचार करता येईल. इतकी त्यांची पद रचना सुबळ आणि सुरस आहेत. श्री. गं. दे. खानोलकरांच्या शब्दात सांगायचे झाले तर "त्यांचे एकेक परमार्थपर पद हा एकेक गीतबद्ध विचार आहे".[३०] संत सोहिरोबानाथांच्या कविता विषयी बा.द. सातोस्कर लिहितात "त्यांची कविता हा स्वतंत्र बुद्धीचा विलास आहे आणि त्यांच्या विरागी वृत्तीतून त्यांना ती स्फुरली आहे".[३१]

सुहासिनी इर्लेकर लिहितात "मराठी संतांची गीत रचना ही प्रामुख्याने अभंगाश्रयी आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकारामादी संतांचा एखादा भावोत्कट अभंग बघता बघता गीतरूप धारण करताना दिसतो."[३२] तसेच गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबियेंनी रचलेले अभंगही पद रूपाला वा गीत रूपाला आजवर पावलेले दिसून येतात. सोहिरोबानाथांच्या पद रचनेच्या प्रसिद्धीविषयी प्रा. आशा मणगुतकर लिहितात

“सोहिरोबांच्या पदरचनेने त्या काळी संपूर्ण कोकणालाच गुंगवून टाकले होते. कीर्तनकार, गवयी व गायिका सुद्धा फार मोठ्या प्रमाणात त्यांच्या पदांचा वापर करीत असत”.[३३]

प्रस्तुत अनुच्छेदात ‘संत सोहिरोबानाथांची पद रचना’ या विषयांतर्गत सोहिरोबानाथ आंबिये यांची उपदेशपर पदे, वेदांतपर पदे, तत्त्वज्ञानपर पदे, श्रीराम - श्रीकृष्णाची पदे, सद्गुरु विषयीची पदे, अशा वर्गीकरणातून पदांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**२.४.१ उपदेशपर पदे**

संत सोहिरोबानाथांची ‘उपदेशपर पदे’ ही संसारात गुरफटलेल्या जीवांना, साधकांना मुक्तीचा मार्ग दाखविण्यासाठी रचलेली पदे आहेत. आपला देह हा नश्वर आहे. तो खोटा आहे. या विश्वात केवळ परब्रम्ह हेच एक तत्व सत्य आहे. तेच अविनाश आहे आणि तेच सर्वव्यापी चिरंतन असल्याचे सोहिरोबानाथ सांगतात. आपल्याला दिसते की केवळ प्रपंच हेच सत्य आहे. पण तोही एक मायाजाळ असल्याचे सोहिरोबानाथ आपल्या पदातून सांगताना दिसतात.

**भगवन्ताला स्मराल, तरि हा भवसागर तुम्हि तराल हो ।**

**पापामधें न रहाल, शुद्ध हें पुण्यचि करा तराल**

**आणि योगी व्हाल, तर मोहफणीचे विष उतराल हो ॥**

किंवा

**काढुनि भेदाचें जोडवें परे पैलाड पडावे**

**तेथे आनंदें क्रीडावें**

**वासना लुगडें फेडुनि व्हावें कीं उघडें**

**सुख बोलतां कातडें**[३४]

किंवा

**ज्ञानसूख या अमला पाजुनि ।   मला पूर्ण समाधी लावुनि ॥**

**अव्दयकमला विकास करूनी । मोहांतुनि उद्धरि तूं ॥** [३५]

पापामध्ये न राहता शुद्ध पुण्य करा. एक खरा योगी व्हायचे असेल तर कोणत्याही गोष्टीत मोह ठेवू नका. माणसामध्ये स्वार्थ, क्रोध, लोभ, मोह, वासना, अहंकार, मत्सर, या सारख्या अवगुणातून माणूस साकारलेला असतो. या अवगुणावर मात करून त्या अदिपुरूषाला अनुसार तेव्हाच तुम्हाला भगवंताचे स्वरून प्राप्त होईल. तेव्हाच सत्याचा शोध लागेल. वासनेचे लुगडे उतरूवून सत्याची शाल पांघरावी. असे सोहिरोबानाथ माणसाच्या देहात आसलेल्या गुणांना आव्हान करतात. तर अवगुणांना मागे सारा असा उपदेश करतात.

**सोहिरा म्हणे पूर्ण ज्योति  । तेथें कैंचि दिवस राति ॥**

'आत्मअज्ञानावीण सर्वकाही व्यर्थ आहे. वरील  काव्य ओळ साधी, सोपी आणि सरळ असली तरीही ती बराच व्यापक स्वरूपाचा अर्थ उत्पन्न करते. स्वार्थ, अहंकार, मोह, द्वेष, मत्सर, लोभ यासारख्या मनोविकारामुळे अज्ञान निर्माण होते; तर सदाचार, विवेक, नीती, संयम, दया, प्रेम, क्षमा, करुणा, सत्य, शांती, अहिंसा, सहानुभूती इत्यादी सारख्या सदगुणामुळे ज्ञानाची प्राप्ती होते. आध्यात्मिक प्राप्तीसाठी आत्मोज्ञतीची जेवढी आवश्यकता असते तितकीच ती समाजोद्धारासाठी ही आवश्यक आहे असे सोहिरोबाथांनी म्हटले आहे'. [३६]

**'हरिस्मरण सुख हैं जरि घे । तरि मोह मनीं न रिघे**

**श्रवण मनन निदिध्यासें करुनि रज तम हा डाग निघे ॥'**

किंवा

**'भगवन्ताचे गुण गा रे**

**श्रवण मनन निदिध्यासाविण क्षण एक**

**नको राहूं उगा रे’** [३७]

हरिनामाचे नामस्मरण करायलाला लावणारी उपदेशपर पदे सोहिरोबानाथांनी रचलेली आहे. संत सोहिरोबानाथ म्हणतात हरिनाम स्मरणाने संसारिक आणि कष्टमय जीवनात मनाला संतोष मिळतो. नामस्मरण हा एक साधनमार्ग वा मूलमंत्र म्हणून सोहिरोबानाथांनी नामस्मरण करण्यावर भर दिलेला दिसून येतो. मवाळ शब्दात लोकांना ज्ञानमार्गाचा, सत्व - तत्त्वाचा उपदेश करणारे सोहिरोबानाथ काही वेळा ते करारी शब्दात, परखड भाषेतही जनउद्बोधन करताना दिसतात ते म्हणतात.

**‘नाम एकाचे**

**न घेति फुकाचें**

**ते नरकाचे**

**पाहुणे रे’**

किंवा

**‘तो काय प्राणी ? विसरला हरिला जन्मापासून**

**करितां संसार धंदा आठविना गोविंदा**

**नित्य करी द्वेष निंदा सांपडला भवबंधा**

**चिंतेनें चूर केला ग्रासून**

**भुलला जो शब्दनादीं संतोषला शास्त्रवादीं**

**कीर्तीसाठीं विद्या साधी त्याला अभिमान बाधी**

**नाना छंदीं बुद्धी गेली नासून’** [३८]

अशा संतप्त शब्दात त्यांनी या विश्वाच्या भवसागरातील जीवांना वटणीवर आणण्याचा प्रयत्न आपल्या नामहिमा उपदेशपर पदातून केलेला आहे. सोहिरोबनाथांचे विशेष असे वैशिष्ट्य या उपदेशपर पदातून जाणवते ते म्हणजे स्वतः त्यांनी मोक्षप्राप्तीसाठी खडखडीत योगसाधना करून भक्ती, ज्ञान, वैराग्य ही त्रिसूत्री आपल्या देहात स्थापन केली. पण साधकांसाठी, मुमुक्षितासाठी आणि या भवसागरातील जीवांसाठी त्यांनी मात्र साध्या, सोप्या, सरळ भक्तिमार्गा सांगितलेला आहे. म्हणून ते जनसामान्याना भक्तीमार्ग सोप्या शब्दात सांगताना त्यांच्या पुढील पदाच्या ओळी.

**'सद्सद्विचार कांहीं करू या रे**

**एक वेळ परम हा दुर्घट, दुस्तर भवसागर तरू या रे'** [३९]

किंवा

**'दोरचि परि हा भुजंग भासत प्रपंच तद्वत माव**

**नित्य अनित्य विलोकुनि अंतरिं दृढ धरी सद्भाव रे'** [४०]

कितीही वाईट परम दुर्घट संकटाची वेळ आली तरी ती अशा चांगल्या सदसदविचाराने टाळता येईल. सद्सद्विचाराच्या बळावरच मानव या विस्तृत भवसागरातून तरुन वर येऊ शकतो. अशी सद्सद्भावाची महती त्यांच्या अनेक पदातून प्रकट झालेली दिसते. संत सोहिबानाथांच्या उपदेशपर पदांतून त्यांच्या सामाजिक व धार्मिक कर्तुत्वाचाही इकडे विचार केलेला आहे.

### २.४.२ वेदान्तपर पदे

संत सोहिरोबानाथांची वेदान्तपर पदे ही बहुतांशी आध्यात्मिक स्वरूपाची आणि तत्त्वज्ञानपर स्वरूपाची आहे. सोहिरोबानाथांनी आपल्या वेदांतपर पदांतून परब्रम्हाचे स्वरूप म्हणजे 'ब्रह्म सत्यम् जगत मिथ्या' हेच तत्व पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रपंच्याच्या भवसागरातून तारून आल्यावर प्राप्त

होणारी समाधी अवस्था याविषयी त्यांची वेदान्तपरपदे असलेली दिसून येतात. परमेश्वर हेच खरे सत्य आहे, वैराग्याच्या योग मार्गावर चालताना मिळणारे अनुभव आणि शेवटी समाधी अवस्था प्राप्त झाल्याचे स्वरूप इत्यादी अनेक विषयांची गहन चर्चा त्यांच्या वेदान्त विषयक पदांतून प्रकट झालेली आहे.

"सोहिरोबा हे विशुद्ध निर्गुण ब्रह्माचे उपासक असल्याने जातीपाती, कर्मकांडे, धर्मवाद असल्या भ्रमक कल्पना, संकल्पनांना ते निग्रहपूर्वक विरोध करताना दिसतात".[४१] "आध्यात्म प्राप्तीसाठी प्रपंच सोडलाच पाहिजे असे नाही; तर तो करीत असता चित्ताची एकतानता फक्त भगवंताकडेच असली पाहिजे असा आग्रह त्यांनी धरलेला दिसतो".[४२]

सोहिरोबानाथांची वेदान्तपर पदे ही प्रामुख्याने समाधी अवस्थेचे दर्शन घडविणारी पदे आहे. उदाहरणार्थ

**'म्हणे सोहिरा अंगीं जडला  आधिच आहे, नाहीं घडला**

**प्राणी हा संदेहीं पडला   उपाधींत सांपडला**

**त्याचे दृष्टीं ईश्वर दडला   ऐसा वेदांतीं निवडीला**

**तो हो व्यापक आत्मा अंतरसाक्षि परिपूर्ण सनातन गोड दिसे गातां'** [४३]

सोहिरोबानाथांच्या अंगी बालपणापासूनच वैराग्य होते त्यांनी भक्ती ज्ञान आणि अध्यात्म या साधनेतून आपल्या अंगी वैराग्याची प्रतिष्ठा प्राप्त केली आहे पंचभूतातून म्हणजे आकाश पृथ्वी जल वायू आणि अग्नी या पाच तत्त्वापासून माणसाची अस्तित्व दर्शवलेली आहे त्यांची वेदांत परपदी ईश्वर प्राप्तीच्या व अध्यात्माच्या मार्गावर नेणारी आहे उदाहरणार्थ

**'प्रपंच ही मायेची भाव    सुखदुःखाचे बसती घाव**

**एकवेळ निरंजनिं पाव    तत्व हें पंचवीसावें'** [४४]

किंवा

**'सोहिरा म्हणे गाढा नाडा पंचभूतांचा झाडा**

**यांतुनि हैं चित्त काढा अभिनाश गुरुपद जोडा रे जोडा रे'** [४५]

संत सोहिरोबानाथांची वेदान्तपर पदे ही ईश्वर, प्रपंच, परमात्मा, आध्यात्म, तत्त्वज्ञान, चिरानंद, आदिनाथ या तत्त्वांच्या केंद्रवर्ती असलेली दिसून येते. पंचभूतांपासून मानवी शरीर बनलेली आहे आणि त्यामुळे माणसांमध्ये लोभ, मोह, माया, क्रोध, मत्सर, स्वार्थ, अहंकार, वासना, यासारख्या विविध षडरिपुंचाही समावेश माणसांमध्ये झालेला आहे. प्रपंच ही जणू मायाच आहे. तेथे सुखदुःखाचे घाव लागतात. त्यावेळी नित्य निरंजनाची (ईश्वराची) प्रार्थना करायला भाग पडत. आणि पंचविसावे तत्व म्हणजे 'मन' या मनाच्या सखोलतेमध्ये जाऊन त्या चिरानंदाचे स्वरूप जाणून घ्यावे अशी सोहिरोबानाथांची वेदान्त विषयक पदे जनताजनार्दनांना सतमार्गावर घेऊन जाणारी शिकवण देतात.

**'आम्ही नहीं हो पांचांतले,**

**नहीं पंचविसांतले एवढ्यालहि वळखोनिया,**

**वेगळे आम्हीं आंतले'** [४६]

या पदातून प्रामुख्याने सोहिरोबानाथांनी मानवी देहाला आकारास आणणारी जी तत्वे आहे त्याविषयी हे पद भाष्य करताना दिसते. उदाहरणार्थ 'पाचाकले' म्हणताना सोहिरोबांनी पाच ज्ञानेंद्रियांचा विचार केलेला आहे 'नाक, कान, डोळे, जीभ, त्वचा' ही पाच तत्वे आणि 'पंचविसांतले' म्हणजे 'पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, नाक, कान, डोळे, जीभ, त्वचा, शब्द, रूप, रस, स्वच्छ, स्पर्श, गंध, वाणी, हात, पाय, मलद्वार, पुरुषत्व, महतत्व, प्रकृती, अहंकार आणि मन' ही जी पंचवीस मानवी देहाला कारास आणणारी प्रापंचिक तत्वे आहेत त्यांचा उल्लेख सोहिरोबानाथांनी इकडे केलेला दिसून येतो, किंबहुना हाच अर्थ सोहिरोबानाथाना अपेक्षित आहे.

### २.४.३ तत्त्वज्ञानपर पदे

संत सोहिरोबानाथ आंबिये यांच्या तत्त्वज्ञानपर पदांचा विचार करत असताना सोहिरोबानाथांची तत्त्वज्ञानपर पदे ही तत्त्वज्ञान देणारीच पदे आहेत. त्या पदांना आध्यात्म आणि वैराग्याची कडकडीत धार लाभलेली आहे. जगातील जनांना, मुमुक्षांना, समाजातील भरकटलेल्या जीवांना तत्त्वज्ञानाच्या वाणीतून उपदेश करणारी ही पदे आहेत. उदाहरणार्थ

**'म्हणे सोहिरा पापपुण्य दोनी   घडति कर्मबीजापासोनी**

**बीजचि कीं तें नासुनि   मजवरि कृपा करीं लवकरि तूं'** [४७]

अशा पदरचनेतून सोहिरोबानाथांनी जनता जनार्दनांना पाप पुण्याचे सत्व पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे पाप पुण्याची उदाहरण देताना कर्मवीराच्या माध्यमातून ते त्या अनादी अनंत चिरानंदाच्या स्वरूपाचे वर्णन करताना दिसतात.

**'जीवा तूं पक्षी उदास होई,   ऊर्ध्वमूल महारूखी**

**पुनरपि इच्छुनि पडूं नको    या प्रपंच परम दुःखीं'** [४८]

अशा प्रकारचे सोहिरोबानाथांचे प्रापंचिक तत्त्वज्ञान सांगणारी पदे आजही गोमंतकीयांच्या जिभेवर नाचतात. सोहिरोबानाथांची भक्ती ही निर्गुण स्वरूपाची असल्यामुळे त्यांच्या धारधार भाषेने या पदांची निर्मिती झालेली आहे.

**२.४.४ राम – कृष्ण अवतारलीलावर्णनपर पदे**

संत सोहिरोबानाथ आंबिये यांची भक्ती ही निर्गुण भक्ती असली तरी सुद्धा ते सगुणभक्तीचाही पुरस्कार करताना दिसतात. सोहिरोबानाथांनी भगवान विष्णूच्या दशम अवतारातील 'श्रीराम' हा सातवा अवतार व 'श्रीकृष्ण' हा आठवा अवतार या दोन अवतारांचे लीलावर्णन करून भक्तीपर पदे रचलेली आहेत.

**२.४.४.१ श्रीरामाची पदे**

**'राम धनी माझा**

**अलगट देखेन मी कधिं हो**

**निज ज्योति कळा   दाविं घननिळा**

**सोहिरा शरण तव निजपदिं हो'** [४९]

**२.४.४.२ श्रीकृष्णाची पदे**

**'येई बा हरि सांवळिया**

**अहर्निशीं गोधनें चारिशी न दिसशी गोवळिया**

**सहस्त्र गोपींत तू खेळशी आनंदें घालिशि गोंधळिया**

**कदंबाचे तळीं मुरलि वाजतां ऐकुनि येति मज कळवळिया**

**सर्व रूपिं तूंचि एक देखुनी सोहिरा म्हणे गातों लळिया'** [५०]

किंवा

**'तो हरि स्मर गोकुळिं कान्हा**

**मधुसूदन मुखकमलामोदीं मधुकर प्रीती**

**गोपवधू त्या रतिसुखलालन अमृतपाना'** [५१]

## २.४.५ सद्गुरूविषयक पदे

संत सोहिरोबानाथ आंबिये यांनी सद्गुरूविषयीची पदे रचलेली आहे. ती त्यांनी आपल्या नाथसंप्रदायिक गुरु 'गोरक्षनाथांना' उद्देशून रचलेली आहेत. समाजातल्या भरकटलेल्या लोकांना गुरुपदेशाची आवश्यकता असते आणि सद्गुरूसंगती लाभल्यावर माणूस जे काही ज्ञान, भक्ती, वैराग्य, अभ्यास प्राप्त करतो ते ज्ञान, भक्ती, वैराग्य, अभ्यास यातून आध्यात्माच्या मार्गावर जाण्यासाठी माणूस अग्रसर होतो आणि शेवटी त्याला त्या चिरंतन परमात्म्याचे स्वरूप जाणवते. आत्मा परमात्माशी एकरूप होतो. आपल्या अंतरी असणाऱ्या निर्गुणांचा शोध घेऊन त्यांना मुळापासून समाप्त करून तेथे सद्गुणाचे रोप लावावे ते लावणारे, त्याविषयी तत्व शिकविण्यासाठी सद्गुरूसंगतीची गरज लागते. सोहिरोबानाथांनी सद्गुरूंना उद्देशून रचलेली ही पदे वैशिष्ट्यपूर्ण आहेत तशीच लक्ष वेधनिय सुद्धा आहेत.

**'मन हें आजी सच्चिदानंदें वेधलें**

**जन्मा येउनि परमसुख हें साधलें**

**अंतरीं मी हा कवण ऐसें शोधिलें**

**सहज ब्रह्मबोधें बोधिलें'** [५२]

किंवा

**'सद्गुरूकृपेचें हें देणें समाधान केलं तेणें**

**नामरूप नहीं ज्याला ऐसा गैबची कीं झाला'** [५३]

## २.५ समारोप

संत सोहिरोबानाथ आंबिये यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास इकडे झालेला आहे. संत सोहिरोबानाथांनी मराठी भाषेला जे मौलिक योगदान दिलेले आहे; त्याचाही यथायोग्य अभ्यास इकडे केलेला आहे. आपल्या अंगी बाणलेले भक्ती, ज्ञान व वैराग्य आणि या तत्त्वातून त्यांना झालेली आध्यात्माची प्रचिती, त्यातून प्राप्त झालेले चिरानंदाचे स्वरूप व शेवटी त्यांना लाभलेली समाधीचे स्वरूप याचा सखोलतेने अभ्यास झालेला आहे. अनुच्छेदानुसर सोहिरोबानाथांच्या ग्रंथांचा अल्प परिचय करून देण्यात आला आहे. त्यानंतर ग्रंथातून सोहिरोबानाथांनी मांडलेले तत्वज्ञान व आध्यात्मिक विषय यांचा इकडे या प्रकरणात अभ्यास झालेला आहे. सोहिरोबानथांनी विपुल आणि विविध विषयांना अनुसरून जी पद रचना केलेली आहे तिचाही विषयानुरूप सुसंगतपणे अभ्यास केलेला आहे.

## २.६ निष्कर्श

१) संत सोहिरोबानाथ आंबिये हे नाथ संप्रदायी कवी असल्यामुळे त्यांची भक्ती ही निर्गुण भक्ती असलेली दिसते.

२) मराठी भाषेबरोबरही सोहिरोबानाथांचे हिंदी, कोकणी, आणि संस्कृत या भाषांवरही चांगले प्रभुत्व होते. उत्तरेस यात्रा करताना सोहिरोबांनी हिंदी भाषेतून अभंग रचना, पद रचना, ओवीरचनाही केलेली होती.

३) सोहिरोबानाथांनी आध्यात्मिक व तत्त्वज्ञान विषयावर विपुल लेखन केलेले आहे.

४.) संत सोहिरोबानाथांची भक्ती ही निर्गुण असली तरी ते आपल्या पद रचनातून सगुण भक्तीचा पुरस्कार करतात.

५) सोहिरोबानाथांचे लेखन हे संख्यात्मक तथा गुणात्मक दृष्ट्या पाहता अतिशय श्रेष्ठोत्तम स्वरूपाचे आहे.

६) सोहिरोबानाथांच्या ‘सिद्धांतसंहिता, अद्वयानंद, अक्षयबोध, श्रीमहदनुभवेश्वरी आणि पूर्णाक्षरी’ हे पाच ग्रंथ तत्त्वज्ञान व आध्यात्माचा विस्तार करणारे ग्रंथ आहे

७) 'सिद्धांतसंहिता' हा त्यांचा ओवीबद्ध ग्रंथ असून तो 'संस्कृत' भाषेत आहे. यावर त्यांचे संस्कृत भाषेवरचे प्रभुत्व वैशिष्ट्यपूर्ण आहे.

८) सोहिरोबानाथांचा 'श्रीमहदनुभवेश्वरी' हा ग्रंथ योगशास्त्रावर आधारित आहे. या ग्रंथामध्ये येणारे सगळे अध्याय व त्या अध्यायांची नावे ही योगाचे महात्म्य वर्णविणारी आहेत. एकूणच 'योगशास्त्र' हा या ग्रंथाचा पाया आहे

९) सोहिरोबानाथांचे पाचही ग्रंथ हे आध्यात्माचे वर्म सांगणारे आहेत.

१०) सोहिरोबानाथांची 'देहदुर्ग बखर' ही अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. अन्य कालखंडाच्या बकरीप्रमाणे सोहिरोबानाथांच्या बकरीत येणारे विषय व स्वरूप कित्येक पटीने वेगळे ठरते.

११) सोहिरोबानाथांची पद रचना ही निर्गुण भक्तीने व्यापलेली असली तरीसुद्धा भगवतद्स्वरूपाच्यालीलांचे वर्णन करताना सोहिरोबानाथ सगुण भक्तीचा अवलंब करताना दिसतात.

१२) काही उपदेश पर पदातून सोहिरोबांनी परखड आणि झणझणीत वाक्यरचनेने जनताजनार्दनांना, मुमुक्षुकांना उपदेश केलेला जाणवतो.

१३) सोहिरोबानाथांच्या वाणीला कडकडीत वैराग्याची धार आहे. योगी, वैराग्याचे तेज त्यांच्या वाणीला लाभलेले आहे.

## २.७ संदर्भ सूची

१.) बोरकर, बाळकृष्ण भगवंत, संत सोहिरोबानाथ आंबिये चरित्र व निवडक कविता, स्वामी विवेकनंद सोसायटी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथामावृत्ती १८९६, पृष्ठ क्र.२

२.) तत्रैव,१८९६, पृष्ठ क्र. ३-४

३.) महाजन, भक्ती गोविंद, गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये यांच्या साहित्याचा भाषिक व वाङ्मयीन अभ्यास, प्रबंध २०२१, पृष्ठ क्र. ९९

४.) तत्रैव, पृष्ठ क्र. १०१

५.) सातोस्कर. बा. द, गोमंतकीय मराठी साहित्याचे शिल्पकार खंड १, सागर साहित्य प्रकाशन, प्रथमावृत्ती १९७५ पृष्ठ क्र. ६८

६.) सोहिरोबानाथ विरचित श्रीमहदनुभवेश्वरी, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथमावृत्ती २००५, प्रस्तावना.

७.) बोरकर, बाळकृष्ण भगवंत, संत सोहिरोबानाथ आंबिये चरित्र व निवडक कविता, स्वामी विवेकनंद सोसायटी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथामावृत्ती १८९६, परिशिष्ट - ३, पृष्ठ क्र. १५

८.) महाजन, भक्ती गोविंद, गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये यांच्या साहित्याचा भाषिक व वाङ्मयीन अभ्यास, प्रबंध २०२१, पृष्ठ क्र.११६

९.) तत्रैव, पृष्ठ क्र.११७

१०.) बोरकर, बाळकृष्ण भगवंत, संत सोहिरोबानाथ आंबिये चरित्र व निवडक कविता, स्वामी विवेकनंद सोसायटी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथामावृत्ती १८९६, परिशिष्ट - १, पृष्ठ क्र.१२२

११.) महाजन, भक्ती गोविंद, गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये यांच्या साहित्याचा भाषिक व वाङ्मयीन अभ्यास प्रबंध २०२१, पृष्ठ क्र.११७

१२.) बोरकर, बाळकृष्ण भगवंत, संत सोहिरोबानाथ आंबिये चरित्र व निवडक कविता, स्वामी विवेकनंद सोसायटी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथामावृत्ती १८९६, पृष्ठ क्र. ११५

१३.) सोहिरोबानाथ विरचित श्रीमहदनुभवेश्वरी, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथमावृत्ती २००५, प्रस्तावना.

१४.) प्रा. अडसूळ  श्रीकृष्ण, गोमंतकीय साहित्य स्वरूप आणि चिकित्सा, शब्दालय प्रकाशन, प्रथमावृत्ती,२०१६  पृष्ठ क्र. २१

१५.) सद्गुरू जीवनमुक्त महाराज, गौरव ग्रंथ, संपादक प्रा. विनय मडगावकर, भक्तिमार्ग साधन संस्था, शिवोली, गोवा, पृष्ठ क्र. ७०

१६.) तत्रैव, पृष्ठ क्र.७१

१७.) महाजन, भक्ती गोविंद, गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये यांच्या साहित्याचा भाषिक व वाङ्मयीन अभ्यास प्रबंध २०२१, पृष्ठ क्र.२६९ -२८०

१८.) तत्रैव, पृष्ठ क्र.१८३ - १९६

१९.) सोहिरोबानाथ विरचित श्रीमहदनुभवेश्वरी, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथमावृत्ती २००५, प्रस्तावना.

२०.) तत्रैव, प्रस्तावना.

२१.) सातोस्कर. बा. द, गोमंतकीय मराठी साहित्याचे शिल्पकार खंड १, सागर साहित्य प्रकाशन, प्रथमावृत्ती १९७५ पृष्ठ क्र.६९

२२.) महाजन, भक्ती गोविंद, गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये यांच्या साहित्याचा भाषिक व वाङ्मयीन अभ्यास, प्रबंध २०२१, पृष्ठ क्र.२५७ -२६८

२३.) तुकारामांचे निवडक १०० अभंग, संपादक डॉ. श्री. म. पिंगे, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९६२, पृष्ठ क्र. ४५ - ४६

२४.) महाजन, भक्ती गोविंद, गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये यांच्या साहित्याचा भाषिक व वाङ्मयीन अभ्यास प्रबंध २०२१, पृष्ठ क्र. ४३६

२५.) तत्रैव, पृष्ठ क्र. ४४९

२६.) तत्रैव, पृष्ठ क्र. ४७७

२७.) तत्रैव, पृष्ठ क्र.४७७

२८.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाच्या इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथमावृत्ती २००३, पृष्ठ क्र.२७१

२९.) महाजन, भक्ती गोविंद, गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये यांच्या साहित्याचा भाषिक व वाङ्मयीन अभ्यास प्रबंध २०२१, पृष्ठ क्र. ४८०

३०.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाच्या इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथमावृत्ती २००३, पृष्ठ क्र.२७२

३१.) सातोस्कर. बा. द, गोमंतकीय मराठी साहित्याचे शिल्पकार खंड १, सागर साहित्य प्रकाशन, प्रथमावृत्ती १९७५ पृष्ठ क्र. ६९

३२.) काळे, कल्याण, नगरकर, रां. श (संपा), संत साहित्य अभ्यासाच्या काही दिशा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर १९९२ पृष्ठ क्र. ३०

३३.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाच्या इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथमावृत्ती २००३, पृष्ठ क्र.२७२

३४.) बोरकर, बाळकृष्ण भगवंत, संत सोहिरोबानाथ आंबिये चरित्र व निवडक कविता, स्वामी विवेकनंद सोसायटी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथामावृत्ती १८९६, पृष्ठ क्र. २२

३५.) तत्रैव, पृष्ठ क्र. ५८

३६.) प्रा. अडसूळ  श्रीकृष्ण, गोमंतकीय साहित्य स्वरूप आणि चिकित्सा, शब्दालय प्रकाशन, प्रथमावृत्ती, जुलै,२०१६  पृष्ठ क्र.२२ -२३

३७.) तत्रैव,  पृष्ठ क्र.३५ - ८४

३८.) बोरकर, बाळकृष्ण भगवंत, संत सोहिरोबानाथ आंबिये चरित्र व निवडक कविता, स्वामी विवेकनंद सोसायटी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथामावृत्ती १८९६, पृष्ठ क्र. ७०

३९.) तत्रैव, पृष्ठ क्र.९४

४०.) तत्रैव, पृष्ठ क्र.२६

४१.) प्रा. अडसूळ  श्रीकृष्ण, गोमंतकीय साहित्य स्वरूप आणि चिकित्सा, शब्दालय प्रकाशन, प्रथमावृत्ती, जुलै,२०१६  पृष्ठ क्र.२९

४२.) तत्रैव, पृष्ठ क्र.२९

४३.) तत्रैव, १८९६, पृष्ठ क्र.२७

४४.) तत्रैव, १८९६, पृष्ठ क्र. ८०

४५.) तत्रैव, १८९६, पृष्ठ क्र. ८१

४६.) तत्रैव, पृष्ठ क्र. १०८

४७.) तत्रैव, पृष्ठ क्र. ५८

४८.) तत्रैव, पृष्ठ क्र. ९२

४९.) तत्रैव, पृष्ठ क्र. ५९

५०.) तत्रैव, पृष्ठ क्र.६१

५१.) तत्रैव, पृष्ठ क्र. ५४

५२.) तत्रैव, पृष्ठ क्र. १०३

५३.) तत्रैव, पृष्ठ क्र. ११४

प्रास्ताविक ........ 62

३.१ श्रीकृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर यांचे जीवनचरित्र ........ 63

३.२ संत कृष्णभट्ट बांदकर व अण्णासाहेब किर्लोसकर यांची डोंगरी भेट ........ 75

३.३ संत कृष्णभट्ट बांदकर विरचित अहिल्योद्धार नाटकाचे कथानक ........ 78

३.४ स्वात्मतत्त्वामृतशतक ........ 81

३.५ संत कृष्णभट्ट बांदकरांची अभंग रचना ........ 84

३.६ समारोप ........ 88

३.७ निष्कर्श ........ 88

३.८ संदर्भ सूची ........ 89

# प्रकरण तिसरे

## श्री कृष्णभट्ट बांदकर यांची नाट्य व काव्य संपदा यांचा विवेचक अभ्यास

### प्रास्ताविक

महापुरुष पुण्यवान व्यक्तीचे पुण्यस्मरण, महानकारकीर्दीचे स्मरण करणे आवश्यक आहे. अशा महान विभूतींचे पुण्यस्मरण करण्यासाठी कर्तुत्वाची ओळख आणि जीवन चरित्राची माहिती असणे गरजेचे आहे. माणसाला इतरांच्या आयुष्यात काय चाललेले आहे; त्यांचे आयुष्य जीवन समजून घेण्याची उत्सुकता प्रत्येकाला असतेच त्यामुळे सामान्य माणसाचे जीवन समजून घेण्या पेक्षा पुण्यवान व्यक्तीचे महा पुरुषाचे जीवन समजून घेतले तर त्यांच्या व्यक्तिमत्वातून, जीवनचरित्रातून आपल्याला सतमार्गाचे आदर्श, जीवनाचे वर्म नक्कीच सापडेल. अशीच एक विभूती गोमंतकात निर्माण झाली. तेच म्हणजे ‘श्री कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर’ होय.

कृष्णभट्ट बांदकरांनी ईश्वर भक्तीला प्राधान्य देऊन भारताच्या इतर प्रांत - प्रदेशांना वा राज्यांनाही अवगत नव्हता असा संगीत नाटकाचा पाया या विभूतीने सर्वप्रथम गोमंतकात १८ व्या शतकात घातलेला होता. हेच ते आद्य गोमंतकीय संत ज्याने संपूर्ण भारताला नाटक या एक आगळयावेगळया आणि अलौकिक रचनेची तोंड ओळख करून दिली. या श्रेयाचे पात्र श्री कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकार हेच ठरतात. नाटक या साहित्य प्रकाराची रचना सर्वप्रथम गोमंतकात व्हावी आणि ती सुद्धा अशा एका तेजपुंज विभूतीच्या हस्ते यासारखी अभिमानाची बाब दुसरी होऊच शकत नाही.

प्रस्तुत प्रकरणात ‘गोमंतकीय संत कृष्णभट्ट बांदकर’ यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करण्यात आलेला आहे. तसेच त्यांच्या साहित्य संपदा उदाहरणार्थ त्यांनी रचलेल्या ‘शुकरंभा संवाद, लोपामुद्रा संवाद व नटसुभद्रा विलास’ ही त्यांची तीन संगीत नाटके आज उपलब्ध नाही. या व्यतिरिक्त केवळ एक मात्र त्यांचे

'अहिल्योद्धार' हे नाटक उपलब्ध आहे. त्याचा अभ्यास इकडे करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर विविध देवी दैवतावर, सद्गुरूवर, उपदेशपर अभंग रचलेले आहे; त्यांचाही इकडे अभ्यास करण्यात आलेला आहे. श्री सद्गुरु कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज यांचा 'सचरित्र समग्र कवितासंग्रह' हा ग्रंथ कृष्ण जगन्नाथ थळी हे बांदकरांचेच शिष्य होते. त्यांनी या ग्रंथाचे संपादन इ.स. १९३२ साली करून गोमंतकाला, महाराष्ट्राला आणि मराठी भाषेला इतिहासात दडले गेलेले सुवर्ण परत मिळवून देण्याचे एक अलौकिक कार्य केलेले आहे. या ग्रंथांमध्ये कृष्णभट्ट बांदकर यांचे चरित्र, अभंग रचना, पदरचना, स्फुट श्लोक रचना इत्यादींचा समावेश झालेला आहे.

## ३.१ श्रीकृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर यांचे जीवनचरित्र

"अथवा योगिनामेव कुले भवति धीमतां" या भगवदुक्तीप्रमाणे सज्जनास अवतार घेण्यास योग्याचेच कुल पाहिजे असते. शिवाय, ज्यांनी प्रेमबळाने भगवंतास आपलासा करून घेतला आहे, त्या आपल्या हृदयरंजक भक्तोत्तमास भगवान् विषयलुब्ध व अपवित्र मातापितरांच्या उदरात जन्म कसे देईल ? याचसाठी श्रीकृष्ण बांदकर महाराजांना परमात्म्याने वे. जगन्नाथ भटजी बांदकर यांच्या पोटी जन्म देऊन आपले वचन व भक्तवात्सल्य स्पष्ट करून दाखविले'.[१] असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही. हे वाक्य इकडे देण्यामागील दोन कारणे आहेत. पहिले म्हणजे वर दिलेल्या वाक्यावरून हे जाणवते की एका - दुसऱ्या माणसाला देवाच्या स्थानी आणून बसवलेली बांदेकरांचे शिष्य कृष्ण थळी हे त्या त्यावेळी बांदकरांना किती मानित होते याचा नेम येतो. स्वतः बांदकरांची तुलना ते देवाशी करतात. दुसरे म्हणजे १८ व्या शतकात बांदकरांचे शिष्यत्व पत्करणारे थळी यांचा आणि बांदकरांचा गुरु - शिष्याचा किती पवित्र, सुगम संबंध होता. आपल्या गुरुची मनोभावे, नि:सीम सेवा, भक्ती ते करीत असत. हे त्यांच्या व्यक्तीगुणावरून समजते हे कृष्ण जगन्नाथ थळी यांचे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल.

सद्गुरु श्री कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर यांनी स्वतःबद्दलचे उद्गार एका आत्मचरित्रपर पदाव्दारे मांडलेले आहे. त्या पदातून त्यांचे चरित्रजीवन, आई - वडील, त्यांचे गुरु, त्यांना झालेला गुरुपदेश, त्यांना झालेला

साक्षात्कार आणि त्या कालखंडातील त्यांचे जगणे कसे होते या सर्वांचे चित्रदर्शन त्यांच्या या पदातून प्रकट झालेले आहे. ते पद असे.

**पद**

**'यत्कुलदेव " लक्ष्मीनृसिंह" सुखदायी ।**

**पिता " जगन्नाथ" माता " नरसाई" ॥**

**पितृव्य " मुकुंद" चुलती " लक्ष्मीबाई" ।**

**कृष्णद्विज मीं जन्मा आलों अचला ठायीं ॥ ध्रु० ॥**

**शिणलों प्रपंचिं फिरतां नकळुनि आयुष्यकाला ।**

**भिक्षुकिवृत्ति करितां आला मनि कंटाळा ॥**

**मत्पत्नीजनित स्मरतां माझी पोरांबाळां ।**

**"मी" "माझे" मनिं धरितां सांपडलों मोहजाला ॥ य० ॥ १ ॥**

**त्रिविध तापाग्नीनें चित्त जई पोळलें ।**

**दारापुत्रीं गृहवित्तावरि कंटाळलें ॥**

**संतमुखें जइं तारक ईश्वर मज कळलें ।**

**तईंपासुनि मन माझें तद्भजनिंच वळलें ॥ य० ॥ २ ॥**

**आळवितां रात्रंदिन किति वर्षे प्रभुला मी।**

**सद्यासि दया माझी येउनि अंतर्यामी ॥**

साक्षात् सद्गुरु आपण प्रगटति विष्णुनामीं।

दृश्य विलक्षण मज स्थिर केला आनंदधामी ॥ य० ॥ ३ ॥

सद्गुरुनी जी मजवरि केली करुणादृष्टी।

सञ्चित्सुख कनकनगासम समजाविलि सृष्टी॥

बदले बहू जन्मीं तूं होता बाळा कष्टी।

आतां पूर्ण सुखी हो घेउनि आनंवृष्टी ॥ य० ॥ ४ ॥

यच्छद्धे आनंद स्फुरला तो आपैसा।

पिंडब्रह्मांडातें ग्रासी नेट ऐसा॥

अनुभव तो या वदनें बोलवेल कैसा ?।

द्वैताद्वैतरहित; लहरीविण समुद्र जैसा ॥ य० ॥ ५ ॥

ऐशा सद्गुरुसी म्यां द्यावें काई ?।

तनु मन धन हें अर्पण झालें पूर्वीच पायीं।

देण्याजोगी वस्तु ज्याविण दुसरी नाहीं॥

आतां कोण्यायोगें होईन मीं उतराई ? ॥ य० ॥ ६ ॥

विचार ऐसा जईं मज अंतःकरणी आला।

तै सद्गुरुचा हृदयामाजी स्फूर झाला॥

“ वर्णन करिं आनंदप्रद राघवचरिताला।

सर्व सुखास्पद सेवा पावे तेचि आह्मांला” ॥

**नाहंकर्ता, स्फूर्ती समर्थ गुरुरायाची ।**

**घडविली सेवा वदवुनि सुकीर्ति राघवाची ॥**

**श्रोता वक्ता अवघी सद्गुरुस्फूर्ती साची ।**

**कविताशक्ति न गुरुविण कृष्णजगन्नाथाची ॥ य० ॥ ८ ॥'** [२]

संत श्री कृष्णभट्ट बांदकर यांच्या या आत्मचरित्रपर पदातून त्यांच्या समग्र जीवनचरित्राचा उलगडा होतो. तरीपण सुसंगतपणे त्यांचे जीवनचरित्र मांडणे भाग पाडते. त्यामुळे खालीलप्रमाणे त्यांची सुरस आणि सार्थ जीवनचरित्र मांडले आहे. संत 'श्री कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर' हे १८ व्या १९ व्या शतकातले गोमंतकीय थोर संत कवी होते. त्यांचा जन्म शके १७६६ म्हणजे इ. स. १८४४ मध्ये क्रोधी नाम संवत्सरांत आषाढ शु. ११ एकादशीच्या महापर्वणीस 'डोंगरी' या गावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जगन्नाथ होते तर आईचे नाव नरसाई असे होते.

कृष्ण जगन्नाथ थळी संपादित 'श्री सदुरु कृष्ण जगन्नाथभट्ट बांधकर महाराज यांचा सचरित्र समग्र कवितासंग्रह' या ग्रंथात बांधकर महाराजांच्या वडिलांची जी माहिती सापडते ती अशी. वे जगन्नाथ भटजी हे अत्यंत सात्विक कर्मनिष्ठ व पवित्र आचरणाचे ब्राह्मण डोंगरी या गावात  राहत होते.  ते पंढरपूरच्या विठ्ठल - रखुमाईचे एकनिष्ठ व नि: सीम भक्त होते. ते कीर्तन करीत असताना त्यांच्या नेत्रातून एकसारख्या प्रेमाश्रूच्या धारा वाहत असे. ते भजन, कीर्तन करत असताना प्रेमळ मनाने पांडुरंगास बसण्याकरीता म्हणून समोर एक पाट ठेवून त्यावर फुले टाकून भजन, कीर्तन, पूजन समाप्त झाल्यावर पांडुरंगाचा प्रसाद म्हणून ती पाटावरची फुले ते लोकांना देत होते. त्यावेळी त्या फुलांचा नैसर्गिक गंध नाहीसा होऊन त्यांना बुक्याचा घमघमाट येत असे.

वे. जगन्नाथ भटजींना एका प्रसिद्ध ज्योतिष्याने पूर्वीच सांगून ठेवले होते, की तुमचा देह अमुक वर्षी, अमुक तिथीस व अमुक पुण्यक्षेत्री पडेल. त्यानुसार जगन्नाथ भटजी त्यांनी शके १७६७ म्हणजे इ. स. १८४५

साली आपला  पवित्र देह वेंकटगिरीवर ठेवून आपले निर्याण केले.[३] असे श्री बांदकर महाराजांच्या वडिलाविषयी सांगितले जाते.

वे जगन्नाथ भटजी यांचे चिरंजीव सद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर. जेव्हा वे. जगन्नाथ भटजींचे निर्याण झाले. त्यावेळी ते सहकुटुंब तिकडेच होते. तीर्थरूप निवर्तल्यावर कृष्णभट्ट बांदकरांचे पालन - पोषण त्यांचे काका वे. मुकुंद भटजी यांनी केले बांदकर महाराज हे लहानपणापासूनच सोज्वळ व चतुर्बुद्धीचे होते. कै. हरीबाब मुर्कुंडीकर हे डोंगरीवर राहणारे एक प्रसिद्ध विद्वान गृहस्थ होते. त्यांच्याजवळ बांदकरांनी धातू रुपावली व रघुवंशाच्या दुसऱ्या सर्गाचे एकूण १४ श्लोक काव्यस्वरूपात म्हटले होते. याशिवाय दुसरीकडे कुठेही त्यांनी कसलेच शिक्षण  घेतले नाही. तरीसुद्धा भागवतासारख्या अखंड आणि दुर्बोध ग्रंथाचा ते सहज अर्थ लावीत असे.[४] यावरून बंदकर महाराजांची विद्वता आणि लहानपणापासूनच त्यांच्यात वावरणाऱ्या आध्यात्मिक ज्ञानाचा प्रत्यय येतो.

श्री कृष्णभट्ट बांदकर महाराजांचा कुळ हा ब्राह्मण असल्याने भिक्षुकी करून आपले चरितार्थ चालविणे त्यांना भाग पडत होते. त्यांचे काका श्री मुकुंद भटजी हे सुद्धा भिक्षुकी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. बांदकरांचा स्वभाव लहानपणापासूनच खूप तेजस्वी असल्याने त्यांना परक्यांच्या घरदारासमोर जाऊन याचना करून पोट भरणे अगदीच आवडत नसे. बांदकर महाराज अठरा - एकोणीस वर्षाचे असताना त्यांचे काका मुकुंद भटजी हे कैलासवासी झाले. अवघ्या लहानपणी कुटुंबाचे पालन पोषण करण्याची जबाबदारी बांदकरांवर येऊन पडली. उदरनिर्वाहाचे दुसरे काहीच साधन नसल्याकारणाने आणि भिक्षुकीचा धंदा हा आपला कुलपरंपरागत असल्यामुळे कितीही कंटाळा आला तरीसुद्धा बांदकर महाराजांना मुकाट्याने तीच वृत्ती स्वीकारावी लागे. इतक्या अल्पवयात भिक्षुकीचा धंदा करणे काही सोपी गोष्ट नाही. कधी कधी बांदकरांना भिक्षा मागताना ब्राह्मण आठवे. अशी त्यांची मनस्थिती झाली होती.

वर उल्लेख केल्याप्रमाणे बांदकरांचे आत्मचरित्रपर पद हे त्यांच्या ठायी ठायी  जीवनातून उलगडत राहते. उदाहरणार्थ "भिक्षुकिवृत्ती करिता आला मनि कंटाळा" या त्यांच्या आत्मचरित्रपर पदाची ओळ त्यांच्या भिक्षुकी वृत्तीचा उलगडा करते. कसे बसे बांदकरांनी पाच - सहा वर्षे पोटाला चिमटा काढून

आपल्या कुटुंबाचे भरण पोषण केले. आता या भिक्षुकीच्या त्रासातून आपण काही मुक्त होणार नाही, म्हणून एके दिवशी रात्रीच्या वेळी जागरण करून बांदकरांनी ईश्वराचा धावा केला. मोठ्या हृदयप्रेमभावनेने भजन, पदे म्हणून देवाकडे आपले दुःख व्यक्त केले. तरी सुद्धा या त्रासातून मोकळे होण्याचा काही मार्ग त्यांना दिसेना. दारिद्र्यामुळे कधी कधी त्यांना भिक्षा मिळतही नव्हती. त्यामुळे फारच कष्टी आणि मनस्ताप अगदी वेडे होण्याच्या वेतातही ते आले होते.

गोमंतकात बांदिवडे येथे रा. रा. मण पै या नावाचे एक परम सात्विक गृहस्थ राहत होते. ते बांदकर महाराजांचे प्रेमळ मित्र होते. एके दिवशी बांदकर महाराज त्यांच्याकडे गेले असताना रा. मण पै हे वामन पंडित विरचित यथार्थदीपिका या ग्रंथाचे वाचन करून एकेक श्लोकाचे यथायोग्य अर्थ सुरस व सुंदर व्याख्यानाने आपल्या रसाळ शब्दांनी श्रोत्यांना सांगत होते. "तद्विद्वि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया" या श्लोकाच्या ओळीवरून रा. मण पै हे संतांचा महिमा, त्यांचे महात्म्य, ते कसे महान आहे व त्यांना शरण गेल्यास ते कसे आपल्याला उच्चतम् मार्ग दाखवतात याचे वर्णन करून ते श्रोत्यांना सांगत होते. हे वाक्य बांदकरांनी रा. मण पै यांच्याकडून ऐकताच त्यांना अत्यानंद झाला. प्रवचन संपल्यावर बांदकर महाराजांनी रा. मण पै यांना आनंदाने आणि मोठ्या उत्सुकतेने प्रश्न केला; की 'असे जगदुद्धारक संत आज या भूतलावर आहेत का?' यावर रा. मण पै म्हणाले 'होय पुष्कळ आहेत'. पुढे बांदकरांनी विचारले 'कोठे आहेत ते कृपा करून आम्हाला सांगा' त्यावर रा.मण पै म्हणाले 'भावबंद नाहीसा करणारे दीनदयाळ संत सर्वत्र भरलेले आहे. आम्हा विषयाध्यास मात्र त्यांची परीक्षा होत नाही'. हे ऐकून बांदकरांनी रा. मण पै यांचे पाय धरले व म्हणाले 'असे आहे तर आपणच कृपा करून मला या भावबंदापासून मुक्त करण्याजोगे गुरूपदेश करा. त्यावर रा. मण पै म्हणाले 'मी तुम्हाला भवबंधविच्छेदक ज्ञानोपदेश केला असता, परंतु आपण विद्वान् व संस्कृतज्ञ आहात. आपल्या काही शंका असल्यास, त्यांचे समाधान करण्याचे कदाचित मला जड जाईल; व असे झाले म्हणजे सहजच माझ्यावरील श्रद्धा कमी पडेल'.[५]

यावरून बंदकर महाराजांकडे असलेल्या ज्ञानाच्या गोठोड्याचे सामर्थ्य लक्षात येते. की रा. मण पै हे सुद्धा थोर विद्वान व संस्कृतज्ञ असूनही बांदकरांना गुरुपदेशाचे ज्ञानामृत पाजविण्यात मागे सरकले.

रा. मण यांच्याकडून सल्ला घेऊन बांदकर महाराज सद्गुरूच्या शोधात निघाले. रा. मण पै यांनी सांगितल्याप्रमाणे शास्त्रसंपन्न आणि अनुभवी सत्पुरुष वेंगुर्ले येथे ‘श्री विष्णू बुवा सोमण’ या नावाचे एक प्रसिद्ध व अनुभवसंपन्न रामदास संप्रदायाचे संत राहत होते. दुसऱ्या दिवशी बांदकर महाराज पहाटे कोणालाही न सांगता एकटेच मागे पुढे विचार न करता मुसळधार पावसात तसेच बाहेर पडले. बरोबर एक फाटकी छत्री, भागवत, यथार्थदीपिका असे दोन चार ग्रंथ पाठीस बांधले, अंगावर एकच परळ व धोतर अशा सामग्रीने अध्यात्माची प्राप्ती करण्यासाठी आणि सद्गुरूची भेट व्हावी यासाठी कधीही न पाहिलेल्या रानावनातून व वेगवेगळया गावाखेड्यातून पोटात अन्नाचा एक दाणाही न घेता सतत दोन दिवस प्रवास करीत तिसऱ्या दिवशी ते वेंगुर्ले गावात पोहोचले.

‘बांदकर महाराजांना विष्णुबुवांचे निवासस्थान माहीत नव्हते ते लोकांना विचारत विचारत नेमके विष्णुबुवांच्या घरासमोर पोहोचले बाहेर ओटीवरच विष्णुबुवा पंचदशीचे पुस्तक घेऊन आपल्या शिष्यमंडळी समोर प्रवचन करीत होते बांधकर महाराजांनी विष्णुबुवांना हाक मारली व म्हणाले ‘विष्णूबुवा सोमण म्हणतात त्यांचे घर कोठे आहे’? विष्णुबुवा म्हणाले ‘का? त्यांच्याकडे आपले काय काम आहे’. बांदकर महाराज इतक्या दूरवरून प्रवास केल्यावर खूप थकले होते. त्यांच्या या सरळ प्रश्नाचे हे विचित्र उत्तर ऐकून त्यांना थोडे वाईट वाटले. पुन्हा बांदकर म्हणाले ‘महाराज ते कोठे राहतात तेवढे मला कृपा करून सांगा, मला त्यांच्याकडे थोडे नाजूक काम आहे. हे ऐकून बुवांच्या शिष्यमंडळी बांदकरांचा सरळ स्वभाव पाहून दया आली व त्यांनी अहो, ज्यांच्याजवळ आपण बोलत आहात तेच आपले उद्दिष्ट गृहस्थ आहे व हा त्यांचाच आश्रम आहे. हे ऐकताच बांदकर महाराजांना परमानंद झाला व तेथेच बोवांना दीर्घदंड नमस्कार घातला. इतक्या भर पावसाळयात लोटांगण घातलेले पाहून विष्णुबुवांना आश्चर्यच वाटले. हा कोणीतरी परमविरक्त व संसारतप्त गृहस्थ असावा अशी बुवांची खात्री पटली. बांदकर उठतात की काय याचा बराच वेळ विष्णू बुवांनी वाट पाहिली पण बांधकारांचा हा दृढ निश्चय पाहून स्वतः विष्णू बुवांनी भर पावसाळयात जाऊन त्यांना स्वहस्ते उठवले व घरात घेऊन आले. बांदकर महाराजांनी विष्णुबुवांना आपले सगळे वृत्त निवेदन केले ते ऐकून बुवांना खूप आनंद झाला’.[६]

देवाविण भक्त नाही आणि भक्ताविण देव नाही. शिष्याला जशी अनुभवसंपन्न गुरूची आवश्यकता असते, तशीच गुरुला आज्ञाकारी शिष्याची गरज असते. असा हा आज्ञाकारी दिव्य शिष्य देवाने आपल्याला दिला हे पाहून श्री विष्णुबुवांना अत्यानंद झाला. 'दुसऱ्या दिवसापासून विष्णुबुवांनी बांदकरांना गुरुउपदेश केला. गुरूंनी शिष्याला जे आध्यात्मिक ज्ञान, मार्गदर्शन केले ते त्यांच्या 'स्वात्मतत्वामृतशतक' या ग्रंथात बांदकरांनी काव्यबद्ध स्वरूपात लिहून ठेवले आहे. या ग्रंथाची चोपडी एक दिवस बांदकरांचे शिष्य कृष्ण जगन्नाथ थाळी यांच्या दृष्टीस पडली. त्यांनी त्यातले श्लोक वाचले त्यांना ते खूपच आवडले, त्यांनी ते नुकतेच झपाझप नकलून घेतले व बांदकरांकडे ग्रंथ प्रसिद्ध करण्याची विनंती केली. परंतु बांदकरांनी थळींना म्हटले की 'कृष्णराव ते श्लोक मात्र हा देह आहे तोपर्यंत छापू नका बरे!' त्यानंतर थाळींनी बांदकरांच्या निर्वाणानंतर १९०३ साली स्वात्मतत्वामृतशतक हा ग्रंथ छापून प्रसिद्ध केला'.[७]

संत कृष्णभट्ट बांदकरांना विष्णूबुवा सोमणांनी आध्यात्मिक उपदेश करून व्यवहारिक सल्ला दिला. तो असा की 'केवळ प्रपंचातच गुरफटून राहायचे नाही, तर प्रपंच करत करत परमेश्वरभक्ती करावी ती ही गृहस्थाश्रमाची कर्तव्ये करून कुटुंबाचे पालन पोषण करून.[८] त्याचबरोबर विष्णुबुवांनी बांदकरांना उपदेश करताना सांगितले की श्री सीतारामाच्या प्रतिमेचे पूजन कर रामदासी संप्रदायाचा प्रचार, प्रसार कर अशा बुवांच्या उदेशानंतर बांदकर परत डोंगरी आले.

'गोव्यातील बोरी या गावात 'सावळा' नावाचा एक प्रसिद्ध शिल्पकार होता. संत कृष्णाभट्ट बांदकरांनी आपल्या गुरुच्या आज्ञेवरून श्री सीतारामाची लाकडी प्रतिमा करण्यास त्या शिल्पकाराला सांगितले. तो शिल्पकार आपल्या काही कामासाठी एक दिवस सिद्धनाथ पर्वतावर जात असताना त्याला असाच एक विचार सुचला की बांदकरांनी आपल्याला श्री सीतारामाची लाकडी प्रतिमा तयार करायला सांगितले आहे. पण आपण त्यांना काळ्या पाषाणाची मूर्ती प्रतिमा करून द्यावी. असा विचार करत तो आपल्या कामासाठी गेला. परत डोंगरावरून खाली उतरताना ज्या ठिकाणी पूर्वी त्यांनी मनात पाषाणाची प्रतिमा करावी असा विचार केला होता, त्याच जागी पोहोचल्यावर परत त्याच विचारांची पुनरावृत्ती त्याच्या मनात होऊ लागली. तो त्या जाग्यावरून पाच - दहा पावले पुढे गेला. तोच त्याने खाली आपल्या पायाकडे पाहिले तर पाय बरेच सुजल्या सारखे दिसू लागले.

तो तसाच पुढे गेला जित जितका तो पुढे पाऊले टाकायचा तितक्या त्याच्या पायाच्या वेदना वाढू लागल्या. आता त्याला एक पाऊलही पुढे चालता येत नव्हत. तो तसाच मागे फिरला मागे फिरताच पायाच्या कळा थोड्या कमी झाल्या. तो जसजसा पूर्वस्थळी येत होता. तसतश्या त्याच्या कळा नाहीशा झाल्या. पूर्वीच्या जागेवर येऊन त्यांनी चोहीकडे बघितले तोच त्याला जवळच एक लहानसा पाषाण दिसला. त्याने म्हटले ह्याच शिलेचा अनादर करून मी पुढे चालला होता म्हणून मला या कळा सोसाव्या लागल्या असे म्हणून त्याने ती शिला आपल्याबरोबर घेतली व घरी आला. दुसऱ्या दिवशी जेव्हा तो श्री सीतारामाची मूर्ती बनविण्यास सुरुवात करत होता त्याच क्षणी बरोबर बाराची तोफ झाली तीच श्रीरामजन्मकालसूचक तो ऐकून त्या शिल्पकारास तो चांगला शकुन वाटला व त्याने मोठ्या उत्साहाने व काळजीपूर्वक सीतारामाची पाषाणी मूर्ती तयार केली. ती प्रतिमा त्या कारगिराने बांदकर महाराजांना देऊन आपल्याबरोबर घडलेली सर्व हकीकत बांदकरांना निवेदन केली. ते सर्व ऐकताच बांधकर महाराजांना अत्यानंद झाला'. [९]

आपल्या घरातच राम मंदिर उभारून तिथे आपल्या गुरु विष्णुबुवा सोमण यांच्या हस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. त्या दिवशी बांदकरांनी मोठ्या थाटामाटाने उत्सव केला. गुरुच्या आज्ञेवरून राम मंदिराचे प्रतिष्ठापन केले आणि रामदास संप्रदायाची परंपरा पुढे नेण्याचा बांदकरांनी अमुलाग्र प्रयत्न केला. रामदासी दीक्षा मिळाल्यामुळे बांदकर हे राम भक्त झाले. श्री राम हे त्यांचे उपाशी दैवत झाले. 'त्या काळात डोंगरीसारख्या जुन्या काबीजादीतील गावात हिंदूंची देवालय बांधण्यास सरकारची परवानगी मिळत नव्हती म्हणून बाहेरून घर दिसावे पण आतून त्या घराला देव मंदिराची कळा यावी अशी या राम मंदिराची रचना करण्यात आली आहे'.[१०]

बांदकरांचे एकनिष्ठ भक्त आणि शिष्य लक्ष्मण नावाचे एक कुंभार डोंगरी येथे राहत होते. त्यांनी आपले सर्व आयुष्य आपले गुरु बांदकर महाराजांना समर्पित केले होते. श्री राम आणि श्री राम भक्त हनुमान यांचा जसा देव व भक्त असा संबंध आहे. तसे गुरु शिष्याचे उदाहरण म्हणजे कृष्णभट्ट बांदकर व लक्ष्मण कुंभाराचे संबंध होते.

'एकदा बांदकर महाराजांना स्वप्नदृष्टांत झाला. स्वप्नात ब्राह्मणरूपाने श्रीमारुतीराया येऊन त्यांना म्हणाले 'आपल्याजवळ राहुल नित्य आपल्या मुखाने अध्यात्म रामायण ऐकण्याची आम्हांस फार इच्छा झाली आहे, तर आम्ही येत्या एकादशीस इकडे येऊ' इतके सांगून ब्राह्मणरूपधारी मारुती उत्तरार्ध झाले. दुसऱ्या दिवशी बांदकरांनी ते स्वप्न सगळ्यांना सांगितले. त्याच रात्री बांदकरांच्या शिष्याला लक्ष्मण कुंभाराला रात्री स्वप्न पडले की 'मी सांगे या गावात अमुक ठिकाणी मृत्तिकेत पुरतलेला आहे माझे मुकुट तेवढेच वर दिसत आहे. मला तिकडून आणून डोंगरीवर पोहोचव मला श्री बांदकरांच्या मुखाने अध्यात्म रामायण श्रवण करायचे आहे'. हे स्वप्न लक्ष्मण कुंभाराने बांदकर महाराजांना तुरंत सांगितले.

दुसऱ्या दिवशी श्री मारुतीरायांच्या स्वप्नदृष्टांताप्रमाणे लक्ष्मण कुंभार सांगे येते श्री मारुतीमूर्ती जवळ पोहोचले. दिवसाच्या वेळी मूर्ती काढली तर कोणी गावकरी बघणार म्हणून रात्र होईपर्यंत लक्ष्मण कुंभार तिथेच थांबले. काळोख होताच लक्ष्मण कुंभाराने मूर्ती उकरून करून वर काढली तोच एक भयंकर ध्वनी उत्पन्न झाला. तो ध्वनी ऐकताच लक्ष्मण कुंभार मूर्ती तिकडेच टाकून पळाला व एका देवळात पोहोचला थकव्यामुळे काही वेळ त्याला निद्रा लागली त्या निद्रेतच त्याला परत एक स्वप्न पडले. तेच श्री मारुतीराया स्वप्नात म्हणाले 'अरे वेड्या मी आता डोंगरीवर जाणार म्हणून आनंदाचा ध्वनी केला त्यास तू इतका भ्यालास काय? उठ लवकर! मला आत्ताच घेऊन डोंगरीवर चल नाहीतर तुला शिक्षा करीन' हे ऐकतात लक्ष्मण खडबडून जागा झाला. त्या जागेवर परत जाऊन त्यांने मूर्ती वर काढून तिला एका मोठ्या पाटीत घालून त्यावर वस्त्र झाकून घट्ट बांधली.

लक्ष्मण कुंभार पणजीला परत येण्यासाठी मूर्तीसोबत आगबोटीवर चढला मूर्तीच्या वजनाने आगबोट पाण्यामध्ये बरीच खाली गेली. बोट खाली गेलेली पाहून बोटीवरचा कप्तान आणखी काही लोकांना हे काय झाले तेच समजले नाही. त्या पाटीमध्ये काय आहे हे पाहण्याकरीता ती माणसे पाटीजवळ आली तीच लक्ष्मणाने पाटीला आपल्या हाताने हृदयाशी जखडून ठेवलेली होती. लक्ष्मणने पाटीला हात लावायला दिला नाही. उलट या पाटीमध्ये ब्राह्मणाची वस्त्रे, कापड आहेत त्यांना तुम्ही स्पर्श करता कामा नये. असे सांगून लक्ष्मण मूर्ती बरोबर पणजीला उतरला. आणि त्याच्याच ओळखीची एक शूद्र बाई होती. ती परम भोळी व भाविक होती. रात्री तो तिच्या घरी राहून दुसऱ्या दिवशी सकाळी श्री मारुती मूर्तीसह डोंगरीवर

आला. श्री मारुतीरायास आणलेले पाहून बांदकर महाराजांना परमानंद झाला. त्यांनी मारुतीरायास वंदन करून श्रीराम मंदिराच्या गर्भगृहातल्या उजव्या बाजूला श्रीमारुतीची मूर्ती स्थापन केली. हे श्रीमारुतीरायाचे अत्यंत जागृत देवस्थान असल्यामुळे डोंगरीवरील सर्व लोक मोठ्या श्रद्धा प्रेमाने भजतात'.[११]

आणखी एक दिवस असाच एक चमत्कार झाला. श्री कृष्णभट्ट बांदकर महाराजांच्या घरात त्यांची एक चुलतसासू राहत होत्या. वयाने त्या मोठ्या असल्याने डोंगरी वरील लोक त्यांना 'आजीबाई' म्हणत होते. ती स्वभावाने श्रद्धाळू व देवभोळी होती. म्हार्दोळ येथील श्री महालसेवर तिची अपार श्रद्धा भक्ती होती. वर्षातून होणारी महालसेची जत्रा ती कधीही चुकवायची नाही. श्री महालसेच्या जत्रेच्या पूर्व दिवशी कृष्णभट्ट बांदकर महाराजांना काही सद्भक्त मंडळींच्या विशेष आग्रहावरून दूरच्या गावी जावे लागले. जाताना त्यांनी आजीबाईंना सांगितले की 'मी तर निघालो घरात तुझ्या वाचून जाणते कोणी नाही. पूजा जाणणाऱ्या कोणाकडूनही श्रीरामाची पूजा, नैवेद्य वगैरे संपादून घे तुला उद्या वार्षिक नियमाप्रमाणे महालसेच्या दर्शनास जाता येणार नाही त्याबद्दल वाईट वाटून घेऊ नकोस. श्रीराम व महालसा ही काही वेगळ्या देवी दैवत नाही एकच परमात्म्याने प्रसंगोपात्त घेतलेले हे वेगवेगळे अवतार आहे म्हणून ही महालसा समजून उद्या तू इकडे रहा'.

बांदकर महाराजांच्या आज्ञेवरून आजीबाई म्हार्दोळयाला न जाता घरीच राहिली. वार्षिक जत्रोत्सवाला जायला मिळाले नाही म्हणून आजीबाईला खूप वाईट वाटले. देवपूजा येत असलेल्या गावातल्या एका मुलाला आणून त्याच्याकडून श्रीरामाची षोडशोपचारे पूजा, नैवेद्य सर्व काही केले. शेवटी मंगलत्रिक्याचे वेळी आरती फिरवताना त्या मुलाला श्रीरामाच्या मूर्ती ऐवजी श्री महालसेची मूर्ती दिसू लागली. त्यांनी हाक मारून आजीबाईंना बोलवले आजीबाई बाहेर येऊन बघताच श्रीराम श्री महालसेच्या स्वरूपात नटलेले होते. आपल्यासाठी देव आपल्या घरी आला हे पाहून आजीबाईंना अत्यानंद झाला. श्री राम रुपी महालसा देवीची पूजा करून स्तुती गायन गाऊन गावातल्या अनेक लोकांना जमवून आजीबाईंनी हा चमत्कार दाखवला. शेवटी सायंकाळी श्री महालसा देवी उत्तरार्ध होऊन पूर्वीसारखी मूळ श्रीरामाची मूर्ती दिसू लागली.[१२]

बांदकर महाराज आल्यावर आजीबाईंनी आपल्याबरोबर घडलेली सगळी चमत्कारिक घटना निवेदन केली. या चमत्कारामुळे बांदकर महाराजांची श्री रामा नामाची श्रद्धा आणखी दृढ झाली.

'बांदकर महाराज हे लहानपणापासूनच उत्तम गायन, भजन, कीर्तन करीत असत. त्यांच्या कीर्तनाची प्रसिद्धी सर्वत्र प्रसार झाल्यामुळे जो तो त्यांना आपल्या घरी नेऊन भजन कीर्तनादी उत्सव करू लागले. त्यांची ही दिव्य किर्ती व लोक गात असलेले त्यांचे स्तुतीवाद हे सगळे पाहून एका श्रीमंत मंडळीस सहन झाले नाही. त्यांनी कृष्णभट्टांचा छळ करण्याचा निश्चय केला. त्यावेळी वैष्णवकुल गोकर्णमठाधीश स्वामी महाराज श्रीमतपद्मनाभतीर्थ श्रीपाद वडेर  हे त्यावेळी संचारार्थ फिरत फिरत पणजी येथे श्रीमंत धेंपे यांच्या येथे पोहोचले. तेव्हा त्या श्रीमंत मंडळींनी श्री स्वामीकडे श्रीकृष्णभट्ट बांदकरांची भलतीच कागाळी करून त्यांना अपमानित बहिष्कृत करावे अशी विनंती केली. श्री स्वामींनी बांदकर महाराजांना पणजीला बोलावून आणून चौकशी केली. त्यावेळी श्री बांदकर महाराजांनी जे अध्यात्मिक व अलौकिक भाषण केले त्यावेळी त्या श्रीमंतांनी बांदकाराविरुद्ध रचलेल्या षडयंत्राचा खुलासा झाला व श्री बांदकर महाराज निष्कलंक झाले. उलट ती श्रीमंत मंडळी श्री स्वामींच्या दंडाला पत्र  ठरली. दोन - तीन दिवस लाजेमुळे ती श्रीमंत मंडळी स्वामी दर्शनाला सुद्धा आली नाही. श्री स्वामींनी श्री बांदकर महाराजांना आपल्याकडे आठ - दहा दिवस ठेवून घेतले त्यांच्याकडून किर्तन, भजन, पुराण वगैरे मोठ्या प्रेमाने थाटामाटाने उत्सव केला'.[१३]

'श्री कृष्णभट्ट बांदकर महाराजांनी त्यानंतर आपले पुढचे सर्व आयुष्य श्री राम भक्ती व सेवेत घालविली आपल्या राम मंदिरातच त्यांनी दोन उपक्रम सुरू केले. पहिला उपक्रम म्हणजे अति गोड व मधुर स्वराने स्वतः स्वरचित पदे म्हणून ते भजन करीत असे, आणि नव्या पद्धतीने कीर्तन करून त्यात भक्ती व प्रेमाचा रंग भरीत असे. बांधकारांचे एक शिष्य जगन्नाथबुवा बोरीकडचे यांनी कृष्णाभट्टांची ही संगीत भजनाची परंपरा नंतर संपूर्ण गोमंतकात सुरू केली'.[१४]

आपल्या घरी राम मंदिर उभारल्याने दरवर्षी रामनवमीचा उत्सव ते पूर्ण श्रध्देने, भक्ती भावाने व मोठ्या थाटामाटाने साजरा करीत असे. बांदकर महाराजांनी खास राम नवमीच्या उत्सवासाठी पौराणिक कथांवरून पौराणिक संगीत नाटके लिहून ती राम नवमीच्या दिवशी डोंगरीवरील लोकांना घेऊन ते त्या

नाटकांचे सादरीकरण करीत असत. बांदकरांनी लिहिलेली चार संगीत नाटके म्हणजे 'शुकरंभासंवाद', 'नटसुभद्राविलास', 'लोपामुद्रासंवाद' व 'अहिल्योद्धार' ही चार संगीत नाटके श्री कृष्णभट्ट बांदकर महाराजांच्या नावावर सांगितली जातात. बांदकर महाराजांचे शुकरंभासंवाद या नाटकावरूनच अण्णासाहेब किर्लोसकरांना  संगीत नाटकाची युक्ती सुचली. या विषयावर विवेचक अभ्यास पुढच्या अनुच्छेद केलेला आहे.

वर उच्चार केलेल्या चार नाटकातील बांधकारांचे केवळ अहिल्योद्धार हेच एक नाटक आज अस्तित्वात आहे. याशिवाय बांदकर महाराजांचा 'स्वात्मतत्वामृतशतक' हा त्यांचा श्लोकबद्ध ग्रंथ आहे. त्याचबरोबर 'व्यासवरदान', 'शतस्त्रीणांवरदान', 'तुलसीपत्रसंधान', 'हास्यमुक्ती', 'यागकांड', 'यात्राकांड', 'चंपीकासुमतीस्वयंवर' 'उपकेतुस्वयंवर', 'पिंगलाख्यान' 'दुर्वासभोजन', 'नागरिकोपदेश', 'सगुणाख्यान', 'गुणवत्याख्यान' अशी आख्यानकाव्ये आहेत.[१६] बांदकर महाराजांची पद रचनाची संख्या ८०० वर भरते त्यांची अभंग रचना ही मोठ्या संख्येने आढळते.

अशा पवित्र आणि समृद्ध पदरचनांनी, अभंग रचनांनी श्री कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकरांनी प्रत्येक साधकांना जगातील भरकटलेल्या जनता जनार्दनान, मुमुक्षितांना सतमार्गावर नेण्याचे व त्यांच्या हृदयात भक्तीचा ज्ञानदीप तेवत ठेवण्याचे एक मौलिक कार्य श्री कृष्णभट्ट बांदकारांनी केलेले आहे.  शके १८२४ म्हणजे इ. स. १९०२ साली संत श्री कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकरांनी आपला पुण्य देह टाकून पंचभूतात विलीन झाले.

## ३.२ संत कृष्णभट्ट बांदकर व अण्णासाहेब किर्लोसकर यांची डोंगरी भेट

गोमंतकीय संत कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर हे रामदासी संप्रदायाची दिक्षा घेऊन रामभक्तीत, रामसेवेत सदैव रमून राहायचे. आपल्या मधूर, गोड व रसाळ वाणीने ते अभंग, पदे म्हणून श्रीरामाची मनोभावे सेवा करून स्तुती करायचे. पवित्र राम मंदिर आपल्या घरी उभारल्याने व रामनवमीच्या निमित्ताने ते दर वर्षी संगीत नाटके लिहीत असे. व डोंगरी गावातीलच काही गावकरी मंडळींना घेऊन ती नाटके राममंदिरात सादर करीत असत. ते संतकवी असल्याने व शिघ्रकवी असल्याने प्रवचन, भजन, कीर्तन, ग्रंथ लेखन, पदरचना,

अभंगरचना अशा गोष्टी त्यांच्या हातून घडत होत्या. ह्यामुळे त्यांची कीर्ती दूर दूरवर पोहोचलेली होती. आसपासच्या गावांतून लोक त्यांच्या भजन, कीर्तनाचा, संगीत नाटकांचा आस्वाद घ्यायला येत असत.

त्या काळी गोव्यात पोर्तुगीजांची राजवट होती व मिठाच्या खात्यात नोकरी करणारे अण्णासाहेब किर्लोसकर हे मिठाच्या व्यापारासाठी पोर्तुगीज अधिकारी क्राफर्ड सोबत त्याकाळी गोव्यात आले असता. संत कृष्णभट्ट बांदकरांची यशकिर्ती इतकी विस्तारलेली होती की ती किर्लोसकरांच्या कानावरही पडली व ते बांदकर महाराजांना भेटण्यास डोंगरीवर आले तेव्हा रामनवमीचा उत्सव बांदकर महाराजांच्या राम मंदिरात सुरू होता. तेच बांदकर महाराजांनी एका पौराणिक कथेवर इ. स. १८७० मध्ये रचलेले 'शुकरंभासंवाद' हे संगीत नाटक सुरू होते.[१७]

त्या नाटकातील विषय ज्ञान, भक्ती, वैराग्य, तत्वज्ञान, अध्यात्म अशा तत्वांना प्राध्यान्य देणारा होता. शुकरंभा संवाद हे पौराणिक कथेवर आधारलेले नाटक असल्यामुळे त्या नाटकाच्या सादरीकरणात अप्रतिम रंग चढला होता. त्यातील पात्रांचे अभिनय, त्यांच्यामुखातून येणारी पदे व बांदकर महाराजांच्या मधूर, सुरस वाणीने गायिलेली पदे, श्लोक नाटकातून येणे विलक्षणीय होते. नाटकातून उत्पन्न होणारे विविध रस भाषणाची अपूर्व पद्धती आणि लाटानुप्रसायुक्त गद्य - पद्य स्वरूपाचे हे नाटक अण्णासाहेब किर्लोसकरांनी पाहिले ते नाटक पाहून किर्लोसकर आश्चर्यचकीत झाले. त्या नाटकात ते इतके रमुन गेले की त्यावेळी त्यांच्या मनात एक महत्त्वाकांक्षा निर्माण झाली.

नाटक संपल्यावर किर्लोसकर राम मंदिरात बांदकर महाराजांना भेटण्यास गेले. बांदकरांशी भेटल्यावर किर्लोसकरांनी सादर केलेली नाटके घेऊन मुंबईला यावे अशी विनंती केली. तेच बांदकर महाराज म्हणाले परंतु ती नाटके सादर करून पैसे व कीर्ति मिळविण्याचा आपला हेतु उद्दिष्ट नाही; फक्त भागवत स्वरूपाचे व भागवतलीलांचा विस्तार करण्याचाच हेतु आहे. असे म्हटल्यावर किर्लोसकरांनी 'येण्याची इच्छा नसेल तर नको, पण सदर्हू नाटके तरी आपणास द्यावी अशी परत विनंती अण्णांनी केली. परंतु ती नाटके पुस्तक रूपाने स्वतंत्र नसून प्रत्येक पात्रांकडे त्या त्या वेळी तयार करून दिलेले त्यांचे खर्डे होते. त्यामुळे तीही त्यांना नेता आली नाही. शेवटी आपल्याला नाटके करण्याची याच ठिकाणी स्फूर्ती उत्पन्न होत

आहे. याकरीता आपल्या हातून प्रसाद तरी मिळावा अशी इच्छा व्यक्त केली. ते पाहून बांदकरांनी श्रीराम व श्रीमारुतिरायाकडे अण्णासाहेबांची इच्छा पूर्ण व्हावी यासाठी बांदकर महाराजांनी प्रार्थना केली आणि श्रीरामाच्या चरणाकडील श्रीफळ व पुष्पे प्रसादरूपाने किर्लोसकरांना दिली.[१८]

बांदकरांकडून प्रेरणा घेऊन अण्णासाहेब किर्लोसकरांनी महाराष्ट्रात जाऊन सात अंकी 'संगीत शाकुंतल' हे नाटक लिहून पुणे येथे मराठी रंगभूमीवर इ. स. १८८० साली ते सादर केले व दिवंगत यशकिर्ती प्राप्त केली.[१९] त्यापूर्वी वर उल्लेख केल्याप्रमाणे सर्वप्रथम गोमांतकात डोंगरी या गावात श्री. कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर यांनी इ. स. १८७० मध्ये 'शुकरंभा संवाद' हे नाटक रचून ते सादरही केले होते. याविषयी जनार्दन वेर्लेकर लिहितात. "गोमंतक अनेक नाट्यगायक मराठी रंगभूमीवरील आद्य स्त्री नाट्यकर्ती म्हणून जसं हिराबाई पेडणेकरचे नाव घेतले जाते. त्याने तसेच आद्य मराठी नाटककार म्हणून अण्णासाहेब किर्लोसकरांऐवजी श्री कृष्णभट्ट बांदकर ह्यांचे नाव सर्वश्रुत आहे. १९ व्या शतकात मोचेमाडकरांच्या दशावतारी नाटकापेक्षा नव्या प्रकारची नाटके बसविण्याची सुरुवात त्यांनी सर्वप्रथम डोंगरी, तिसवाडी, गोवा येथे १८७० च्या दरम्यान केली"[२०]

आचार्य अत्रे लिहितात "महाराष्ट्र गोमंतकाच्या गळयांतून गातो आहे." [२१] अत्रेंच्या या विधानावरून सहज लक्षात येते की महाराष्ट्राऐवजी संगीत नाटकाची सुरुवात सर्वप्रथम गोमंतकात उत्पन्न झालेली दिसून येते. गोविंद नाईक आपल्या रंगभूमी आणि नाटक या लेखात लिहितात "डोंगरी या गावात १८७० साली संगीतप्रधान नाट्यप्रकाराची मुहूर्तमेढ कृष्णभट्ट बांदकर यांनी रोवलीच"[२२] संत कृष्णभट्ट बांदकरांची व अण्णासाहेब किर्लोसकरांची डोंगरी येथे रामनवमीच्या दिवशी नाटक सादरीकरणावेळी भेट झालेली आणि त्या भेटीदरम्यान बांदकरांनी किर्लोसकरांना जे उत्तर दिलेले ते लक्षवेधी आहे. ते असे की 'ही नाटके करून पैसा अगर कीर्ती मिळविण्याची आपला हेतू नसून फक्त भगवतलीलांचा विस्तार करण्याचा हेतू आहे'[२३] अशा बांदकरांच्या उत्तरावरून हेही कळते की कृष्णभट्ट बांदकरांना यश, कीर्ती, द्रव्यांचा मुळीच मोह नव्हता. ज्या क्षणापासून बांदकरांना गुरुपदेशाचे मार्गदर्शन झाले त्या क्षणापासून ते माया, मोह, लोभ, क्रोध, मत्सर, स्वार्थ, अहंकार या षडरिपूने व्यापलेल्या विश्वाच्या या भवसागरातून तारून वर आले होते. ते खऱ्या अर्थाने संत होते. सदैव जनहितासाठी झटत होते व रामदासी संप्रदायाच्या मार्गदर्शनातून जनकल्याण करीत होते.

### ३.३ संत कृष्णभट्ट बांदकर विरचित अहिल्योद्धार नाटकाचे कथानक

संत कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकरांनी डोंगरी येथे आपल्या राम मंदिरात सादर केलेली चार संगीत नाटके म्हणजे 'शुकरंभासंवाद, लोपामुद्रासंवाद नटसुभद्राविलास व अहिल्योद्धार' या चारही संगीत नाटकाचे नाव गोमंतकात व गोमंतकाबाहेरही प्रसिद्ध आहे. वर उच्चारलेल्या 'शुकरंभासंवाद, लोपामुद्रासंवाद व नटसुभद्राविलास या तीन नाटकांच्या लिखित संहिता आज उपलब्ध नाही. पण 'अहिल्योद्धार' या नाटकाची संहिता आजही बांधकारांच्या वंशाच्याकदे जीर्ण स्थितीत उपलब्ध आहे. अहिल्योद्धार या नाटकाचे संकलन श्री विजयकुमार नाईक यांनी करून ते हंस थिएटर ट्रेनिंग सेंटर फोंडा, जून २००५ मध्ये प्रकाशन करून ५ डिसेंबर २००४ रोजी सायंकाळी ६:३० वाजता राजीव गांधी कला मंदिर फोंडा येथे या नाटकाचे सादरीकरण केले होते. संत कृष्णभट्ट बांदकर विरचित अहिल्योद्धार या नाटकाचे कथानक पुढील प्रमाणे.

'अहिल्योद्धार' या नाटकाचे कथानक हे गौतम ऋषी व त्यांची पत्नी देवी अहिल्या या रामायणातील पौराणिक कथेवर अवलंबून असलेले दिसून येते. श्रीराम समर्थांना वंदन करून बांदकरांनी या नाटकाची सुरुवात केलेली आहे. या नाटकातून येणारा हरिदास हा या नाटकाचा सूत्रधार आहे. इंद्र व एका देवामध्ये संभाषण चालू आहे. इंद्र त्या देवाला म्हणतो की 'त्या ब्रह्मदेवाने माझी बुद्धी विकल केली आहे. दोन प्रहरामध्ये पृथ्वी प्रदक्षिणा घालून जो पुरुष प्रथम येणार तो आपल्या अहिल्येचा नवरा होणार अशी शर्यत व ब्रह्मदेवाने आपली बुद्धी लावून व आपले वेदवाक्यकाढून त्या सुवर्णासारख्या सुंदर अहिल्येचा विवाह अगदी त्या वृद्ध, कंगाल, ब्राह्मण गौतम नावाच्या मुनीसोबत केला आणि माझी तपश्चर्या व्यर्थ केली. परंतु काहीही प्रयत्न करून शेवटी त्या कपटी गौतमाचा वेषांतरसुद्धा घेऊन एकदा तरी त्या अहिल्येला प्राप्त करीन. याविषयी पाप सुद्धा झाले तरी काही चिंता नाही असे म्हणून इंद्र निघून जातो.

अहिल्या ही एक पतिव्रता स्त्री असून तिचा स्वभाव अत्यंत सरळ, निष्पाप, निरागस असा आहे. संत हे सदाचारी, परोपकारी असतात. अध्यात्म, तत्त्वज्ञान, भक्ती, ज्ञान, सतमार्गाने चालायला ते जनताजनार्दनांना

शिकवितात. या नाटकातून सुद्धा तसेच मार्गदर्शन करणारे विविध स्वरूपाचे संदेश बांदकर महाराज देताना दिसतात. तेच गौतम ऋषी आपल्या शिष्याला रहणी सांगून जनांना प्रबोधन करण्यासाठी सांगतात.

शिष्य सभालोकांना पंचमहाभूतांचे व निराकार असलेल्या त्या परमेश्वराची साधना करायला सांगतो तेव्हा शिष्य म्हणतो 'भूमी म्हणजे आपल्या शरीराचा कठीण आकार, आप म्हणजे शरीरातील वोलेपणाचा भाग, तेज म्हणजे शरीरातील उष्णता, वायू म्हणजे शरीरातील पंचप्राण व आकाश म्हणजे पंचप्राणासहित सर्व शरीरास जाणणारे अंत:करण. जन्ममरणरुपी काळ हाच कोण मोठा उंच उंटासारखा अनंत हात पाय मेणू जबड्यांचा म्यांव म्यांव म्यांव करणारा बोका आहे अथवा; मोठे टीकोरे घेऊन दडून बसलेल्या मारेकऱ्यासारखा काळ आहे. त्याने तुमच्या बापाचे डोचके फोडले, आईचे डोचके फोडले, आमच्या आजोबा पणजोब्याचे नी पणजोबा खापर पणजोब्यांची डोचकी फोडली, भूमी रुपी खाटीक वाड्यास फार मार मारून फडाफडा फोडली. तेव्हा त्याने विषय सुख गेले रे घर बुडाले रे पोरे तरली रे बायको अंतरली रे गेली रे हाय हाय कुय कुय अशा बोबा ठोकल्या. इतक्यात काळाने नरडीचे घोट घेतले आणि दडाऊन सांगितले की त्यांच्यासारखा वेदोक्त धर्माप्रमाणे वागला नाही. तर मग आता कारे आता तर जिथे जिथे जन्मास जाशील तेथे ही तुझी मारता मारता हाल हाल करीन पहा पण जे कोण वेदोक्त धर्माप्रमाणे चालतात त्यांना तसे समागम करतात व रामाचे नामरूप आठवते. त्यांच्यावर माझा पराक्रम व्यर्थ होतो. पण तुम्ही दुष्ट आम्हा माझा दाढी तुमचे रक्त मेंदू खाण्यास वळवळतात असे बोलून काळाने बहुतांश खाल्ले, खात आहे व पुढेही खातीलच खातील सभाजनो सावध हो, सावध श्री राम स्मरण जानकी जीवन स्मरण करा. जय जय राम'[२४] या शिष्याच्या संवादावरून बांदकर महाराजांनी वेदांता विषयीचे महात्म्य, भक्ती, ज्ञान, याविषयी ते उद्बोधन करताना दिसतात.

सूर्याला ग्रहण लागल्यामुळे गौतम मुनी व शिष्य वैतर्णी नदीवर स्नान करून एकाएकी जब - तप, पूजा पाठ, अनुष्ठान करायचे ते ठरवितात. सूर्याला वा चंद्राला जे ग्रहण लागते ते ग्रहण कशामुळे लागते त्याविषयी गौतम ऋषी अहिल्येला माहिती सांगतात. राहू, केतू व पृथ्वी यांच्या विषयीचे तत्वज्ञान कथन करतात. हे सर्व सांगून गौतम ऋषी शिष्याबरोबर वैतर्णी नदीवर स्नान करायला जातात. तोच कपटी इंद्र गौतम ऋषीचा वेषांतर करून आश्रमात येतो. गर्मीमुळे आपले प्राण जातोय पाणी आण लवकर असे म्हणून ओरडून

अहिल्येला हाक मारतो. अहिल्या स्वयंपाकघरात असते तिच्या कानावर गौतम ऋषींचा स्वर पडतो. गौतम स्वरूपी इंद्र मूर्छीत होण्याचे ढोंग करतो. अहिल्या पळत पळत पाणी घेऊन बाहेर येते गौतम रूप धारी इंद्राला धरून सत्वन करते तोच गौतम अहिल्या म्हणून हाक मारतो. शुद्धीवर येतो तिला आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न करतो. तिचे पतिव्रत्य धर्म भंग करतो.

काही क्षणात गौतम वेषधारी इंद्र आपल्या स्वस्वरूपी येतो. अहिल्या रडते इंद्राला शिव्या शाप देते माझ्या चरित्रावर डाग लावला, माझे शील हरण केले. गौतम ऋषीला मी काय मुख दाखवू आता म्हणून ती प्रचंड घाबरते.

तेवढ्यात गौतम ऋषी आश्रमात येतो. अहिल्येला हाक मारतो अहिल्या रडत बाहेर येते. इंद्रही बाहेर येतो गौतम ऋषी इंद्राला आपल्या खऱ्या स्वरूपात ये म्हणून सांगतो कोण आहेस तू लवकर सांग म्हणून बजावतो. इंद्र आपल्या स्वस्वरूपी येतो. त्या भ्राजमानासकन्या अहिल्येला मला न देता सर्व देवापुढे माझी लाज केली. याचा द्वेष उत्पन्न होऊन प्रतिशोध घ्यायला तुमचे रूप धारण करून आला; मी तुमचा मोठा पराधी आहे. असे म्हणून इंद्र आपली क्षमा मागतो. गौतम ऋषीच्या क्रोधाचा बांध फुटतो अहिल्या व इंद्रदेव गौतम ऋषीच्या शापाला बळी पडतात. इंद्राने अहिल्येचा पतिव्रत्य भंग केला म्हणून गौतम ऋषी इंद्राला शाप देऊन तुझ्या शरीराला सहस्त्र भंग पडणार असा शाप देतो. त्या परपुरुषाजवळ जाऊन तू हा प्रसंग केला. त्याला ओळखण्यापुरते सुद्धा तुझ्यात इतकही ज्ञान नाही याकरता तू शिला होऊन पडेल.

अहिल्या गौतम ऋषी जवळ क्षमा याचना करते, विनवणी करती तेच थोड्यावेळाने गौतम ऋषीचा क्रोध शांत झाल्यावर गौतम ऋषीच्या मुखातून येणारा संवाद खूप महत्त्वाचा ठरतो. ते म्हणतात "अहिल्ये अग दोघांनाही दोन शत्रू सारखे जडले त्या इंद्राला काम आणि मला क्रोध झोंबून ब्रह्मानंदनुभवाचा बोध अगदी मलीन केल. एकाकी काही शोध न घेता निरपराध ग अहिल्ये तुला म्या शाप दिला"[२५] म्हणून परत अभय वरदान देतो की ज्यावेळी अनंत सुखधाम प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य अशाचे नाव निरंतर स्मरता नानाविध भक्त काम कल्पतरू जो भगवान त्याचा भूभार हरणार्थ अवतार होऊन सीता स्वयंवराला जात असताना

श्यामसुंदररूपी प्रभू रामचंद्राच्या चरणरंजाचा स्पर्श होताच वामलोचने अहिल्ये तुझ्या तत्काळ उद्धार होईल.[२६] तोपर्यंत अशीच शिळा होऊन पडेल.

मी आजवर जेवढे तप केले होते ते सगळे या एका क्रोधामुळे नष्ट झाले. त्यासाठी पुन:तपस्येला जातो. त्याचबरोबर इंद्रालाही शापातून मुक्त करून शरीरावर असलेले सहस्त्र भंग सहस्त्र रीतीने पाहण्याचे डोळे होतील व पूर्वीसारखा पौरुषाने सौख भोगायला मिळणार. याचप्रमाणे सगळ्या स्त्रियासहित आनंददायी अनुभवून रहा असे म्हणून शाप मुक्त करतो. शेवटी सीता स्वयंवरासाठी विश्वामित्र ऋषीबरोबर राम व लक्ष्मण मिथिला जाताना वाटेत शिळारुपी झालेल्या अहिल्येला श्रीरामाचा पदस्पर्श होऊन अहिल्या शाप मुक्त होते व तिचा उद्धार होतो.

संत कृष्णभट्ट बांदकरांनी अहिल्योद्धार या नाटकातून तत्कालीन समाज जीवनाचे चित्रण रेखाटले आहे. माणसांमध्ये असलेल्या षडरिपूमुळे अनाचाराचे लक्षण दिसते त्याचा त्याग करून सदाचाराचे गुण आत्मसात केल्याने ईश्वर प्राप्ती होते. त्याचबरोबर बांदकर महाराज हे रामभक्त असल्याने समाजाला रामभक्ति करण्याची प्रेरणा या नाटकातून प्राप्त करून देतात. अध्यात्म, तत्त्वज्ञान, भक्ती, ज्ञानयोग, भजन, कीर्तन या तत्त्वामुळे ईश्वर प्राप्ती होते. किंबहुना ईश्वर प्राप्तीची ही साधने आहेत. सगुण सदाचाराचा अवलंब करून अध्यात्म नीतीचा बोध करून घेणे हे या नाटकाचे निर्मिती मागचे मूळ सूत्र आहे.

### ३.४ स्वात्मतत्त्वामृतशतक

संत कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर यांचा 'स्वात्मतत्त्वामृतशतक' हा ग्रंथ त्यांचा श्लोकबद्ध असून त्यात १०१ आध्यात्मिक स्वरूपाचे श्लोक आलेले आहेत. बांदकरांनी सद्गुरूच्या आशीर्वादातून मिळालेले आध्यात्मिक मार्गदर्शन यातून हा ग्रंथ साकारलेला आहे. सद्गुरु प्रसादातून मिळालेले मार्गदर्शन पुढे बांदकरांनी जनहितांना उपदेश करण्यासाठी वापरले आहे. अध्यात्मासारखा गहन विषय स्वात्मतत्वामृतशतक या ग्रंथात कृष्णभट्ट बांदकरांनी अत्यंत सरळ, सुलभ करून सांगितलेला आहे. या ग्रंथाची भाषा, शब्दरचना, उपदेशपर शब्द शब्दकळा अत्यंत सोप्या आणि सर्वसामान्यांना कळेल अशी या ग्रंथ करून सांगितलेला आहे या

श्लोकांची रचना बांदकर महाराजांनी केलेली आहे. या ग्रंथाचे संपादन श्रीकृष्ण जगन्नाथ थळी यांनी शके १९२५ म्हणजे इ. स. १९०३ साली स्वतंत्र पुस्तक रूपाने छापून प्रसिद्ध केला आहे.[२७]

स्वात्मतत्वामृतशतक या ग्रंथातील श्लोकांचा समावेश 'श्री सद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकरमहाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह' या ग्रंथातही झालेला आहे. या ग्रंथाचे संपादन श्रीकृष्ण जगन्नाथ थळी यांनी शके १८५३ म्हणजे  इ. स.१९३२ मध्ये हा ग्रंथ प्रकाशित केला आहे.

सद्गुरूपदेश झाल्यावर या भवसागरातून तारून आल्यावर अध्यात्माची प्रचिती झाल्यावर हा मृगजळ भासणारा संसारसिंधू किती सुलभ वाटतो. याविषयी बांदकर महाराजांनी खालील श्लोकांची रचना केलेली आहे ती अशी.

**किति सुलभ असे हा मार्ग सच्छिष्य राया ॥**

**मृगजळवत हा संसारसिंधू तराया ॥**

**त्यजुनि सकळ वृत्ती उक्षितां आपणातें ॥**

**सहज सुखसमुद्रीं मग्नता ये मनातें ॥** [२८]

स्वतः आत्मनुभुती झाल्यावर आपण कोण आहोत? याचा शोध लागल्यावर जी नवी आध्यात्मिक वाट प्राप्त होते जे शरीर आपण धारण केलेले आहे ते शरीर आपले असूनही अपले नाही आहे. ते कल्पनेचे दृश्य आहे. हा सगळा घोळ जेव्हा दूर होईल त्यावेळी स्वस्वरूपाचा शोध लागेल. याविषयी विवेचन करणारा बांदकर महाराजांचा हा श्लोक आहे.

**तूं हें सर्व तुझ्यामधीं सकल हें ऐसा तुला तूं दिसे ॥**

**वाटे मीच शरीर हें तुज असे तें कल्पनेचें पिसें ॥**

**नाहीं हें जड दृश्य विश्व निरखीं सच्चित्सुख व्यापला ॥**

**आदी अंत न जेथ जेथ वळुनी घे शोध तूं आपला ॥** [२९]

सद्गुरूची अपार श्रद्धा व्यक्त करताना व गुरुने आध्यात्मिक मार्गदर्शनातून जी सात्विक दृष्टी दिली त्या दृष्टीतून ह्या सृष्टीचे गुण - अवगुण पारखण्याची दृष्टी सद्गुरू आपल्या अध्यात्मिक गुरुपदेशान देत असतो. या विषवी बांदकर महाराज म्हातात.

**आनंद चिद्धन अनंत अपार तो तूं। आहेसि व्यापुनि जगीं पटिं जेविं तंतू॥**

**हा विश्व मेघ वळखें मृगतोय सारा। चित्सूर्य तूंचि तुज जो दिसतो पसारा॥** [३०]

किंवा

**जें जें दिसे तुजावणें न तयासि थारा। तूं आपणा वळख चित्सुख निर्विकारा॥**

**माह साधिसी गुरुकृपांजन युक्त दृष्टी। आनंद रूपचि कळेल समस्त सृष्टी॥** [३१]

किंवा

**आहे नाहीं हे मनाचे विकार। त्या पूर्वी तूं सर्वदा निर्विकार॥**

**भासे नासे जाण ते सर्व माया॥ सांडी साधीं निश्चला आत्मठाया॥** [३२]

आपल्या गुरुची स्तुती करताना बांदकर महाराज लिहितात गुरु पेक्षाही जास्त तो शिष्य सुखदायी असतो. कारण परमेश्वररुपी अनुभव संपन्न आपल्याला गुरु भेटला व जे गुरुंनी अध्यात्मिक उपदेशाने स्वात्मतत्वाचे अमृत शिष्याला पाजले आहे त्यातून शिष्य परिपूर्ण झाला आहे. त्याविषयी बांदकर महाराजांचा श्लोक खालील प्रमाणे.

**गुरू तो जो शिष्या परम सुखदाता निज मुला ।।**

**चिदात्मैक्यस्फूर्ति धरुनि तनु मूर्ती प्रगटला ।।**

**गुरूदेवांमध्ये तिळभरिहि तूं भेद न धरी ।।**

**स्मसर्वे ते सञ्चित्सुख जलधि मी विश्व लहरी ।।** [३३]

किंवा

**विष्णू कृष्णजगन्नाथ स्मरणे सद्गुरुमुखें ।।**

**लाभेल जे स्वात्मतत्वामृत तें घोटि तूं सुखें ।।** [३४]

स्वात्मतत्वामृतशतक या ग्रंथाच्या शेवटी बांदकर महाराजांनी या ग्रंथातील श्लोक हे आपल्या गुरूला समर्पित केलेले आहे. आपल्या गुरूमुळे आपल्याला ही स्फुती प्रेरणा प्राप्त झाली आहे. असे म्हणून या ग्रंथाची सांगता बांदकर महाराज अशा शब्दात करतात.

**इति श्रीमद्वैष्णवसद्गुरुकृपान्वित कृष्णजगन्नाथस्फुरणजनित**

**स्वात्मतत्वामृत शतकम् संपूर्णम्.**

### ३.५ संत कृष्णभट्ट बांदकरांची अभंग रचना

संत कृष्ण जगन्नाथ भट्ट बांदकर महाराजांनी ‘शुकरंभासंवाद, लोपामुद्रासंवाद, नटसुभद्रविलास व अहिल्योद्धार’ अशी चार संगीत नाटके लिहिली. स्वात्मतत्वामृतशतक हा ग्रंथ रचला या व्यतिरिक्त बांदकर

महाराजांची अभंग रचना विलक्षण आहे. साध्या, सोप्या, सरळ, मधूर भक्ती रसाने व्यापलेले हे अभंग अभ्यासनीय आहे. श्री रघुरामाला वंदन करून बांदकर महाराज अभंग रचना करायला सुरुवात करतात.

सद्गुरु विषयीची अपार श्रद्धा बांदकरामध्ये आहे. सद्गुरूनी विश्वाच्या या भवसागरातून आध्यात्माच्या वाटेवर आणले श्रीराम हेच आपले सद्गुरू आहेत. त्याच्याविषयी स्तुती करताना ते अभंग रचना करतात.

**तुज नमन श्रीसद्गुरू । नये आत्म स्तवन करूं ॥ १ ॥**

**आपण अनंत अपार । वेदां न लगे ज्याचा पार ॥ २ ॥**

**तो तूं भेटला दातारा । दिला निजानंदीं थारा ॥ ३ ॥**

**विष्णु कृष्ण जगन्नाथा। मज तूंची माता पिता ॥ ४ ॥** [३५]

श्री रघु रामचंद्राविषयी बांदकर महाराजांनी अभंग रचना केलेली आहे. जणू राम आणि सीता हेच आता आपले मायबाप आहे त्यांचे दर्शन कधी होणार याविषयी त्यांची तळमळ दिसून येते. याविषयी ते अभंगाद्वारे आपले उद्गार व्यक्त करतात.

**नमन आपणातें वैष्णव सद्गुरु। तूं माय लेंकरू मी तुझें की ॥ १॥**

**नलगे मज तूझ्या स्वरुपाचा अंत । व्यापक अनंत आय देवा ॥ २ ॥** [३६]

किंवा

**रामा तुज विण कोणा। माझि येईल करुणा ॥ १ ॥**

**वत्सालागी जैशी गाई। सर्वार्थी तूं माझी आई ॥ २ ॥**

**जारी तूं टांकिसी वनमाळी । तरि मज कोण रे संभाळी ॥ ३ ॥**

**विष्णु कृष्ण जगन्नाथा । येरे वेळ न लावी आतां ॥ ४ ॥** [३७]

किंवा

**मज कंठवेना रामा। तुजविण एक घडि सुखधामा ॥ १ ॥**

**ह्मणुनी तुज काकुळती । दर्शन देरे सितापती ॥ २ ॥**

**जरि तूं राहसी ऊगला । समज माझा जीव गेला ॥ ३ ॥** [३८]

किंवा

**तुझ्या भेटीचा वियोग । न साहे परी कर्मभोग ॥१॥**

**माझा म्हणउनि तूंन येसी । मज कधिं रे दर्शन देसी ॥ २ ॥** [३९]

संत कृष्णभट्ट बांदकर महाराजांनी सरस्वती देवीवर लिहिले अभंग व गणपती देवावर रचलेले अभंग लक्षवेधी आहे. अनन्या, अपार श्रद्धा व्यक्त करून देवीदैवतांची स्तुती करून रचलेले हे अभंग आजही लोकप्रिय आहे. साध्या, सोप्या, सुलभ आशा शब्दांनी व्यापलेले हे अभंग शांत व भक्ती रसाने विस्तारलेले आहे.

**नमन तुला सरस्वति । माझी हरी मंद मती ॥ १ ॥**

**माझें जडत्व परिहारों । सच्चित्सुख स्फुरबुनि तारी ॥ २ ॥**

**तुझी पूर्ण कृपा होतां । नुरे दरिद्र दुःख व्यथा ॥ ३ ॥**

**तूंचि आवडसी एकांता । विष्णु कृष्ण जगन्नाथा ॥४ ॥** [४०]

किंवा

**विघ्न नाशना गणपती । माझी तुजला प्रणती ॥ १ ॥**

**येतां विघ्नातें निवारीं । मज तारीं या संसारी ॥ २ ॥**

**सकळ संसाराचा शीण । वाटे एक तुजविण ॥ ३ ॥**

**विष्णु कृष्ण जगन्नाथा । देसी दर्शन सुख सर्वथा ॥ ४ ॥** [४१]

संत कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराजांनी संगीत नाटके रचली, ग्रंथरचना, अभंग रचना या व्यतिरिक्त बांदकारांची सर्वात सुगम व सुबोध अशी पद रचना आजही गोमंतकात लोकप्रिय आहे. बांदकरांनी गोमंतकातील विविध देवी दैवतावर स्तुती पदे रचलेली आहे. ‘मराठी विश्व चरित्रकोश खंड ३ या कोशग्रंथानुसार बांदकर महाराजांच्या पद्यरचनाची संख्या सुमारे ८०० भरते. त्यात आख्याने, अभंग, श्लोक, स्फुट रचना आदींचा समावेश आहे. त्यांची पदे रागरागिण्यावर आधारित असत आणि त्यात सुबोध प्रासादिक भाषेत परमार्थाचे निरूपण असे’[४२] कृष्णभट्ट बांदकरांची पदे ही त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील प्रसंगानुसार त्यांची पदे असलेली दिसून येतात. ईश्वर स्तुतीपर पदे हे बांदकरांच्या पदांचे वैशिष्ट्य आहे.

बांदकर महाराजांच्या पदांची शीर्षके खालील प्रमाणे नोंदवता येईल. ‘मारुतीची पदे, श्री दत्तात्रेयाची पदे, श्री दामोदराची पदे, श्री नागेशाची पदे, श्री लक्ष्मीवेंकटेशाची पदे, श्री लक्ष्मीनृसिंहाची पदे, श्री नृहसिंहाची पदे, श्री कामाक्षेची पदे, श्री कपिलेश्वराची पदे, श्री जगदंबेची पदे, श्री नरसिंहाची पदे, श्री नवदुर्गेची पदे, श्री चंद्रेश्वराची पदे, श्री मंगेशाचे पद, श्री बिंदुमाधवाचे पद, श्री शांतादुर्गेचे व श्री विजयदुर्गेचे पद, श्री महालसेची पदे, श्री महालक्ष्मीचे पद,  श्री विठ्ठलाची पदे, श्री पांडुरंगाची पदे, श्रीरामनाथाची पदे, श्री मदनंताची पदे, श्री लक्ष्मीनारायणाची पदे,  श्री शितलादेवीचे पद, श्री षष्ठीची पदे, श्री देवकीकृष्णाची पदे, श्री जगदंबेची पदे, श्री गणपतीचे पद, श्रीरामाचे पद, श्रीकृष्णाची पदे. अशी ईश स्तवनपर पदे बांदकर महाराजांनी मोठ्या प्रमाणात रचलेली आहे.

## ३.६ समारोप

‘गोमंतकीय संत श्री कृष्णभट्ट बांदकर यांची नाट्यसंपदा व अहिल्योद्धार या नाटकाचा विवेचक अभ्यास’ या प्रकरणांतर्गत संत कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर यांचे जीवनचरित्र सुसंगतपणे रेखाटले आहे. त्याचबरोबर कृष्णभट्ट बांदकरांचे अहिल्योद्धार या नाटकाचा अभ्यास या प्रकरणात यथायोग्य झालेला आहे. कृष्णभट्ट बांदकरांची अभंग रचना, पद रचना व ग्रंथरचना याचाही परामार्श घेतलेला आहे.

## ३.७ निष्कर्श

१. संत कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर यांनी आपल्या आत्मचरित्र पर पदातून आपले सर्व जीवनचरित्र रेखाटले आहे.

२. कृष्णभट्ट बांदकरांचे शुकरंभासंवाद हे नाटक पाहून व बांदकरांशी प्रेरणा घेऊन किर्लोसकरांनी संगीत शाकुंतल हे नाटक लिहिले.

३. बांदकारांनी १८७० मध्ये शुकरंभासंवाद हे नाटक लिहिले तर अण्णासाहेब किर्लोकरांनी १८८० साली संगीत शाकुंतल हे नाटक लिहिले. बांदकरांचे नाटक हे खुल्या रंगमंचावर झाले नाही त्यांचे नाटक हे गावाच्या चार चौकटीतच राहिले तर किर्लोसकरांनी त्यांच्याकडून स्फूर्ती घेऊन आपले नाटक रंगमंचावर सादर केले म्हणून आजतागायत लोकांना नाट्याचार्य म्हणून केवळ किर्लोसकरच स्मरणात आहे.

४. नाटक या साहित्य प्रकाराचा उल्लेख करत असताना अण्णासाहेब किर्लोसकरांच्याही आधी संत कृष्णभट्ट बांदकरांचे नाव आवर्जून घेणे महत्त्वाचे ठरते.

५. रामदासी गुरुपदेश घेतल्यामुळे रामदास संप्रदायाचा प्रचार, प्रसार करण्यामागे श्री कृष्णभट्ट बांदकरांचा खूप मोठा वाटा आहे.

६. गुरु शिष्याला सहस्त्रविद्या शिकवतो त्यात गुरुचे संघर्ष इतरांना दिसत नाही. केवळ शिष्याचे पराक्रम, प्रगती लोकांना दिसते. त्याचप्रमाणे संत कृष्णभट्ट बांदकर व अण्णासाहेब किर्लोसकर यांच्यामध्ये असे मतभेद झालेले आहे.

७. गंगेचे उगमस्थान हे हिमालय आहे तसेच संगीत नाटकाचे उगमस्थान हे गोमंतक डोंगरी आहे हे विसरता कामा नये.

८. संत कृष्णभट्ट बांदकारांचे अहिल्योद्धार या नाटकाचा विषय हा अध्यात्म, भक्तीला प्राधान्य देणारा आहे. त्यामुळे समाजाला प्रबोधन, उद्बोधन व मार्गदर्शन करणे याच त्रिसूत्री तत्त्वांना अनुसरून बांदकरांनी या नाटकाची निर्मिती केली होती.

९. श्रीकृष्णभट्ट बांदकरांचा स्वात्मतत्त्वामृतशतक हा ग्रंथ अध्यात्मिक स्वरूपाची अनुभूती विशद करणारा ग्रंथ आहे.

१०.स्वात्मतत्वामृतशतक या ग्रंथाचा मुख्य गाभा हा अध्यात्म, तत्त्वज्ञान सांगणारा आहे.

११.संत कृष्णभट्ट बांदकारांची अभंग रचना ही राम भक्तीला प्राधान्य देऊन रचलेले अभंग आहे

१२. संत कृष्णभट्ट बांदकर हे केवळ कवी नव्हते तर ते उत्तम गायकही होते.

१३.मराठी, संस्कृत, हिंदी व कोकणी या भाषावर ही बांदकरांचे जबरदस्त प्रभुत्व होते.

१४.बांदकर महाराजांची पद रचना पाहता दैनंदिन जीवनात येणारे स्थल, काल, व्यक्ती या प्रसंगानुसार त्यांची पद रचना असलेली दिसून येते.

१५.बांदकर महाराजांच्या पद रचनांचा मुख्य विषय भक्ती हाच आहे.

## ३.८ संदर्भ सूची


१. श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. ११

२. श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. १२० - १२१

३. श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. ११

४. श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. १२

५. श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र.१३

६. श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र.१५

७. सातोस्कर. बा. द, गोमंतकीय मराठी साहित्याचे शिल्पकार भाग १, सागर साहित्य प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथमावृत्ती १९७५, पृष्ठ क्र. १२०

८. सातोस्कर. बा. द, गोमंतकीय मराठी साहित्याचे शिल्पकार भाग १, सागर साहित्य प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथमावृत्ती १९७५, पृष्ठ क्र. १२०

९. श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र.१६ – १७

१०. सातोस्कर. बा. द, गोमंतकीय मराठी साहित्याचे शिल्पकार भाग १, सागर साहित्य प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथमावृत्ती १९७५, पृष्ठ क्र.१२१

११. श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. २८ – २९

१२. श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. १८ – १९

१३. श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. ३०

१४.गोमंतकीय मराठी वाङ्ग्याच्या इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथामावृत्ती नोव्हेंबर २००१, पृष्ठ क्र. २८५

१५.गोमंतकीय मराठी वाङ्ग्याच्या इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथामावृत्ती नोव्हेंबर २००१, पृष्ठ क्र. ७२

१६.गोमंतकीय मराठी वाङ्ग्याच्या इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथामावृत्ती नोव्हेंबर २००१, पृष्ठ क्र. २८५

१७.गोमंतकीय मराठी वाङ्ग्याच्या इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथामावृत्ती नोव्हेंबर २००१, पृष्ठ क्र. ४०६

१८.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र  समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र.३१

१९.गोमंतकीय मराठी अस्मिता, संपादक, डॉ. प्रकशचंद्र पा. शिरोडकर, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथमावृत्ती नोव्हेंबर २००१, पृष्ठ क्र. ८९

२०.गोमंतकीय मराठी अस्मिता, संपादक, डॉ. प्रकशचंद्र पा. शिरोडकर, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथमावृत्ती नोव्हेंबर २००१, पृष्ठ क्र. ८९

२१.गोमंतकीय मराठी अस्मिता, संपादक, डॉ. प्रकशचंद्र पा. शिरोडकर, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथमावृत्ती नोव्हेंबर २००१, पृष्ठ क्र. ८८ - ८९

२२.गोमंतकीय मराठी वाङ्ग्याच्या इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथामावृत्ती नोव्हेंबर २००१, पृष्ठ क्र. ४०६

२३.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र  समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. ३१

२४.बांदकर कृष्णभट्ट, अहिल्योद्धार, संकलन, विजयकुमार नाईक, हंस थिएटर ट्रेनिंग सेंटर, फोंडा, गोवा, प्रकाशन, जून २००५, पृष्ठ क्र. ४ - ६

२५.बांदकर कृष्णभट्ट, अहिल्योद्धार, संकलन, विजयकुमार नाईक, हंस थिएटर ट्रेनिंग सेंटर, फोंडा, गोवा, प्रकाशन, जून २००५, पृष्ठ क्र. २६

२६.बांदकर कृष्णभट्ट, अहिल्योद्धार, संकलन, विजयकुमार नाईक, हंस थिएटर ट्रेनिंग सेंटर, फोंडा, गोवा, प्रकाशन, जून २००५, पृष्ठ क्र. २७

२७.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र  समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. १६

२८.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र  समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र.२१

२९.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र  समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. १८

३०.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र  समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. १८

३१.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र  समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र.१८

३२.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र  समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. १८

३३.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र  समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र.२२

३४.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. २४

३५.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. १३५

३६.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. १३५

३७.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र.१३६

३८.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र.१३९

३९.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. १३९

४०.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. १३५

४१.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ थळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२, पृष्ठ क्र. १३५

४२.मराठी विश्वचरित्र कोश खंड ३, संपादक, श्रीराम पांडुरंग कामत, प्रकाशक, कार्यवाह विश्वचरित्र संशोधन केंद्र, गोवा, प्रकाशन ७ सप्टेंबर २००५

प्रास्ताविक ........ 95

४.१ संत सोंसुबाई सावर्डेकर यांचा परिचय ........ 96

४.२ सोंसुबाई विरचित अभंग कुसुमावली ........ 97

४.३ संत सोंसुबाई यांची अभंग रचना ........ 98

४.३.१ श्रीकृष्णाचे अभंग ........ 99

४.३.२ श्रीरामाचे अभंग ........ 100

४.३.३ श्री शंकराचे अभंग ........ 103

४.३.४ ईशस्तुतीपर संकीर्ण अभंग ........ 105

४.३.५ अभंग मानाचे ........ 107

४.४ समारोप ........ 109

४ ५.निष्कर्ष ........ 110

४ ६.संदर्भ सूची ........ 111

## प्रकरण चौथे

## गोमंतकीय संत कवयित्री सोंसुबाई सावर्डेकर यांच्या अभंगांचा अभ्यास

### प्रास्ताविक

भारतामध्ये संत साहित्याची परंपरा खूप जुनी आहे. त्यामुळे भारताच्या इतर प्रांत प्रदेशांना संत साहित्याचा सुगम सुहास लाभलेला आहे. अगदी प्राचीन काळात महाराष्ट्रामध्ये होऊन गेलेले संप्रदाय त्यात महानुभाव संप्रदायामध्ये होऊन गेलेल्या आद्य स्त्री कवयित्री म्हणून 'महादाइसा' (महदंबा) यांचा सर्वप्रथम उल्लेख करावा लागतो. त्याचबरोबर वारकरी संप्रदायामध्ये होऊन गेलेल्या स्त्री संत कवयित्रीमध्ये 'संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत बहिणाबाई, संत सोयराबाई, संत निर्मळाबाई, संत कान्होपात्रा व रामदासी संप्रदायामध्ये संत वेणाबाई यांचे अभंग, पदे आणि इतर स्फूट रचना आजतागायत खूप प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रामध्ये पेटलेली भक्ती, ज्ञान, अध्यात्म, तत्वज्ञान या स्वरूपाची तेजोमय ज्योत गोमंतकातही पेटलेली दिसून येते. त्यात गोमंतकीय संत कवयित्रींचा समावेश होतो. गोमंतकीय संत कवयित्रींचा विचार केला तर इतरांपेक्षा गोमंतकीय संत कवयित्रींची संख्या नगण्यच आहे.

१८७२ ते १९२० या कालखंडात गोमंतकामध्ये 'गोकुळाबाई तळावलीकर' या संत कवयित्री होऊन गेल्या त्यांनी 'श्रीसिद्धारूढ चरित्र' हे काव्य लिहिले त्यांचे हे काव्य इस १९२४ मध्ये प्रकाशित झाले होते. त्यानंतर 'गोदावरीबाई विष्णू नायक' यांचा जन्म कुंकळ्ळी येथे १८९७ व निधन १९५७ मध्ये झाले. त्यांना विठ्ठलाचा दृष्टांत झाला त्यानंतर त्यांचे पूर्ण जीवन बदलून गेले. त्या दृष्टांतादरम्यान त्यांना काव्य स्फुरले ते काव्य 'चाखूं आम्ही ज्ञानामृत' या नावाने प्रसिद्ध झालेले आहे. त्यांच्या निधनानंतर हे काव्य प्रकाशित झाले.[१] अगदी रसाळ, मधुर, भक्ती रंगात रमून गेल्यासारखे त्यांच्या काव्याचे शब्द आजही मन लोभावतात.

गोमंतकातील तिसऱ्या संत कवयित्री म्हणजे 'सौ. सीताबाई कुंडईकर' यांचा जन्म १८७७ व निधन १९४२मध्ये झाले. सौ. सीताबाई कुंडईकर यांचे चरित्र रामचंद्र चंदगडकर यांनी १९४५ साली प्रसिद्ध केले त्यावरून त्यांच्या जीवनाची माहिती सापडते. त्या रामभक्त होत्या त्यांच्या कविता, अभंग या राम भक्तीने व्यापलेल्या आहेत.[२] त्यानंतर गोमंतकामध्ये अगदी तेजपुंजाने उजळून आलेल्या गोमंतकातील संत कवयित्री म्हणजे 'संत रुक्मिणीबाई  केंकरे उर्फ सोंसुबाई सावर्डेकर यांचेही नाव मोठ्या अभिमानाने घेतले जाते. 'गोमंतकीय संत कवियत्री सोंसुबाई सावर्डेकर यांच्या अभंगांचा अभ्यास' या प्रकरणांतर्गत सोंसुबाईंचा परिचय व त्यांच्या अभंगांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

सोंसूबाई सावर्डेकर यांच्या जीवनाची अल्प माहिती त्यांच्या 'अभंग कुसुमावली' या काव्यसंग्रहात प्रा. रवींद्र घवी यांनी प्रसिद्ध केलेली आहे'.[३] त्याचबरोबर 'गोमंतकीय वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला' या ग्रंथात प्रा. आशा मणगुटतकर यांनी सोंसुबाईंच्या जीवनाची अल्प माहिती दिलेली आहे. या माहितीवरून त्यांच्या जीवनाचा अल्प परिचय करून देण्यात आलेला आहे.

### ४.१ संत सोंसुबाई सावर्डेकर यांचा परिचय

गोमंतकीय संत कवयित्री 'रुक्मिणीबाई केंकरे' उर्फ 'सोंसुबाई सावर्डेकर'  या १९ व्या शतकाच्या उत्तरार्ध ते २० व्या शतकाच्या पर्वार्धात होऊन गेलेल्या गोमंतकीय थोर संत कवयित्री होत्या. त्यांचा जन्म सावर्डे येथील एका प्रसिद्ध कुलकर्णी घराण्यात झाला. लहानपणापासूनच त्या विद्वान होत्या. त्यांच्या वडिलांचे नाव 'विठ्ठल' व आईचे नाव 'आनंदी' असे होते. त्या काळातील प्रथा - परंपरेनुसार अगदी लहानपणीच  सोंसुबाईंचा विवाह कुंकळ्ळी येथील 'यशवंत केंकरे' यांच्याशी झाला 'सोंसुबाई' हे त्यांच्या माहेरचे नाव तर 'रुक्मिणीबाई' हे त्यांच्या सासरचे नाव त्यांच्या सासरची माहिती आज उपलब्ध नाही. परंतु अगदी अल्पकाळातच यशवंत केंकरे यांचे निधन झाल्यामुळे लहानपणीच सोंसुबाईंच्या पदरी वैधव्य आल्याने त्यांना माहेरी प्रस्थान करावे लागले. त्यानंतर त्यांचे सगळे आयुष्य त्यांच्या माहेरी सावर्डे येथेच गेले.

त्या काळातील प्रथेप्रमाणे त्यांचे केशवपन झाले. सोंसुबाई आपला सारा वेळ देवाच्या पूजा - अर्चेतच घालवू लागल्या. त्यांनी केवळ घरीच लिहिण्या वाचण्यापुरतेच शिक्षण घेतले होते. त्यांच्या घरात काही विद्वान मंडळी होती त्यांचा संत वाङ्मयाचा गाढा अभ्यास होता. ते ज्ञानदेव ज्ञानेश्वरीचे भक्त होते. सोंसुबाईंची वृत्ती लहानपणापासूनच सात्विक होती. त्यामुळे संत साहित्यावर घरात होणाऱ्या चर्चा, विचारांचा सोंसुबाईवर विशेष प्रभाव पडला. आपला सारा वेळ त्या ईशचिंतनात, नामस्मरणात घालवित होत्या. या भक्तीमय मनाच्या अवस्थेत त्यांच्याकडून भक्तिमय अशा अभंगांची रचना झाली. लहानपणीच वैधव्य आल्यामुळे सोंसुबाई हेच नाव त्यांनी पुढे चालवलेले दिसते. 'सोंसुबाईनी 'टाकी महाराज' या सत्पुरुषाला आपले गुरु मानले होते. ही आजवर उपलब्ध झालेली सोंसुबाईंची माहिती आहे'. [४]

## ४.२ सोंसुबाई विरचित अभंग कुसुमावली

गोमंतकीय संत कवयित्री सोंसुबाई सावर्डेकर यांचा 'अभंग कुसुमावली' हा अभंग काव्यग्रंथ इ. स. १९२९ मध्ये संगमोदय प्रिंटिंग प्रेस सांगे गोवा येथून प्रकाशित झाला.[५] 'अभंग कुसुमावली ह्या अभंग ग्रंथाची नोंद 'गोमंतकीय लेखकांच्या मराठी ग्रंथांची सूची' संकलनकार काशिनाथ वासुदेव केंकरेंच्या ग्रंथ सूचीत सापडते'.[६] संत मुक्ताबाई संत जनाबाई व इतर संत कवयित्रीप्रमाणे संत सोंसुबाई यांचा अभंग कुसुमावली या ग्रंथामध्ये येणारे अभंग हे सुबोध, सुरस, सरळ, सोप्या, सर्वसामान्यांना समजेल अशी या ग्रंथाची अभंग रचना, शब्दकळा आहे. संत सोंसुबाई यांनी विविध देवी दैवतावर अभंग रचना केलेली आहे. उदाहरणार्थ श्रीराम, श्री शंकर, श्री कृष्ण, श्री हनुमान, श्री दत्तात्रेय इत्यादी देवांवर त्यांनी अभंग रचना केलेली दिसून येते.

महाराष्ट्रामध्ये शेवटचा संप्रदाय हा 'रामदास संप्रदाय' असल्यामुळे रामदासी संप्रदायाचा संत सोंसुबाईंवर समर्थ रामदासाच्या मनाच्या श्लोकांचा खूप प्रभाव होता. त्यामुळेच सोंसुबाईंनी ११७ 'मनाचे अभंग' रचलेले आहे. त्या अभंगांचा समावेश अभंग कुसुमावली या ग्रंथामध्ये झालेला आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे या ग्रंथात विषयांप्रमाणे विभाग करून अभंग दिलेले आहे. अभंग कुसुमावली या ग्रंथात एकूण १०८१ अभंग, ८ पदे, काही ओव्यांचाही समावेश या ग्रंथामध्ये झालेला आहे.[७] सोंसुबाईंच्या अभंग

कुसुमावली या ग्रंथाचे वाचन केल्यास मनात अत्यंत चैतन्य निर्माण होते. इतकी रसाळ आणि विलक्षणिय असे या ग्रंथामध्ये आलेल्या अभंगांची जुळणी आहे.

### ४.३ संत सोंसुबाई यांची अभंग रचना

संत सोंसुबाई सावर्डेकर यांच्या अभंग कुसुमावली या ग्रंथामध्ये येणारे अभंग हे त्यांच्या प्रतिभा शक्तीचे कौशल्य आहे. 'एकूण १०८१ अभंगातून त्यांच्या चरित्राची व मानसिक अवस्थांतराची तसेच भोवतालच्या परिस्थितीचे आकलन होते'[८]

वारकरी संप्रदायातील संतानी विठ्ठलाच्या सगुण रूपाचे वर्णन केले आहे. परंतु सोंसुबाई ह्या श्रीराम, श्रीकृष्ण, श्रीशंकराच्या सगुण रूपाचे वर्णन करताना दिसतात. डॉ. हेमन्त वि. इनामदार यांनी सोंसुबाईंच्या काव्याची तुलना महाराष्ट्रातील दोन संत कवयित्रींशी (चोखामेळयाची बायको व चोखोबांची भगिनी) यांच्याशी केलेली आहे. ते या संदर्भात म्हणतात "संत सोयराबाई (चोखोमेळा यांच्या पत्नी) संत निर्मळाबाई (संत चोखोबांच्या धाकट्या भगिनी) व संत सोंसुबाई यांनी उपेक्षा, अवहेलना व अपमान यामुळे अगतिक न होता, आपल्या आयुष्याच्या कहाण्या सफल-संपूर्ण केल्या आहेत. या तीन संत कवयित्रींनी प्रपंचाची भक्ती केली नाही. त्यांनी भक्तीचाच प्रपंच केला!"[९]

सोंसुबाईंच्या काव्याचा अभ्यास केल्यावर प्रा. रवींद्र घवींनी त्यांच्याविषयी अत्यंत मार्मिक अभिप्राय दिला आहे. ते म्हणतात "आज पन्नास वर्षांनंतरसुद्धा या कुसुमावलीतील अभंगांचा आस्वाद मनाला प्रसन्न, तल्लीन करून टाकतो. उत्कट, निर्मळ भावना आणि सफाईदार रचना या गुणांमुळे सोंसुबाईंची कविता आजही मोहविते."[१०]

### ४.३.१ श्रीकृष्णाचे अभंग

'अभंग कुसुमावली' या काव्यग्रंथामध्ये ४४२ श्रीकृष्णाचे अभंग आलेले आहेत. आपल्या आयुष्यात आलेल्या दुःखाचे सात्वन करीत सोंसुबाई बसल्या नाही. निरंतर देवभक्तिची याचना करताना त्या दिसतात. देव प्राप्तीची अनन्य आस त्यांच्यामध्ये असलेली दिसून येते. श्रीकृष्णाला प्राप्त करण्यासाठीची त्यांची झालेली घालमेल दिसून येते. भक्त आणि भगवंताची भेट होत नाही यासाठीची त्यांची तळमळ दिसून येते. म्हणून त्या एका अभंगातून म्हणतात की.

**वृंदावनवासी गोपिमनोहरा । राधाप्रियकरा कृष्णनाथा ॥ १॥**

**मीया भयंकर उपजले जन्मा । कां रे पादयुग्मा दाखवीना ॥ २॥**

**ठेवीसी जपून प्रितीच्या भक्ताला । मज अमकाला कोण पूले ॥३॥**

**सोंसु म्हणे हौस पुरविता कोण । नाहीं तुजविग जगीं दूजा ॥ ४ ॥** [१०]

सुरुवातीला कृष्णप्राप्तीसाठी सोंसुबाई कशा तनमयतेने आपली तळमळ, आर्तता व्यक्त करतात आणि नंतर त्याच सोंसुबाई कृष्णमयी कशा होतात हे या अभंगातून दिसून येते. भक्त आणि भगवंत हे एकरूप झालेले आहे. अद्वैताचा ही विचार सोंसुबाई इकडे करताना दिसतात.

**नारायणा माझा घेई समाचार । माझें तूं माहेर दीनबंधो ॥ १ ॥**

**तूंची माझी माता तूंची माझा पीता । बहिण चुलता बंधू तूंची ॥२॥**

**तूंची कन्या पुत्र तूंची माझा मित्र । तूंची कुळ गोत्र नारायणा ॥ ३ ॥**

**तूंची माझे मन तूंची माझें धन । मी तूं येक जाण सोंसू ह्मणे ॥ ४॥** [११]

अशाप्रकारे श्रीकृष्णाच्या सगुण स्वरूपाचे वर्णन आपल्या मधूर आणि चंचल वाणीने सोंसुबाई करताना दिसतात.

**अगा योगेश्वरा नंदाच्या कुमरा । कृष्णा हे सुंदरा गोपवेशा ॥ १॥**

**अती सुकुमारा शाम मनोहरा । राधा प्रियकरा व्रजवासी ॥ २ ॥**

**पांडवांच्या काजा फार श्रमलासी । विश्रांती तूं घेसी ह्मणूनीयां ॥ ३ ॥**

**सोंसुबाई तूझी पाहतसे वाट । येई बारे नीट धांवूनीयां ॥ ४ ॥** [१२]

किंवा

**मस्तकी मुकूट शोभतो सुंदर। भाळीं मनोहर केशर तें ॥ १ ॥**

**शस्त्र चक्रसह चतुर्भुज मूर्ती। ऐसा तूं श्रीपती नारायणा ॥ २ ॥**

**साजीरा सांवळा कासे सोनसळा। कंठीं वनमाळा रुळतसे ॥ ३ ॥**

**गोजीरे गोमटे कांती नीळवर्णी। दावीं ते चरण सोंसूलागी ॥ ४ ॥** [१३]

### ४.३.२ श्रीरामाचे अभंग

अभंग कुसुमावली या ग्रंथामध्ये श्रीरामाचे ३१ अभंग आलेले आहेत. प्राचीन काळापासून संतांनी रामायण या आख्यायिकेवर बरीच ग्रंथरचना केली, आख्यान काव्येही लिहिली. मौखिक परंपरेमध्ये स्त्रीयांनी रामायण लिहिले व ते कथनही केले. सोंसुबाईचे रामाचे अभंग यामध्येसुद्धा तसेच झालेले आहे. सोंसुबाईंच्या अभंग कुसुमावली मा ग्रंथात येणारे श्रीरामाच्या अभंगांमध्ये त्यांचा पहिलाच अभंग हा श्रीराम जेव्हा वनवासात गेले होते त्यावेळची कथा ती भेट रावणावर विजय प्राप्त करून शेवटी अयोध्येला आल्यावरचा सगळा संदर्भ सोंसुबाईंच्या या अभंगामध्ये आलेला आहे. एकूण १८ ओळींचा हा अभंग प्रत्यक्ष रामायणात घडलेल्या प्रसंगांचे चित्रण डोळयासमोर आणतो.

पंचवटी सिताराम पैं असतां । मृग सुवर्णाचा सीता देखे ॥ १ ॥

येरी ह्मणे रामा मृग वधुनीयां । चर्म देई ल्याया कंचुकीतें ॥ २ ॥

बोले रघुनाथ राक्षसी ही माया । नायके तनया जनकाची ॥ ३ ॥

निरुपायें गेला राम मृगापाठीं । रावण कपटी कुटीं आला ॥ ४ ॥

पालटुनी वेष निकट पर्णकूटी । भिक्षामिसें गोरटी नेऊं पाहे ॥५॥

भिक्षा ती घालितां दुष्ट लंकानाथ । धरुनी तिस नेत खांद्यावरी ॥६॥

वधुनीयां मृग राम कुटी आंत । येतां न दिसत सीतादेवी ।‘ ७ ॥

अहा सिते ह्मणुनी रामराय रडे । शोकाग्नित पडे एकाएकीं ॥ ८ ॥

लंकेसी धाडिला अंजनीनंदना । केली विटंबना रावणाची ॥ ९ ॥

शोधितां जानकी अशोकवनांत । पाहिली रडत रामासाठीं ॥ १० ॥

केली सीताशुद्धी जाउनियां तेथे । मुद्रिका स्वहस्ते देत तीसी ॥११॥

पाहतां मुद्रीका सीता शांत झाली । हनुमंता पटली खूण तेव्हां ॥ १२ ॥

उड्डाण करूनी रामापाशीं आला । वृत्तांत तो केला श्रुतरामा ॥ १३ ॥

सेतू बांधुनीयां लंकेसी प्रयाण । माराया रावण राम करी ॥ १४॥

कुळासह केलें राक्षसकंदन । रावणभंजन त्याचवेळे ॥ १५ ॥

भक्त विभीषणा दिलै राज्यदान । चिरंजीव जाण केलें त्यासी ॥ १६॥

सोडविले देव आणिली भूमीजा । अयोध्येत राज्या सनीं बैसे ॥१७॥

सोंसूबाई ह्मणे रामराज्यसूखा । पार नाहीं लेखा वर्णवेना ॥ १८ ॥ [१४]

अशा नाट्यमय पद्धतीने संपूर्ण रामायण सोंसूबाईंनी या अभंगाद्वारे मांडलेले आहे. अत्यंत रसाळ आणि सुबोध अशा रचनेने रामायणातील पात्रे आणि त्यांचे कार्य लघु लेखन अभंगातून ससुबाईंनी इथे मांडलेले आहे.

**सुंदर सद्गुण जानकीजिवन । करीं चापबाण शोभतसे ॥ १ ॥**

**वामांगि ते बैसे दिव्य सिताबाई । तिघे बंधु पाहीं धरिती छत्र ॥ २ ॥**

**वाम सव्य ऊभे मारुती विभीषण । करिती स्मरण राम राम ॥ ३ ॥**

**सौंसू ह्मणे रामा ऐसें तुझे ध्यान । दावी दयाघना डोळेभरी ॥ ४॥** [१५]

किंवा

**त्रैलोक्यपालक कौसल्याबालक । अयोध्यानायक रामराय ॥ १॥**

**रविकुलभूषण रावणमर्दन । केला विभीषण चिरंजीव ॥ २ ॥**

**पतितपावन राम दयाघन । जानकीजीवन रघूनाथ ॥ ३॥**

**सोंसूबाई संतां करी विनवणी । लावा जी चरणीं राघवाचे ॥ ४ ॥** [१६]

अशाप्रकारे रामरायाचा महिमा गाऊन संत सोंसूबाई आपल्या जीवनाची तळमळ श्रीरामपुढे व्यक्त करते. एकूणच सोंसुबाईंनी आपल्या भक्तीच्या माध्यमातून श्रीरामाच्या सौंदर्याचे प्रतिबिंब आणि श्रीरामाच्या पुरूषत्वाचे आदर्श तत्काळ त्यांच्या अभंगातून प्रकट होताना दिसतात.

**अहल्योद्धारणा ताटिकाअंतका। पुतनाशोषका बालकृष्णा ॥ १ ॥**

**मखपाळणा रे जानकीजीवना॥ कालियामर्दना गोपवेषा ॥ २ ॥**

**रामा रघुराया रावणकंदना। कंसविध्वंसना गोपीनाथा ॥ ३ ॥**

**सोंसू ह्मणे ऐसे घेसी तूं अवतार। अनंत सुंदर मत्स्यादीक ॥ ४ ॥** [१७]

या अभंगातून सोंसूबाईंनी श्रीहरीच्या दशम अवतारातील श्रीराम आणि श्रीकृष्ण ह्या दोन्ही अवतारांचे समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच रामाने केलेले असुरसंहार आणि बालपणात श्रीकृष्णांनी केलेले राक्षस वध यांचाही समन्वय साधण्याचा सोंसूबाईंनी आपल्या अभंगातून प्रयत्न केलेला आहे.

### ४.३.३ श्री शंकराचे अभंग

अभंग कुसुमावली या ग्रंथात श्री शंकराचे ८२ अ

भंग आलेले आहेत. संत सोंसूबाईंनी शंकराच्या अलौकिक सौंदर्याचे वर्णन, त्यांच्या सगुण, मनोहारी स्वरूपाचे वर्णन आपल्या अभंगातून केलेले आहे. ते अभंग खालीलप्रमाणे

**हेमशल्यबाळी अर्धांगीं विराजे। अर्धचंद्र साजे कपाळीं तो ॥ १ ॥**

**गौर वर्णकांती शार्दुळवसन। अंकी गजानन खेळतसे ॥ २ ॥**

**निरंतर मूखीं जपे रामनाम। योगियांचे धाम उमारंग ॥ ३ ॥**

**ऐसा कर्पूरगौर दिसे मनोहर। सोंसू मागे थार त्याच्या पायीं ॥४॥** [१८]

किंवा

**दिसे मनोहर माथां जटाभारb। भूषणे सुंदर पन्नगांची ॥ १ ॥**

**झुळ झुळ बाहे माथी गंगालोट। कंठीं काळकूट मिरवीतो ॥ २ ॥**

**हृदयी शोभंती रुद्राक्षांच्या माळा। ध्यातो घननीळा रामराया ॥३॥**

**दीन सोंसू तूज बाहत शंकरा। करी विश्वंभरा कृपादृष्टी ॥ ४ ॥** [१९]

किंवा

**शंभू कर्पुरगौर भवानीचा वर। शुत्र नंदीवर आरूढतो ॥ १॥**

**खापर हस्तकी रामनाम मूखीं। चंद्र तो मस्तकीं शोभतसे ॥ २॥**

**कंठी काळकूट माथां जटाजूट। वाहे गंगालोट झुळझुळ ॥ ३ ॥**

**आपुल्या कल्याणा भजा वेळोवेळां। तया जास्वानीळा सोंसू ह्मणे ॥४॥** [२०]

संत सोंसूबाई श्री शंकराच्या भक्तीत इतक्या रमून जातात की कधी कधी आपल्या अभंगातून त्या आपल्या जीवनाची तळमळ व्यक्त करताना दिसतात. श्री शंकराचे दर्शन कधी मिळणार या स्वरूपाचे त्यांचे अभंग असलेले दिसून येतात. भक्त आणि भगवंतामधला वियोग, आपली तळमळ, आपल्या मनाची आर्तता श्री शंकराच्या चरणाकडे सोंसूबाई आपल्या अभंगातून मांडताना दिसतात.

**येई बा शंकरा पार्वतिच्या वरा। कृपेच्या सागरा दीनबंधू ॥ १ ॥**

**महादेवा आह्मां शिघ्र देई भेटी। बहू झालें कष्टी तुजवीण ॥ २ ॥**

**बा रे त्रिपुरारी श्रमलें संसारी। रंका ह्या उद्धरीं मायबापा ॥ ३ ॥**

**देवांचिया देवा शंभू सदाशीवा। दीन सोंसू भवा करी मुक्त ॥४॥** [२१]

किंवा

**वैकुंठीं श्रीहरी पूजीतो तुजला। धांवूनि मजला भेटी देई॥ १॥**

**कैलासीं निवांत अससी बैसला। धांवूनि मजला भेट देई॥ २॥**

**नंदीवरी जरी असेल बैसला। धांबुनी मजला भेट देई॥ ३॥**

**सोंसु ह्मणे शंभो कोठें तुज पाहूं। कैसे दुःख साहूं वियोगाचें॥४॥** [२२]

**४.३.४ ईशस्तुतीपर संकीर्ण अभंग**

संत सोंसूबाईंचे ईशस्तुतीपर संकीर्ण अभंग २९३ आहेत. संत सोंसूबाईंच्या जीवनात लहानपणीच आलेले वैधव्य आणि त्या वैधव्यातून आलेले कष्टमय जीवन यांचा समन्वय साधून सोंसूबाईंनी आपली अभंग रचना केलेली आहे. ईश्वराची आणि आपली भेट होत नाही याविषयीची तळमळ त्यांच्या मनात आहे. लौकिक जीवनातील अस्वस्थताही त्यांच्या काही अभंगातून आलेली आहे. देव आपल्याला दर्शन देत नाही देव आपल्याला छळत आहे. अशी मानसिकता त्यांच्या अभंगातून दिसून येते त्यांना देव प्राप्तीची इतकी तळमळ लागलेली आहे की त्या स्वतः आपल्याला देवाची दासी म्हणून घेणारे त्यांचे काही अभंग दिसून येतात. उदाहरणार्थ

**कां रे विलंब लावीसी। घाबरली तुझी दासी॥ १॥**

**ब्रीद वाहे अति उदार। भक्त हिंडे दारोदार॥ २॥**

**याच काजा करि अव्हेर। ऐसा कैसा तूं दातार॥ ३॥**

**सोंसू ह्मणे नारायणा। कैसी येईना करूणा॥४॥** [२३]

किंवा

**कोपलासि कां रे प्रभो नारायणा। अंतरींच्या खुणा जाणसी तूं॥१॥**

**स्थिरचरी तूझें स्वरूप व्यापलें । मज वेळीं सरलें ब्रीद वाटे ॥ २ ॥**

**देवा त्रिभुवनीं वससी तूं एक । तुजविण आणिक आहे कोण ॥ ३ ॥**

**टांकुनियां मज कोठें बा गेलासी । बाहत तुजसी सोंसू दीन ॥ ४॥** [२४]

किंवा

**धांव दयाघना धांव कृपाघना । धांव नारायणा विश्वपते ॥ १ ॥**

**नष्ट दुष्ट खल अज्ञ मी पामर । परी करीं उद्धार पतीताचा ॥२॥**

**जाणुनियां माझे दोष रे समर्था । शरण श्रीनाथा आलें तुज ॥३॥**

**सोंसू ह्मणे मज घेई पदरांत । दीन भी अनाथ विश्वोद्धारा ॥ ४॥** [२५]

ईशस्तुतीपर संकीर्ण अभंग या अभंगांमध्ये सोंसूबाईंनी श्रीनारायणाच्या सगुण स्वरूपाचे वर्णन केलेली आहे. जशी वारकरी संप्रदायामध्ये ‘विठ्ठल’ ही देवता केंद्रवर्ती आहे. तसेच सोंसूबाईच्या अभंगांमध्ये क्वचित विठ्ठलाचा उल्लेख येताना दिसतो. त्यांचे अभंग हे नारायण, ईश्वर, विश्वंभर, आदिनाथ अशा शब्दांनी त्यांनी ईश्वराचे गुणगान गायीले केलेले आहे. उदाहरणार्थ

**अगा ये श्रीरंगा असंगा अभंगा । देवा पांडुरंगा नारायणा ॥ १॥**

**सरली अवधी आयुर्गती माझी । कोठें तूं देवाजी आतुडेल ॥ २॥**

**बोलती पुराणें दयाळू ह्मणूनी । होसी चक्रपाणी निष्ठूर कां ॥३॥**

**सोंसू ह्मणे नको करूं परदेशी । मज हृषिकेशी तुजवीण ॥ ४॥** [२६]

किंवा

**झालें कासावीस शोभितां तुजला । दाविना कां मला मुख तुझे ॥ १ ॥**

**लागला रे तूज संतांचा जो छंद । तेथे मतीमंद मशक मी ॥ २ ॥**

**संतांचिया प्रेमें फार तूं मातला । पाहेना विठ्ठला रंकासी या ॥ ३॥**

**सोंसू ह्मणे करी पायाचि वहाण । ठेवीं मज घाण संतां घरीं ॥ ४ ॥** [२७]

**४.३.५ अभंग मानाचे**

या संसारात विविध वृत्ती, प्रवृत्तींशी झगडाळून आपले म्हणून एक भक्तीघर निर्माण करणे हे सोंसूबाईंच्या काळात एक मोठे पराक्रम होते. कारण विधवा झालेल्या स्त्रीला हा समाज हीन अशा दृष्टीने पाहत असे. त्यासाठी सोसूबाईंनी आपल्या लेखनातून एक भक्तिपर ब्रम्हांड निर्माण केलेले दिसून येते. सोंसूबाईंवर रामदास संप्रदायाचा व समर्थ रामदासांचा प्रभाव असलेला जाणवतो. त्यामुळे सोंसूबाईंनी एकूण ११७ मनाचे अभंग लिहिलेले आहे. या संसारात गुरफटून न राहता, लौकिक जीवनाची अस्वस्थता न बाळगता त्यांनी आपल्या अभंगातून देवभक्ती केलेली दिसून येते. सोंसूबाईंचे मनाचे अभंग यांना उपदेशपर अभंग किंवा प्रबोधनपर अभंग असेही म्हणता येईल. उदाहरणार्थ

**त्यजी परीपूर्ण संसाराचे ध्यान । जाई तूं शरण ईश्वरातें ॥ १ ॥**

**भक्तसुखकर संतांचे माहेर । शांतीचे मंदीर रामराय ॥ २ ॥**

**मना तूं सतत हृदयमंदीरी । दृढ धरी हरी नारायण ॥ ३ ॥**

**तोची चुकवील जनन मरण । सोंसू ह्याणे जाण सत्य तुझें ॥ ४ ॥** [२८]

किंवा

**चित्त तें आवरी कुकर्म न करीं । सुखे तूं संसारी ह्मणे राम ॥ १ ॥**

**संकटनाशक बुद्धी प्रकाशक । तो वरदायक विश्वंभर ॥ २ ॥**

**विसंबेना देव आपुल्या भक्तांसी । पाळी त्रिजगासी एकटाची ॥ ३ ॥**

**मायबापाहूनी दयाळू हा राम । योगीयां विश्राम सदानंद ॥ ४ ॥**

**सौसू ह्मणे मना धरी त्याचे पाय । अन्य तरणोपाय नाहीं कांही ॥ ५ ॥** [२९]

संत सोंसूबाईंनी आपल्या अभंगातून संतांचा पुरस्कारही केलेला दिसून येतो. या भवसागरात आपल्याला तारणारे ते हे संत आहे. त्यांच्या शरीरात गेल्याने ते आपल्याला उच्चतम् मार्गदर्शन करून आपल्याला आध्यात्मिक, परमार्थाच्या मार्गावर नेऊन आपल्या जीवनाचे सार्थक करणार अशी मनीषा बाळगून संत सोंसूबाईंनी संतांचे महात्म्या सांगणारे अभंग रचलेले आहेत. ते पुढील प्रमाणे

**सांवळा सुंदर राधिकेचा वर । नाम दामोदर शोभतसे ॥ १ ॥**

**तयालागीं मना त्वरें जा शरण । करी रे भजन शुद्ध चित्तें ॥ २ ॥**

**निर्हेतुक मने स्वधर्माचि सेवा । करितां ती देवा पूजा होय ॥ ३ ॥**

**असे रे हे बरें उत्कृष्ट साधन । बंदीं संतचरण सोंसू ह्मणे ॥ ४ ॥** [३०]

किंवा

**मना तूं ह्मणसी सर्व माझे माझे । अंती होय खाजे यमाजीचे ॥१॥**

**मरुनियां जासी डोळ्यांनी देखतां । करीना कां चिंता स्वहीताची ॥ २ ॥**

**गेले मृत्युपंथें आजा काका मामा । तोची मार्ग आह्मां असे पूढे ॥ ३ ॥**

**सोंसू ह्मणे जा रे संतासी शरण । होसील पावन झडकरी ॥ ४ ॥** [३१]

संत सोंसूबाईंचे ‘अभंग मनाचे’ हे सदैव ईश्वर भक्ती करण्याचे तत्व शिकवतात. मानवी देह हा परोपकारासाठी खर्ची घालावा. हे संपूर्ण जग एक मिथ्या आहे अशाश्वत आहे. केवळ हरिनाम हेच एक

शाश्वत तत्व आहे. हे त्या पटवून देण्याचा प्रयत्न करतात. मनाला समजविण्यासाठी, मनाला सावध करण्यासाठी सोसूबाईंनी मनाचे अभंग या अभंगांची रचना केलेली आहे.

**तनु मनें धनें करीं तूं भजन। गाई रे नंदन देवकीचा ॥ १ ॥**

**करी मना त्वरे राघवाची भक्ती। आळवीं श्रीपती सदोदीत ॥ २ ॥**

**सोयरे धायरे लोक संपत्तीचे। परी स्वहिताचें हरीनाम ॥ ३ ॥**

**सोंसू ह्मणे ऐक संपले आयुष्य। नको करूं नाश अविचारें ॥ ४ ॥** [३२]

किंवा

**स्तुती स्तोत्र गा रे हरी विठ्ठलाचे। गुग मानवांचे वर्णू नये ॥ १ ॥**

**आलिया संसारी आचरीं स्वधर्म। निवेदितें वर्म तुजलागी ॥ २ ॥**

**नको अभिलाषूं मना परधन। करीं नारायण सोयरा तूं ॥ ३॥**

**परोपकारासाठी देह झिजवावा। मत्सर नसावा सोंसू ह्मणे ॥ ४॥** [३३]

### ४.४ समारोप

'गोमंतकीय संत कवयित्री सोंसूबाई सावर्डेकर यांच्या अभंगांचा अभ्यास' या प्रकरणात संत सोंसूबाईंची उपलब्ध झालेली माहिती त्यांच्या परिचयाच्या स्वरूपात देण्यात आलेली आहे. त्यांचा अभंग कुसुमावली या ग्रंथाचाही परिचय या प्रकरणांतर्गत करून देण्यात आलेला आहे. त्याचबरोबर विविध देवी दैवतावर सोंसूबाईंनी रचलेल्या अभंगांचाही यथायोग्य अभ्यास इकडे झालेला आहे. परमार्थाच्या मार्गावर घेऊन जाणारे सोंसूबाईंचे अभंग गोमंतकाच्या संत साहित्यामध्ये महत्त्वाचे ठरतात. सोसूबाईंच्या अभंगातून प्रकट होणारी उत्कट भक्ती आणि परमेश्वर प्राप्तीची त्यांची तळमळ या दोघांचा समन्वय त्यांच्या अभंगांमध्ये

असल्यामुळे त्यांचे अभंग गोमंतकाच्या भूमीत चैतन्य उगवणारे असे आहे. एकूणच गोमंतकीय संत साहित्याच्या पार्श्वभूमीमध्ये सोंसूबाईंच्या अभंगांचा विचार करणे आवश्यक ठरते.

**४.५ निष्कर्ष**

1. भक्त आणि भगवंत हे एकच आहे असा एक अलौकिक संबंध सोंसूबाईंच्या अभंगातून प्रकट होतो.
2. भक्ती हा सोंसूबाईंच्या अभंगांचा केंद्रबिंदू आहे.
3. आयुष्यातील दाहक अनुभवांचे प्रात्यक्षिकरण नसले तरी सुद्धा त्यांच्या वाट्याला आलेल्या दुःखाचे, लहानपणीच आलेले वैधव्य, मनाची झालेली गोची आणि एकूणच लौकिक जीवनातून आलेली विफलता यांचे प्रत्यक्ष दर्शन सोंसूबाईंच्या अभंगातून नक्कीच घडते.
4. ससुबाईंच्या अभंगातून येणारे विविध संदर्भ तत्कालीन जीवनाचे चित्रण करताना दिसतात.
5. सोंसूबाईंच्या अभंगांना खऱ्याखुऱ्या देवप्राप्तीचा वास लाभलेला आहे.
6. अद्वैत्याचा पुरस्कार न करता द्वैत्याचा पुरस्कार करणारे हे सोंसूबाईंच्या अभंगांचे वैशिष्ट्य आहे.
7. अल्पशिक्षित असूनही आपल्या भक्तीपर अभंगातून आणि मराठी भाषेच्या अभिमानाने मराठी भाषेत अभंग रचना करून मराठी भाषेला समृद्ध करण्यात सोंसूबाईंनी एक मौलिक योगदानाची कामगिरी बजावली आहे.
8. सोंसूबाईंच्या अभंगातून येणारे विविध संदर्भ हे त्यांच्या व्यक्तिगत जीवनातून येणारे संदर्भ आहे.
9. लौकिक आणि अलौकिक पार्श्वभूमीवर सोंसुबाईंचे अभंग महत्त्वाचे ठरतात.
10. हानपणीच आलेल्या वैधव्याच्या दुःखाला त्यांनी गळयात बांधून घेतले नाही तर त्या दुःखातून ईश्वराच्या भक्तीचे सुख प्राप्त केले आहे.
11. सोंसूबाईंच्या अभंगांची शब्दरचना ही सुबोध, सरळ, सोप्या शब्दात असलेली दिसून येते.

**४.६ संदर्भ सूची**


1. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१) संपादक डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र. २९० – २९१
2. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१) संपादक डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र.२९१
3. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१) संपादक डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र.२९२
4. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१) संपादक डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र. २९२ - २९३
5. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१) संपादक डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र. २९२
6. केंकरे काशिनाथ वासुदेव, गोमंतकीय लेखकांच्या मराठी ग्रंथांची सूची, मुंबई मराठी साहित्य संघ, १९६९, पृष्ठ क्र. २९
7. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१) संपादक डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र. २९३ - २९४
8. भक्तिसहित्य : स्रोत आणि फलश्रुती, संपादक प्रा. डॉ. मच्छिंद्र मालुंजकर, प्रकाशन, दस्ताने रामचंद्र आणि कं, पृष्ठ क्र. १०१
9. गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला (आरंभ ते १९६१) संपादक डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथामावृत्ती २००३, पृष्ठ क्र. २९२
10. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. ४५
11. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. ४८

12. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र.५१

13. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. ६६

14. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १०६ - १०७

15. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १०७ - १०८

16. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १०८

17. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १११

18. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. ११३

19. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र.११७

20. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १२९

21. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. ११६

22. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. ११६

23. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १३१

24. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १३२

25. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १३२

26. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १३६

27. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १३८

28. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १९३

29. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १९३

30. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. २१०

31. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १९७

32. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. २११

33. रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९, पृष्ठ क्र. १९३

प्रास्ताविक.......................................................................................................... 115

५.१ मंगेशी मंगेशाचा इतिहास .......................................................................................... 115

५.२ संत पूर्णप्रकाशानंदनाथ तथा नायकस्वामी यांचा परिचय .................................................. 117

५.३ नायकस्वामींची ग्रंथ रचना............................................................................................ 119

५.४ मंगेशीचा सोमवार....................................................................................................... 120

५.५ झुला / झुलवे............................................................................................................. 120

५.६ नायकस्वामी तथा कवी मंगेश विरचित झुलवे काव्य स्वरूप व विश्लेषण ................................ 121

५.७ समारोप..................................................................................................................... 127

५.८ निष्कर्ष...................................................................................................................... 128

५.९ संदर्भ सूची.................................................................................................................. 128

# प्रकरण पाचवे

## गोमंतकीय संत कवी पूर्णप्रकशानंदनाथ तथा नायकस्वामी यांच्या झुलवे या काव्याचा अभ्यास

### प्रास्ताविक

गोमंतक ही पुण्यभूमी आहे. प्राचीन काळापासून विविध वीर, पुण्यवान पुरुषांनी तथा स्त्रियांनी आपल्या कारकीर्दीने व लेखनाने या गोमंतमातीतून साहित्यनिर्मिती करून या गोमंतभूमीला पुण्यवान केले आहे. म्हणून ती पुण्यभूमी म्हणून गाजली. त्यातल्यात्यात गोमंतकामध्ये जन्माला आलेले साक्षात्कारी, सिद्धपुरुषांनी याच गोमंतभूमीत राहून जनताजनार्दनांना देवभक्तीचे वर्म सांगितले, जनउदबोधन, प्रबोधन, मार्गदर्शन करून या पुण्यभूमीला देवभूमी बनवली. गोमंतकामध्ये प्राचीन काळापासून देवी दैवतांच्या देवळा - राउळांच्या कथा, अख्यायिका सांगणारे जाणते त्यांच्या या संघर्षाने व मौखिक पद्धतीने कथन करणाऱ्या या कथामधून गोमंतभूमी ही देवभूमी झालेली आहे.

गोमंतक लहान असला तरी त्याची यशकीर्ती मोठी आहे. संतांनी, साक्षात्कारी, सिद्धपुरुषांनी जी भक्तीची ज्योत तेवत ठेवकेली आहे ती ज्योत आजही अखंडितपणे तेवत आहे. याची साक्ष देणारे म्हणजे गोमंतकात चालणारे सण, उत्सव इत्यादींच्या माध्यमातून ती प्रतिबिंबित होत आहे.

### ५.१ मंगेशी मंगेशाचा इतिहास

'श्री मंगेश' हा आजतागायत संपूर्ण गोमंतकामध्ये प्रसिद्ध असलेला शिव शंकराचा दुसरा रूप म्हणजे श्री मंगेश होय. ज्या तेजाने तो गोमंतकात प्रसिद्ध आहे. त्यावरून तो संपूर्ण गोमंतकाचा कुलदैवतही आहे. श्री मंगेशाचे मूळ स्थान हे 'कुट्ठाळ' एकेकाळी 'कुशस्थळी' या नावानेही ते क्षेत्र प्रसिद्ध होते. सोळाव्या शतकात जेव्हा गोमंतकावर पोर्तुगीजांनी आक्रमण केले व बार्देश, साष्टी व तीसवाडी या तालुक्यातील प्रसिद्ध देवी दैवतांच्या मंदिरांचा विध्वंस करण्यास सुरुवात केली. बाटाबाटीच्या या काळात कुट्ठाळवासीयांनी श्री

मंगेशाचे लिंग घेऊन रातोरात फिरंगी हद्द पार केली. त्यानंतर भाविकांनी शके १४८२ म्हणजे इस १५६० मध्ये फोंडा या तालुक्यातील ‘प्रयोळ’ या गावात आणले व शके १४८२ म्हणजे इ.स. १५६१ मध्ये कुळावी भाविकांनी मंगेश देवाची सूप्रतिष्ठापना केली. फोंडा हा तालुका गोमंतकातकाच्या मधोमध असल्यामुळे तिथे पोर्तुगीज पोहोचले नाही.

श्री नागेश या एका देवाला न धरता बाकीची इतर देवी दैवत म्हणजे श्री रामनाथ, श्री महालसा, श्री शांतादुर्गा या देवतांना त्यांच्या मूळ जाग्यावरून स्थलांतर होऊन फोंड्यात स्थायिक होऊ लागले. फोंड्याच्या प्रियोळ गावात श्री मंगेशाची स्थापना करण्यात आली म्हणून त्या गावाला मंगेशी असे नाव पडले. म्हणजे जिथे श्री नागेश राहतो तिथे नागेशी, श्री रामनाथ राहतो तिथे रामनाथी, तसेच जिथे मंगेश राहतो तिथे मंगेशी असे मानले जाते. मंगेशाचे मूळ नाव हे ‘मांगिरीश’ होय मग मांगिरीश शब्दाचा अपभ्रंश होऊन ते मंगेश असे झालेले आहे.

मंगेशाचे मंदिर हे फोंड्यावरून पणजीला जाणाऱ्या मुख्य रस्त्यापासून थोडे आत आहे. बांधकाम करून पांदी स्वरूपाचा मोठा रस्ता थेट देवालयाकडे जातो. वाटेत बाजूला शेती, झाडे, केळी, माडा - पोफळयांचे निसर्ग सौंदर्य मनाला भावते. चालत देवळाकडे जाताना डाव्या बाजूला मोठी इमारत आहे. त्यावर ‘श्री मंगेश मठ’ असे लिहिलेले असून इमारतीवर श्री मंगेशाचे मोठे छायाचित्र आहे. इमारतीच्या बाजूलाच साक्षात्कारी संत ‘नायकस्वामी’ यांची समाधी आहे. मंदिराच्या बाजूला चौकोनी आकाराच्या तळीचे बांधकाम करून त्यातले हिरवेगार पाणी चैतन्यानुभूती आणते. देवळासमोर श्री काळभैरव देवाचे छोटेसे मंदिर आहे. समोर मोठा दीपस्तंभ मंदिराची शोभा वाढवतो. समोर श्री मंगेशाच्या देवळाचे विहंगम दर्शन घडते. दर सोमवारी मंगेशाची पालखी होते. त्यावेळी पूर्वी नायकस्वामी या सत्पुरुषाने रचलेले ‘झुलवे’ हे काव्य पालखी पुढे काही कलावंत नृत्य करून ते काव्य सादर करीत असे. परंतु ती प्रथा आज मंगेशीत बंद पडली आहे.

### ५.२ संत पूर्णप्रकाशानंदनाथ तथा नायकस्वामी यांचा परिचय

गोमंतकीय मराठी संत साहित्यामध्ये जी ठळकपणे संतांची नावे घेतली जातात त्यामध्ये साक्षात्कारी संत म्हणून सद्गुरु ‘पूर्णप्रकाशानंदनाथ’ / ‘नायकस्वामी’ तथा ‘कवी मंगेश’ यांचेही नाव आवर्जून घेतले जाते. आपल्या साहित्याने संपूर्ण गोमंतकाला एक नवा उष:काळ प्राप्त करून दिलेले नायक स्वामी या नावाने ते आजही गोमंतकात एक प्रसिद्ध संत म्हणून ओळखले जातात. नायकस्वामींच्या चरित्राविषयी आजवर कुठेच माहिती सापडत नाही. त्यांच्या ग्रंथरचनेमध्येही त्यांनी आपल्या विषयी काही माहिती नमूद केलेली नाही. जे मौखिक पद्धतीने वा वंशजाकडून जी  माहिती उपलब्ध होते तेच पुरावे म्हणून मानून त्यांच्यावरूनच संतुष्टी मानावी लागते.

‘नायकस्वामी’ हे सोळाव्या सतराव्या शतकातील गोमंतकीय थोर संत कवी होते. नायकस्वामी यांच्या विषयी जी माहिती सांगितली जाते ती अशी की पूर्णप्रकाशानंदनाथ तथा नायकस्वामी हे साक्षात्कारी पुरुष मूळचे कारवार जिल्ह्यातील, कुमठा तालुका व अंत्रवल्ली या गावचे एक गौड सारस्वत ब्राह्मण होते. त्यांचे गोत्र वत्स व कुळदेव श्री मंगेश होता. त्यांचे मूळ नाव हे ‘शंकर मंगेश नायक करंडे देसाई’ असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव ‘मंगाजी’ व आईचे नाव ‘काशीबाई’ असावे अशी माहिती ‘प्रमोद करंडे देसाई’ या नायकस्वामींच्या वंशजाकडून प्राप्त झाली. नायकस्वामींची एक बहिणही होती. तिचा विवाह बेटकुळी या गावात करून दिला होता.[१] अशी त्यांच्या कुटुंबाविषयी माहिती सांगण्यात येते.

नायकस्वामींच्या विषयी जी माहिती उपलब्ध आहे. ती अशी की एक दिवस ते सहकुटुंब आपल्या कुलदैवत श्री मंगेशाच्या दर्शनास येत असताना काणकोणच्या जंगलात देववशात त्यांची व त्यांच्या कुटुंबाची ताटातूट झाली. त्या भयाण अरण्यात शोधता कुटुंबाची गाठ पडेना. शोधून दमल्यावर निराश, हताश अवस्थेत त्यांनी श्री मंगेशाचा धावा केला. ‘श्री मंगेश आता तूच त्राता आहेस’ अशी देवाची प्रार्थना करून ते पूर्ण भक्ती भावाने श्री मंगेशला शरण गेले असताना त्या अरण्यात एका अवधूतवेषधारी विभूतींचे दर्शन झाले. दुःखाचे कारण विचारल्यावर नायकस्वामींनी आपल्याबरोबर घडलेले सगळे वृत्त त्या विभूती पुढे निवेदन केले. ते ऐकून ती विभूती म्हणाली “बाबा रे या एवढ्याशा अरण्यात वाट चुकलास, मंडळीच मुकलाच याबद्दल तू इतका दुःखी कष्टी होतोस तर भयंकर भवारण्यात तू वाट चुकून आज कैक जन्माचे जन्म भटकत

फिरतो आहेस, आपण कोण, कोठून आलो व कोठे चाललो याची शुद्धी देखील नाही तर याबद्दल तू किती दुःख केले पाहिजेत याचा आपल्याशी विचार करतोस का?" असे हे चमत्कारी प्रबोधन शब्द ऐकताच त्यांना तात्काळ उपरति होऊन नायकांनी लगेच त्या अवधूतीचे पाय धरले. इतके बोलून तो अवधूत उत्तरार्ध झाला. नंतर लवकरच रानात दुरावलेल्या मंडळींची नायकांना गाठ पडली.

पुढे ते श्री मंगेशाच्या दर्शनास येऊन पोहोचले त्या विभूतीच्या भाषणाचा नायकस्वामींच्या जीवनावर इतका प्रभाव पडला की त्यानंतर त्यांनी संसाराचा त्याग करून विरागीवृती आत्मसात करून ते सदैव परमेश्वरभजनात, नामस्मरण करून पूजा, अर्चेत काळ घालवू लागले.[२] अशा या अध्यात्मिक आणि भक्तीमय अवस्थेत त्यांच्याकडून सुप्रसिद्ध अशा 'झुलवे' काव्याची निर्मिती झाली. या व्यतिरिक्त त्यांचे 'श्रीपूर्णप्रबोधचंद्रोदय', 'शिवदर्पण, व 'राधा विलास' अशा तीन ग्रंथांची रचना नायकस्वामींनी केली.

'नायकस्वामी हे नाथपंथी संत कवी होते. नाथपंथातील 'ब्रह्मानंदनाथ' हे त्यांचे गुरु होते'.[३] त्यांच्याकडून दीक्षा घेऊन त्यांनी पुढे नाथ संप्रदायाचा विस्तार केला. नायकस्वामी हे नाथपंथी कवी असल्याने त्यांचे नाव 'पूर्णप्रकाशानंदनाथ' असे होते. त्याचबरोबर त्यांना 'नायकस्वामी' ही म्हणण्यात येत असत कारण त्यांचे पूर्ण नाव 'शंकर मंगेश नायक करंडे' नायक यावरून त्यांना नायकस्वामी हेही नाव प्राप्त झाले होते. तथा त्यांना 'कवी मंगेश'ही म्हणण्यात येत असत. कारण त्यांच्या अप्रतिम 'झुलवे' या काव्यरचनेत त्यांनी शेवटी 'पूर्ण झाला श्रीमंगेशी मंगेश ||' या त्यांच्या झुलवे काव्याच्या ओळीवरून त्यांचे नाव मंगेश असल्याचे समजते. मंगेशी येथे श्री मंगेशाची मनोभावे, पूर्ण श्रध्देने ते सेवा करीत होते. आपल्या आयुष्याचा उर्वरित काल मंगेशी येते घालवून वैशाख वद्दे द्वादशी १६५० मध्ये नायकस्वामींनी समाधी घेतली.

नायकस्वामींच्या चरणपादुका आजही मंगेशी येथील त्यांच्या वंशज्याकडे आहे आणि ते त्यांची नित्य पूजाही करता. कवी व्यंकट हे गोमंतकीय कवी असून ते नायकस्वामींचे शिष्यही होते.

### ५.३ नायकस्वामींची ग्रंथ रचना

साक्षात्कारी संत नायकस्वामी यांच्या नावावर 'पूर्णप्रबोधचंद्रोदय', 'शिवदर्पण' व 'राधाविलास' असे तीन प्रसिद्ध ग्रंथांची रचना नायक स्वामींनी गोमांतकातील मंगेशी इथे केली. नायकस्वामींचा पहिला व महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'पूर्णप्रबोधचंद्रोदय' हा ९ अध्यायांचा व १८४७ ओवी संख्या असलेला ग्रंथ आहे. या ग्रंथाची शब्दरचना रसाळ, साधी, सोपी, सरळ आहे. नायकस्वामींनी या ग्रंथात आपल्या गुरुविषयी उल्लेख केलेला आढळतो. उदाहरणार्थ

**"तारकब्रह्म मूर्तिमंत । सस्वरूप सदोदित ।**

**ब्रह्मानंद सद्गुरूनाथ । बंदोनि आदी ॥१॥**

**पूर्णप्रबोध चंद्रोदय । ग्रंथ तत्त्वार्थनिर्णय ।**

**करिजेल दावोनि प्रमेय । निगमागमींचे ॥२॥"** [४]

अशा ओवीतून नायकस्वामींनी आपल्या सद्गुरुला सर्वात मोठा मान दिलेला आहे. सद्गुरुविषयीचा आदर आणि सन्मान त्यांनी या ओवीतून व्यक्त केलेला आहे. या ग्रंथाच्या ओवीच्या शेवटी नायकस्वामी आपले नाव गुंफतात ते असे.

**"इति श्री पूर्णप्रबोध । चंद्रोदय ग्रंथपूर्वार्धी।**

**श्री मंगेशें निरुपिलें तत्पद । प्रथमोपदेशी ॥"** [५]

श्री मंगेशाच्या दर्शनास येत असताना वाटेत त्यांना जो अवधूतवेषधारी माणसापासून जो उपदेश झाला तो ते या ओवीतून व्यक्त करतात. त्याचबरोबर तो अवधूत श्री मंगेशच असावा असे गृहीत धरून श्री मंगेशानेच आपल्याला प्रथम उपदेश केला; अशी श्री मंगेशाविषयीची अनन्य भक्ती ते व्यक्त करताना दिसतात.

नायकस्वामींचा दुसरा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'शिवदर्पण' हा ग्रंथ आहे. शिवदर्पण हा ग्रंथ संस्कृत भाषेतील १८ पुराणापैकी पद्मपुराणातील शिवगीतेवर आधारित शिवदर्पण या ग्रंथाची रचना नायकस्वामी यांनी केली आहे. या ग्रंथाची श्लोक रचना अनुष्टुभ छंदात आहे.[६] या ग्रंथाचे काही श्लोक श्री मंगेशी देवस्थानात गर्भगृहात एका शिळेवर कोरलेले आहेत.

नायकस्वामींचा तिसरा ग्रंथ म्हणजे ग्रंथ म्हणण्यापेक्षा ते एक आख्यान काव्य स्वरूपाचे असून त्याचे नाव 'राधाविलास' असे आहे १७० श्लोकांचा लघु असा हा ग्रंथ राधा - कृष्णाच्या प्रेमाचे वर्णन करणारा शांत व शृंगारिक रसात आढळतो.[७] राधा कृष्णाच्या प्रेमाचा संदर्भ आल्यामुळे या ग्रंथाची भाषा रसाळ, मधुर व सुबोध ठरली आहे

## ५.४ मंगेशीचा सोमवार

प्रियोळ, मंगेशी येथील मंगेश देवस्थानात दर सोमवारी किंवा एखाद्या महापर्वणीच्या दिवशी मंगेश देवाची पालखीतून मिरवणूक काढली जाते. तिला 'शिबिकोत्सव' असे . त्या शिविकोत्सवात पालखी प्रदक्षिणा चालू असताना निरनिराळ्या ठिकाणी वा ठरलेल्या विशिष्ट जागी ही पालखी काही क्षण थांबवली जाते. त्या जागेला 'पेणे' असे म्हणतात. अशी प्रत्येकी १६ जागेवर पालखी थांबते दोन दंडाच्या सहाय्यावर पालखी ठेवली जाते तेव्हा ती झुलते त्यावेळी तिथे असलेले काही कलावंत (देवळी) पालखी समोर नृत्य सादर करून संत नायकस्वामी यांनी रचलेले झुलवे काव्य सादर करून श्री मंगेशाची स्तुती करतात. पण आता ही प्रथा बंद पडून ४० - ४५ वर्षे झाल्याचे 'श्री. प्रमोद करंडे देसाई' यांच्या मुलाखती दरम्यान समजले.

## ५.५ झुला / झुलवे

प्राचीन काळापासून गोमंतकात प्रचलित असलेली महत्त्वाची साधने त्यात 'शिलालेख, ताम्रपट, शमीपत्र व झुला किंवा झुलवे' ही महत्त्वाची साधने आजही गोमंतकात आढळतात. झुलवे हे मराठीतील

महत्त्वाचा भक्ती गीत प्रकार, ईशस्तुतीनपर गीत म्हणून झुलवे या गीताचा विशेष उल्लेख करावा लागतो. विशिष्ट एका दैवताला अनुसरून वा स्तुती करून म्हणणारे हे काव्य गोमंतकातील श्री मंगेश येथील साक्षात्कारी संत नायकस्वामी यांनी श्री मंगेशाची स्तुती करताना रचलेले भक्तीपर काव्य गीत म्हणून झुलवे प्रसिद्ध आहे. ‘महाराष्ट्र शब्दकोशात झुला या शब्दाचे ‘पाळणा, हिंदोळा, झोपाळा, झुलता बीछान असे विविध शब्दार्थ दिलेले आहे.’ [८]

डॉ. वि. बा. प्रभुदेसाई लिहितात “ एक प्राचीन मराठी गीत प्रकार म्हणून तर हे झुले अभ्यासणे आहेतच पण त्यातील पौराणिक व ऐतिहासिक स्थल काल व्यक्ती घटना इत्यादींच्या अनेक कुतूहल जनक निर्देशामुळे ही गोमंतकाच्या प्राचीन मराठीपरंपरेवर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने ते लक्षणीय वाटतात.” [९]

### ५.६ नायकस्वामी तथा कवी मंगेश विरचित झुलवे काव्य स्वरूप व विश्लेषण

**(१)**

**हरहर मंगेश्वर तनुकुशपुरनाथा।**

**हर विश्वंभर सुखदाता ||**

**हरहर तापत्रय भवछेत्ता।**

**हरहर गाइन शिबिकोत्सव गुणनाथा ॥**

**(२)**

**प्रथम पदांगुष्टाधर अग्नी।**

**ध्याता तेजोमय स्वप्रभाव नेत्री ||**

दृश्य-द्रष्टा- दर्शन त्रिपुटी सूत्री।

दृष्टी स्थिरता पावे चित्रविचित्री ॥

(३)

तृतीय साधन मूलाधार सूत्र।

विमर्श पृष्टी नाडीं पीडन तंत्र ||

करितां स्वच्छासन होउनियां तंत्र।

काळ अग्नि संदीपन वोप विचित्र ||

(४)

चतुर्थ मेढ्राधारी लिंगस्थान।

संकोचनविद ग्रंथीत्रय भेदोन ॥

रुद्रमुखीं बिंदूचें स्थान।

होतां भ्रमरित गुंफे समाधान ॥

(५)

पंचम वोढाने, वृत्तिनिरोध।

अपमान वुछ रंगी होउनि निजशब्द ॥

समान योगी प्राण्यासी समाधान।

होतां संजीवन लाभे योग्य बोध ॥

(६)

षष्ठम नाभ्याधारी एक चित्र।

प्रणवोच्चारण करितां सद्गुरु उक्त ||

नाद निनादी होउनि अत्यद्भुत।

सहजी समाधी लाभे अनाहत ||

(७)

सप्तम हृदयाधारी मुख्य प्राण।

निरोध करितां लाभे सुख संपूर्ण ॥

हृदयपंकज होउनि विकाशमान।

सहजर्जी सहज पूर्ण समाधान ||

(८)

अष्टमधारी चिबुकनिरोध।

करितां रविशशि नाडी होउनि स्तब्ध ||

चंद्रामृतद्रव सवे परमानंद |

होतां सहजी लाभे योग बोध ||

(९)

नवम स्थानातें घटिकाधार।

तेथे गुरुक्त कम अत्यंत सार ||

विपरित जीवा परोक्षी एकाग्र।

अमृत करितां प्रीत होते शरीर।

(१०)

दशम तत्व नत रत्नंबिका स्थान।

तेथे दीर्घकृत दोहन चालेन ||

विपरित युक्ती रंधी प्रवेशून।

करितां निर्विकल्प समाधान ||

(११)

आतां एकादशि-तो जीवाधार।

गुरुक्त तंत्र घरि जेथें तदाग्र ॥

सर्वही रोगांचा होउनि संहार।

शीतल चंद्र मग होतें शरीर ||

(१२)

द्वादश आधारता भूवोमध्यें।

तेथें ध्याता चंद्रमंडळ शुभ ॥

नयनीं विकासे तुष्टय होउनि शब्द।

शांतशीतल लाभे स्वरूपबोध ॥

(१३)

आतां त्रयोदशर्शी तो नाशाधार।

रंधराक्षी मानस वृत्तीसार ||

होउनि लाभे रूप साक्षात्कार।

जैसा लोपे प्रकाश अंधःकार॥

(१४)

आतां चतुर्दर्शी तो नाशामुलक वाटे।

तेथे लक्षीं धरितां निजात्म भेटे ||

जलमासादि तेजोमय दृष्टी।

होतां संजिवन लाभे निजात्म भेटे ॥

(१५)

आतां पंचदर्शी तो ललाटाधार।

तेथें सलाभजोति पुज्याकार ||

लक्षीं धरितां स्वरूपसाक्षात्कार |

जैसा लोपे प्रकाश अंधःकार॥

(१६)

अवस्रष्टाते ब्रह्मारंधशेष।

करुणा, चकृभ, गुरुपाद रक्ष॥

धरितां परशिव तत्वय शेषारक्ष।

पूर्ण झाला श्रीमंगेशीं मंगेश॥

नायकस्वामींनी झुलवे हे काव्य श्री मंगेशाची स्तुती करताना लिहिलेले काव्य होय. श्री शंकराचे स्वरूप असलेला श्री मंगेशाचा शिबिकोत्साव (पालखी) दर सोमवारी होते. त्यावेळी पालखीसमोर म्हणावयाचे झुलवे हे ईशस्तुतीपर काव्यगीत साक्षात्कारी संत कवी नायकस्वामी यांनी श्री मंगेशाची स्तुती करत असताना रचलेले हे ‘झुलवे’ काव्य आजही गोमंतकात प्रसिद्ध आहे. फक्त त्यात फरक इतका की आज हे झुलवे काव्य मंगेशी येथे शिबिकोत्सावा दरम्यान सादर होत नाही. झुलवे हे काव्य शिव स्तुतीचे गीत आहे तरीसुद्धा झुलवे या काव्यातून आध्यात्मिक उपदेश करणारी शिकवण नक्कीच सापडते. मानवी देहाला आकारास आणणारी, योगसाधनेने प्राप्त होणारी व आध्यात्मिक स्वरूपाची जाणीव माणसाला करून देणारी जी सात विविध चक्रे आहेत त्यावरून झुलवे हे काव्य आधारित आहे. कवी मंगेश यांनी या काव्याची सुरुवात श्री मंगेशाची स्तुती करून केलेली आहे. उदाहरणार्थ :

**हरहर मंगेश्वर तनुकुशपुरनाथा ।**

**हर विश्वंभर सुखदाता ॥**

**हरहर तापत्रय भवछेत्ता ।**

**हरहर गाइन शिबिकोत्सव गुणनाथा ॥**

नायकस्वामी यांनी झुलवे काव्याची सुरुवात ही श्री मंगेशाच्या शिबिकोत्सव अर्थातच पालखी परिक्रमा होत असताना म्हणणारी शिवस्तुतीने केलेली आहे. त्यानंतरचे येणारे काव्य कडवे हे योगसाधनेच्या बळावर एका तपस्वीला प्राप्त होणारी जी सप्तचक्रे आहेत. त्यावर हे झुलवे काव्य भाष्य करताना दिसते. कैलाशपती शिवशंकर जसा सदैव योगसाधनेत लीन असतो तसाच श्री मंगेश हा ही शिवशंकराचाच रूप असल्याने आणि नायक स्वामींनी मंगेशी येथे देवस्थानात राहून मंगेशाची पूर्ण श्रद्धेने सेवा केल्यामुळे नायकस्वामींना आध्यात्मिक शक्तीची अनुभूती आलेली होती . त्या अनुभूतीतून नायकस्वामींनी या झुलवे

काव्याची रचना केलेली दिसून येते.  एक साधक वा तपस्वी जेव्हा पूर्ण श्रद्धेने, साधनेने एकाग्र चित्ताने भगवंताच्या साधनेत लीन होऊन ‘ॐ’ या एका चीन्हाकडे लक्ष केंद्रित करतो. त्यावेळेला त्या साधकाला, तपस्विला ह्या आत्म्याच्या पलीकडे जाऊन त्या परमात्म्याचे स्वरूप जाणवते. नायकस्वामींनी अशा योगसाधनेने परमात्याचे, परब्रह्माचे स्वरूप आत्मसात केले होते. म्हणून त्यांनी अध्यात्मिक स्वरूपात असलेले झुलवे हे काव्य रचले.

**पूर्ण झाला श्रीमंगेशीं मंगेश ॥**

झुलवे काव्याच्या शेवटच्या कडव्यात नायकस्वामींनी स्वतःला ‘मंगेश’ असे म्हणून घेतलेले आहे. मंगेशी येथे विराजमान असलेल्या श्री मंगेशाची नायकस्वामींनी मनोभावे, पूर्ण श्रद्धेने पूजा, अर्चा केली व श्री मंगेशाची स्तुती करणारे झुलवे काव्यरचून त्यांनी शेवटी श्री मंगेशाचे आणि स्वतःचे नाते भक्त आणि भगवंत यांचे अतूट नाते म्हणून शेवटच्या कडव्यात नायक स्वामींनी ‘पूर्ण झाला श्रीमंगेशीं मंगेश’ असे म्हणून आपली भक्ती झुलवे काव्यातून व्यक्त केलेली दिसून येते.

**५.७ समारोप**

प्रस्तुत प्रकरणात गोमंतकीय संत ‘पूर्णप्रकाशानंदनाथ’ म्हणजेच ‘नायकस्वामी’ तथा ‘कवी मंगेश’ यांच्या जीवनाची प्राप्त झालेल्या माहितीवरून त्यांचा परिचय करून देण्यात आलेला आहे. नायकस्वामी यांचे कुलदैवत श्री मंगेश असल्याने मंगेशीचा इतिहास प्रस्तुत प्रकरणात सांगण्यात आलेला असून मंगेशी देवस्थानात होणारा विशेष सोमवार आणि त्या सोमवारा निमित्त होणारा  शिबिकोत्सव (पालखी) याचीही अल्प माहिती देण्यात आलेली आहे. त्याचबरोबर नाईकस्वामींनी ‘पूर्णप्रबोधचंद्रोदय’ ‘शिवदर्पण’ व ‘राधाविलास’ अशा त्यांच्या तीन ग्रंथरचनाचा अभ्यास इकडे झालेला आहे. नायकस्वामींनी रचलेले प्रसिद्ध काव्य म्हणजे ‘झुलवे’ यांचाही यथायोग्य अभ्यास प्रस्तुत प्रकरणात झालेला आहे.

गोमंतकामध्ये प्राचीन काळापासून प्रचलित असलेले महत्त्वाचे साधन, ऐतिहासिक पुरावा म्हणून झुलवे या गीत काव्याकडे बघता येते. श्री नायकस्वामी या साक्षात्कारी पुरुषाने श्री मंगेश देवाची स्तुती

करताना आपल्या आराध्य दैवताला अनुसरून लिहिलेले भक्ती काव्य म्हणजे झुलवे हे काव्यगीत. गोमंतकाचे वैशिष्ट्य आणि महत्त्व सांगणारे हे काव्य आजही गोमंतकात प्रसिद्ध आहे.

## ५.८ निष्कर्ष

१.) संत नायकस्वामी यांना काणकोणच्या जंगलात साक्षात्कारी प्रबोधन झाल्यामुळे त्यांनी विरागीवृतीचा स्वीकार केलेला दिसून येतो.

२.) संत नायकस्वामी यांचे झुलवे हे काव्य मंगेशी येथील श्री मंगेशाच्या पालखी समोर म्हणावयाचे भक्तिगीत, ईशस्तुतीपरगीत आहे.

३.) नायकस्वामी विरचित झुलवे काव्य हे भक्तिगीत असले तरीसुद्धा त्यामधून जो आध्यात्मिक उपदेशमार्ग दिसून येतो.

४.) अध्यात्मिक अनुभूती प्राप्त करून देणारे योग साधनेचा अवलंब करून आध्यात्मिक स्वरूपाची जाणीव माणसाला करून देणारे हे झुलवे काव्य आहे.

५.) संत नायकस्वामी यांनी झुलवे हे काव्यरचले आहे हे त्यांच्या पूर्ण झाला श्रीमंगेशीं मंगेश ह्या झुलवे काव्याच्या शेवटच्या कडव्यावरून समजते.

६.) झुलवे हे भक्तीगीतपर काव्य असले तरीसुद्धा त्याचा समावेश शिलालेख, ताम्रपट ,शमीपत्र, टाका या साधनांच्या बरोबरही एक ऐतिहासिक साधन म्हणून करता येतो.

७.) पूर्वी झुलवे हे काव्य कलावंत नृत्य करून संगीतमय पद्धतीने पालखी समोर सादर करीत असे हे झुलवे या काव्याचे एक आगळे वेगळे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते.

८.) संत नायकस्वामी यांची ग्रंथ रचना सुबोध, सरळ अशी आहे.

## ५.९ संदर्भ सूची

१.) मुलाखत, प्रमोद करंडे देसाई, फोंडा, प्रियोळ, मंगेशी देवस्थान.

२.) सातोस्कर, बा. द, गोमंतकीय मराठी साहित्याचे शिल्पकार भाग १, सागर साहित्य प्रकाशन, प्रथमावृत्ती १९७५, पृष्ठ क्र. ५६ - ५७

३.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पृष्ठ क्र. २६५

४.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पृष्ठ क्र. २६५

५.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पृष्ठ क्र. २६५

६.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पृष्ठ क्र.२६५

७.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पृष्ठ क्र. २६५

८.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पृष्ठ क्र. ७९

९.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला (आरंभ ते १९६१), संपादक, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, पृष्ठ क्र. ७९

प्रास्ताविक ........................................................................................................ 131

६.१ सद्गुरु जीवनमुक्त महाराज यांचा जीवन परिचय.............................................................. 131

६.२ सद्गुरु जीवनमुक्त महाराज यांची अभंग रचना................................................................ 134

६.३ समारोप........................................................................................................ 137

६.४ निष्कर्श........................................................................................................ 138

६.५ संदर्भ सूची..................................................................................................... 138

# प्रकरण सहावे

# सद्गुरु जीवनमुक्त महाराज यांच्या अभंगांचा परामर्श

## प्रास्ताविक

संत हे निष्पाप, निखळ, सदाचारी, परोपकारी इत्यादी असे विविध गुण संतांच्या चरित्रातून प्रकट होतात. गोमंतकातील इतर संत, सद्गुरु मंडळीत अजवार सगळ्यांना परिचयात असलेले आणि आपले सामाजिक कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत जन उद्बोधन करणारे व गोमंतकाचे अंत: स्वर मांडणारे जीवनमुक्त महाराज यांचा उल्लेख खास करून करावा लागतो. शब्द शस्त्राने क्रांती करणारे, जाती निर्मूलन, व्यसनमुक्तीचा झेंडा फडकविणारे, अंधश्रद्धा निर्मूलन इत्यादी विविध सामाजिक विषयांना प्राधान्य देऊन समाजातल्या लोकांना सुधारणीच्या मार्गावर घेऊन जाणारे असे हे सद्गुरु जीवन मुक्त महाराज.

संत हे समाजातल्या लोकांना देवभक्तीचे वर्म सांगणारे कार्य करत असतात. तेच गोमंतकीय सद्गुरु जीवनमुक्त महाराज यांनी देवभक्तीतून लोकांमध्ये देशभक्तीची स्थापना केली. अशा नीतीमूल्यातून गोमंतकाचे भविष्य उज्वल करणारे जीवनमुक्त महाराजांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केलेला आहे.

## ६.१ सद्गुरु जीवनमुक्त महाराज यांचा जीवन परिचय

परम पूज्य सद्गुरु श्री जीवनमुक्त महाराज यांचा जन्म भाद्रपद वद्य पंचमी शके १८३८ म्हणजे १९१६ साली गुडे शिवोली येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव ‘चंद्रकांत’ व आईचे नाव ‘पार्वती’ असे होते. जीवनमुक्त महाराजांचे पाळण्याचे नाव ‘रावजी’ असे असून त्यांना ‘बयाबाई’ व ‘साळूबाई’ अशा दोन बहिणी व ‘बाबनी’ या नावाचा एक मोठा भाऊ होता. अशी ही चंद्रकांत व पार्वती यांची चार अपत्ये

कालांतराने मोठी होऊ लागली. त्या चौघांचे ही प्राथमिक शिक्षण सुरू झाले पण दुर्दैवाने चंद्रकांत यांचे निधन झाले व पर्वतीबाईवर दुःखाचे डोंगर कोसळले.

‘घरामध्ये करता सवरता दुसरा  कोणी पुरुष नसल्यामुळे पार्वतीबाई मोलमजुरी करून आपले व आपल्या मुलांचे चरितार्थ चालवित असे. घरात एकच कष्ट करणारी बाईमाणूस आणि खाणारी पाच माणसे अशा दारिद्र्यामुळे पार्वतीबाईंनी रावजीला आपल्या भाऊच्या घरी पाठवण्याचा निर्णय घेतला रावजींच्या मामाचे घर हे दांडा शिवोली येथे होते. लहानपणीच शिक्षण सोडून रावजी आपल्या मामाच्या घरी मोलमजुरीची कामे गुरे राखणे, शेता भाटात मामांची मदत करणे. अशी कामे तो करू लागला’. [१]

कालांतराने पुढे रावजीचे लग्न शिवोली येथील नागवेकर कुटुंबातील कन्या नाव ‘मोगा’ सासरचे नाव ‘द्वारकाबाई’ हिच्याशी रावजी चे लग्न संपन्न झाले. लहानपणापासून रावजींना अभ्यासाची आवड होती पण दारिद्र्यामुळे त्यांचे ते स्वप्न पूर्ण झाले नाही जसजसे दिवस निघत होते रावजी आपल्या मित्र मंडळी बरोबर बसून शिकण्याचा प्रयत्न करत होते श्रावणात ते श्री काळोबा मंदिरात ग्रंथ वाचायला जात असे रामविजय हरी विजय शिवलीलामृत भक्त विजय अशा विविध ग्रंथांचे वाचन श्रवण करायला ते जात असत. [२]

एके रात्री रावजींना स्वप्नदृष्टांत झाला त्यांच्या स्वप्नामध्ये त्यांचे वडील आणखी दोन सदपुरुष येऊन त्यांना सद्गुरुला शरण जाण्याची आज्ञा केली आणि मठाचे अपुरे काम पूर्ण कर असा संदेश मिळाल्यानंतर रावजींच्या मनात उत्सुकता निर्माण झाली एक दिवस परम पूज्य श्री सद्गुरु आत्माराम महाराजांचे ज्ञानाधिकारी शिष्य तसेच वडिलांचे गुरुबंधू  प.पू. श्री दत्ता बीटये गोवेकर महाराज हे गुडे शिवली येथेच राहणारे त्यांचे व रावजी यांची भेट झाली त्यानंतर रावजी सद्गुरु दत्त महाराज यांना अनन्य श्रद्धा भावांने शरण गेले असताना त्यांनी रावजींना अनुग्रह मंत्र दीक्षा, आशीर्वाद दिला.

माळणे इथे श्री दत्ता महाराजांनी रावजी यांचे नाव जीवनमुक्त महाराज असे नामकरण केले व स्वतः ते वृद्ध असल्यामुळे समाधी सुखात निमग्न राहू लागले. मठातील उत्सवासाठी खाकेला झोळी लावून भिक्षा मागत जीवनमुक्त महाराज फिरत असे त्या काळात भिक्षा म्हणजे तांदूळ नारळ किंवा पैसे अशा स्वरूपाची होती. भिक्षेला फिरताना कधी कधी त्यांना भिक्षाही मिळत नसेल कधीकधी तर लोक त्यांना अपमानित

करीत तर कधी त्यात येत असलेले पाहून दरवाजा बंद करी पण जीवनमुक्त महाराजांनी आपले कर्म सोडले नाही. त्यांनी सद्गुरु मठात उत्सवासाठी येण्याबद्दल ते लोकांना विनंती करू लागले हळूहळू मठाची माहिती सर्वापर्यंत पोहोचू लागली व लोक पूर्वीपेक्षा दुपट्टपटीने दान वगैरे देऊन मठाच्या उत्सवात सामील होऊ लागले. सद्गुरु दत्त महाराजांच्या नंतर श्री सद्गुरु जीवनमुक्त महाराज यांची निवड मठाधिपती म्हणून झाली बराच काळ त्यांनी माळणे मठात वास्तव केली अनेक भाविकांना साधकांना मंत्र दीक्षा देऊन त्यांनी संप्रदायाचा विस्तार केला.[३]

त्याकाळी गोमंतकावर पोर्तुगीजांची राजसत्ता असल्याने जीवन मुक्त महाराजांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेऊन देशभक्ती करण्याचे एक पुण्य काम केले. पोर्तुगीजांची जुलूमशाही जास्तच वाढल्यामुळे गावागावातून स्वातंत्र्य सैनिक निर्माण होऊ लागले. त्या स्वातंत्र्यसैनिकांना सहाय्यक करण्याचे कार्य जीवन मुक्त महाराज करीत होते भिक्षेसाठी फिरत असताना लोकांनी ना पत्रके वाटणे जनजागृती करणे असे विविध संदेश ते समाजामध्ये पेरत होते. एक दिवस असेच ते भिंती पत्रके लावीत असताना पोलिसांनी त्यांना अटक करून तुरुंगात टाकले होते परंतु अपेक्षित पत्रके साहित्य त्यांच्याकडे मिळाले नाही म्हणून त्यांना सोडून देण्यात आले होते.

पूर्वी गुडे शिवोली येथे प्रथा म्हणून दर वर्षी काही देवस्थनाजवल कोंबडे व बकरे मारले जात असत. जीवन मुक्त महाराजांनी अशा या निर्दयी आणि आसुरी काम बंद करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. ग्रामस्थांच्या लोकांच्या प्रथा परंपरेमुळे जर दरवर्षी कोंबड्या किंवा बकऱ्याची बली दिली नाही तर देवाचा खूप होणार अशी त्यांची समजूत होती तेच जीवन मुक्त महाराजांनी आषाढ महिन्यातील बुधवार व रविवार या दिवशी मोदक व तत्सम पदार्थ देवाला उपहार म्हणून अर्पण करण्याची सात्विक प्रथा सुरू केली अंधश्रद्धेचे निर्मूलन करून श्रद्धेचा पुरस्कार करणारी जीवन मुक्त  महाराज. त्याचबरोबरच पोर्तुगीजांनी हिंदूंचे सण उत्सव बंद पाडले होते. तेच जीवन मुक्त महाराजांनी धर्मावर आलेल्या संकटाची क्रांतिकारी धर्मगुरूंची रूप धारण करून गुढीपाडव्याच्या दिवशी गुढी शिवली येथे १९५४ साली होमकुंड उत्सव सुरू करून पोर्तुगीजांच्या प्रश्नाला प्रत्युत्तर दिले. 'ॐ क्रांती, क्रांती, क्रांती'  असा संदेश देऊन पोर्तुगीजांनी लादलेले उत्सव बंदी धुडकावली देवभक्ती देशभक्ती यातून व्यसनमुक्ती घडवले. गोवा मुक्ती लढ्यात सहाय्य केले'[४].

स्वातंत्र्यसैनिक 'बाळा मापारी' व 'मोहन रानडे' यांचा हत्यारा कॉजमेरो मोंतेरो या पोर्तुगीज अधिकारी आपली फौज घेऊन बाबांना अटक करण्यास आला परंतु त्यादिवशी होमकुंड उत्सव सुरू असल्याने शिवोलीतील ग्रामस्थांनी लोकांचा ढोल ताशे वाजवून, हर हर महादेवांच्या घोषात उत्सव सादर करणाऱ्या लोकांचा रौद्ररूप पाहून त्यांनी महाराजांना अटक करण्याचा विचार सोडून दिला.[५] आजही शिवली येथे गुढीपाडव्याच्या दिवशी होमकुंड उत्सव सादर करतात.

जीवनमुक्त महाराजांनी भारताच्या विविध तीर्थक्षेत्रामध्ये भ्रमण करून त्यांची भेट घेतली. उदाहरणार्थ जगन्नाथ पुरी, द्वारका, रामेश्वर व बद्रीनाथ अशा या चार धामांचे तीर्थक्षेत्रिय पर्यटन महाराजांनी केले. त्याचबरोबर अयोध्या, मथुरा, हरिद्वार, काशी, मल्लिकार्जुन, उज्जयिनी, नागनाथ, त्र्यंबकेश्वर, केदारनाथ, घृष्णेश्वर, भीमाशंकर, सोमनाथ, ओमकार, अमलेश्वर, शनि शिंगणापूर, आळंदी, देहू, सज्जनगड, पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, नाशिक, शेंगाव, गोकर्ण सूर्य मंदिर अशा विविध तीर्थक्षेत्रामध्ये जाऊन जीवन मुक्त महाराजांनी तीर्थ पर्यटन केलेले दिसते.[६] असे समाज सुधारण्याचे, जन उद्बोधन कार्य करत करत इ. स. १९८४ साली जीवनमुक्त महाराजांचे निर्वाण होऊन महाराज पांचतत्वात विलीन झाले.

## ६.२ सद्गुरु जीवनमुक्त महाराज यांची अभंग रचना

पोर्तुगीज हे गोमंतकामध्ये व्यवसायाच्या निमित्ताने आले असता पण त्यांचा हेतू हा धर्म प्रसारणाचा धर्मांतराचा होता आपली राजसत्ता गोमंत कावर लादण्याचा प्रयत्न केला आणि त्यातून गोमंतक यांचा जीवन श्वास घुसमटू लागला त्यावेळेस लोकांना परकीय सत्तेपासून मुक्त करण्यासाठी जीवन मुक्त महाराजांनी लढा उठविला शस्त्राने नव्हे तर शब्दांच्या क्रांतीतून जीवनमुक्त महाराजांनी पोर्तुगीज सत्तेला आव्हान दिलेले दिसून येते. जीवनमुक्त महाराजांचे सामाजिक कार्य हे अतिशय महत्त्वाची ठरते त्या सामाजिक कार्यातून जीवन मुक्त महाराजाकडून जी अभंग रचना झाली ती अभंग रचना म्हणण्यापेक्षा ते तत्कालीन गोमंतकीयांचे अंत:स्वर आहे असे त्या अभंगांना म्हणता येईल.

१५६५ मध्ये मडगाव येथे श्री दामोदराचे असलेले मूळ देवस्थान पोर्तुगीज आक्रमणामुळे व बाटाबाटीच्या काळात माडगावचे मूळ  दामोदराचे मंदिर उध्वस्त करण्यात आले म्हणून दामोदर देवाला १५६७  मधे भाविकांनी जांबावली येथे स्थलांतर केले. यावरून जीवनमुक्त महाराजांचा एक अभंग खलीलप्रमाणे.

**या कलिच्या युगांत ॥अवतरला दामोदर देव ॥१॥**

**जाणूनी भक्त चे मानस ॥ आला असे मडगांवांत ॥२॥**

**झाला धर्मांतरी फेरा ॥ जाता झालो जांबावलीला ॥३॥**

**जे भक्त येती तव दर्शनास ॥ त्यांचे मनोरथ पुरवित ॥४॥**

**तो असे भक्ताचा कैवारी ॥ सर्व विघ्ने तो निवारी ॥५॥**

**चला भेटू दामोदरास ॥ सांगत से जीवनमुक्त ॥६॥** [७]

अशा अभंग रचनातून जीवनमुक्त महाराजांनी पोर्तुगीजांनी केलेल्या धर्मांतरामुळे श्री दामोदर देवाला माडगावाहून स्थलांतर होऊन  जांबावली येथे यावे लागले. पोर्तुगीज सत्तेमुळे इतक्या वाईट परिस्थितीतून गोमांतकांना प्रवास करावा लागला असे हे जीवन मुक्त महाराजांचे अभंग तत्कालीन गोमंतकीयांच्या जीवनाचे चित्राण करताना दिसतात.

**दामोदर देव साचा ॥ अवतार असे हा शिवाचा ॥१॥**

**आला असे मृत्युलोकीं ॥ तो हा भक्तांचा कैवारीचा ॥२॥**

**चला भेटू त्या देवाला ॥ देव असे हो तो भावाचा ॥३॥**

**जीवनमुक्त सांगे लोका ॥ चालक ईश्वर सकलांचा ॥४॥** [८]

जीवनमुक्त महाराजांचा कुलदेव श्री दामोदर होता त्यामुळे दामोदरला पूर्ण श्रद्धेने यांच्या भेटीस जाण्यास जीवनमुक्त महाराज जनता जनार्दनाना वरील अभंगातून उदबोधन करतात.

नेताजी सुभाषचंद्र बोससारख्या क्रांतिवीरांचा त्याग आणि बलिदानामुळे आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त झाले. त्यांच्यामुळेच आपण प्रजासत्ताक दिन साजरा करू शकलो. मतदानाचा हक्क आपल्याला प्राप्त झाला. अशा विविध सामाजिक कार्यक्षेत्रामध्ये सुभाषचंद्र बोस सहाय्य लाभले अशा सामाजिक कर्त्यांचा गौरव जीवनमुक्त महाराजांनी आपल्या अभंगातून केलेला आहे. उदाहरणार्थ

**सुभाष वीर तो भला ॥ ज्याने क्रांती योग केला ॥१॥**

**धन्य धन्य तो नेताजी वीर ॥ केवळ क्षत्रिय अवतार ॥२॥**

**भारतासी करितसे माह्य ॥ अधर्मासी वाटतो हा भय ॥३॥**

**धर्माचा तो सदा साह्यकारी ॥ जीवन्मुक्त आठवी अंतरी ॥ ४ ॥** [९]

स्वातंत्र्यसैनिक 'बाळा राया मापारी' व 'मोहन रानडे' यांची हत्या पोर्तुगीज अधिकारी कॉज्मेरो मोंतेरो यांनी केली अशा वीर गोमंत सुपुत्रांनी आपले प्राण या भारत भूमिसाठी अर्पण केले यांचा गौरव, सन्मान करणारा जीवनमुक्त महाराजांचा हा अभंग आहे.

**धन्य धन्य ते मर्द तरुण ॥ मातृभुमीसाठीं दिला प्राण ॥१॥**

**भारतभुमी आमुची माता ॥ तिच्यासाठीं झटू आम्हीं आता ॥२॥**

**शेतकऱ्यांचा पाठिंबा मोठा ॥ इनामदारांचा मोठा ताठा ॥३॥**

**जीवनमुक्त सांगे लोकां ॥ मातृभुमीसी विसरू नका ॥४॥** [१०]

जीवनमुक्त महाराजांचे काही देवावरचेही अभंग आहे. उदाहरणार्थ श्री दत्ताचे, श्री सरस्वती देवीचे, श्री गणपतीचे अशा भंगारचनेतून त्यांनी ईश्वराची स्तुती केलेली दिसून येते. त्याचबरोबर त्यांचे वर्णन करून त्यांचा गुणगानही गायलेला दिसतो.

**ॐ नमो मुळ गणराया ॥ आधीं नमन तुझ्या पाया ॥१॥**

**सकल जगाच्या तुची इशा ॥ मती देई मज गुणराया ॥२॥**

**सिध्दी बुध्दीचा तुची दाता ॥ येऊनी राही ह्रदयीं माझ्या ॥३॥**

**जीवनमुक्त देवा दास तुझा ॥ लागतसे तव पायां ॥४॥** [११]

किंवा

**आदिमाते सरस्वती ॥ गुण गाया दे मज मती ॥ १॥**

**मुनीजन तुजला ध्याती ॥ सकल जनाची तुची शक्ती ॥२॥**

**मुढ तेही पंडित होती ॥ नित्य करितां तुझी भक्ती ॥३॥**

**जीवनमुक्त विनवी तुजसी ॥ बैस मझ्या जीव्हेवरती ॥४॥** [१२]

अशा मधुर, सरळ, सोप्या शब्दात जीवनमुक्त महाराजांनी ईश्वर स्तुती केलेली दिसून येते.

### ६.३ समारोप

गोमंतकीय सद्गुरु परम पूज्य श्री जीवनमुक्त महाराज यांच्या जीवन परिचयाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात झालेला आहे. त्याचबरोबर जीवनमुक्त महाराजांनी विविध विषयावर उदाहरणार्थ स्वातंत्र्य सैनिकांना प्राप्त झालेले हैतात्म्य, वीर पुरुषांनी केलेले गौरवास्पद कार्य, पोर्तुगीजांच्या राजवटीमुळे गोमंतकावर ओढलेले अंधकाचे काळे घन. त्याचबरोबर देवभक्तीतून देशभक्तीला प्राधान्य देऊन जनता जनार्दनामध्ये उदबोधन करणे अशा विविध विषयावर जीवनमुक्त महाराजांनी अभंग रचना केलेली दिसून येते. त्यांचाही

इकडे यथायोग्यपणे अभ्यास झालेला आहे. गोमंतकीयांचे अंतःस्वर मांडून त्यातून परकीय सत्तेचे नृसंश अत्याचारांना विरोध करणारे जीवनमुक्त महाराज हे तत्कालीन गोमंतकीयांच्या जीवनाचे चित्रण करताना दिसतात.

## ६.४ निष्कर्श

१.) जीवनमुक्त महाराजांनी देवभक्ती बरोबरही देशभक्ती करण्यासाठी समाजातल्या लोकांना उद्बोधन केलेले दिसून येते.

२.) जीवनमुक्त महाराज यांची अभंग रचना ही पोर्तुगीजांच्या आक्रमणानंतर झालेल्या उध्वस्तचे चित्रण करणारी आहे.

३.) कॉज्मेरो मोंतेरो या खलनायकाच्या उपस्थितीतही जीवन मुक्त महाराजांनी समाज सुधारण्याचे कार्य केलेले दिसून येते.

४.) जीवनमुक्त महाराज यांच्या अभंग रचना मधून प्रकट होणाऱ्या गोमंतक हा त्या काळाच्या वास्तवाचे दर्शन घडविणारा गोमंतक आहे.

५.) पोर्तुगीज राजसत्तेला प्रत्युत्तर म्हणून जीवनमुक्त महाराजांनी १९५२ साली पेटवलेले होमकुंड हे त्यांच्या धाडसीवृत्तीचे दर्शन घडवते.

## ६.५ संदर्भ सूची

१.) सद्गुरु जीवनमुक्त महाराज, गौरव ग्रंथ, (संपा), प्रा. विनय मडगावकर, भक्तिमार्ग साधन संस्था, शिवोली, गोवा, पृष्ठ क्र. २६

२.) सद्गुरु जीवनमुक्त महाराज, गौरव ग्रंथ, (संपा), प्रा. विनय मडगावकर, भक्तिमार्ग साधन संस्था, शिवोली, गोवा, पृष्ठ क्र. २७

३.) सद्गुरु जीवनमुक्त महाराज, गौरव ग्रंथ, (संपा), प्रा. विनय मडगावकर, भक्तिमार्ग साधन संस्था, शिवोली, गोवा, पृष्ठ क्र. २८ - २९

४.) देशभक्त कोश, संकलन, चंद्रकांत शहासने, बहुजन साहित्यधारा, पुणे, प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१२, पृष्ठ क्र. ८१३

५.) सद्गुरु जीवनमुक्त महाराज, गौरव ग्रंथ, (संपा), प्रा. विनय मडगावकर, भक्तिमार्ग साधन संस्था, शिवोली, गोवा, पृष्ठ क्र. ३०

६.) सद्गुरु जीवनमुक्त महाराज, गौरव ग्रंथ, (संपा), प्रा. विनय मडगावकर, भक्तिमार्ग साधन संस्था, शिवोली, गोवा, पृष्ठ क्र. ३१

७.) आधार ग्रंथ, अभंग भजनावली, सद्गुरू जीवनमुक्त महाराज.

८.) आधार ग्रंथ, अभंग भजनावली, सद्गुरू जीवनमुक्त महाराज.

९.) आधार ग्रंथ, अभंग भजनावली, सद्गुरू जीवनमुक्त महाराज.

१०.) आधार ग्रंथ,अभंग भजनावली, सद्गुरू जीवनमुक्त महाराज.

११.) आधार ग्रंथ, अभंग भजनावली, सद्गुरूजीवनमुक्त महाराज.

१२.) आधार ग्रंथ, अभंग भजनावली, सद्गुरू जीवनमुक्त महाराज.

**७.१ समारोप**......................................................................................................141

**७.२ निष्कर्ष**......................................................................................................143

# प्रकरण सातवे

# समारोप व निष्कर्ष

## ७.१ समारोप

संत साहित्यामध्ये भक्ती अध्यात्म आणि तत्वज्ञान अशा त्रिसूत्री संगमाचा समन्वय साधला जातो. संत हे जणू देवाचेच दूत असल्याचे आपण मानतो किंबहुना आजतागायत जितकी आपण देवावर श्रद्धा ठेवतो यापलीकडे जाऊन जशी आपण देवाची पूजा करतो तशी पूजा आपण संतांचीही करतो कारण संत हे एकप्रकारे सत्पुरूष असल्याचे आपण मानतो. त्यांनी जे अभंग, पदे, ग्रंथ रचले त्यांच्या या साहित्याचे वाचन करून आम्हाला चैतन्यानुभूती प्राप्त होते. त्यातून आपल्याला सतमार्गाची व फलश्रुतीची प्राप्

संत साहित्याची परंपरा' असे शीर्षक पहिल्या प्रकरणाला देण्यात आलेले आहे. या प्रकरणातर्गत संत या शब्दाची व्युत्पत्ती व व्याख्या संत या शब्दाचा अर्थ आणि संतिया शब्दाचा अर्थ संतांनी आपल्या अभंगातून कसा मांडलेला आहे व कोणा करिता मांडलेला आहे याचा अभ्यास झालेला आहे

संत या शब्दाची अभ्यासकांनी केलेली व्याख्या त्याचबरोबर भारतीय संत साहित्याची परंपरा याचाही अभ्यास झालेला आहे गोमंतक व गोवा या शब्दांच्या व्युत्पत्ती  व अर्थ गोमंतकीय मराठी संत साहित्य परंपरा या उपविषयातर्गत गोमंतकात उदयास आलेल्या विविध संत कवींची ओळख करून देण्यात आलेली आहे अशा विषयांनी पहिल्या प्रकरणाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये गोमांतकातील पाच संतांचा 'संत सोहिरोबानाथ आंबिये, संत कृष्णभट्ट बांदकर, संत कवयित्री सोंसूबाई सावर्डेकर, संत पूर्णप्रकाशानंदनाथ तथा नायकस्वामी, सद्गुरु जीवनमुक्त महाराज' अशा या पाच संतांच्या जीवन परिचयाचा त्यांची अभंग रचना पद रचना ग्रंथ रचना इत्यादी साहित्याचा यथायोग्य अभ्यास झालेला आहे.

'गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये यांचे जीवनचरित्र आणि साहित्यसंपदा' या दुसऱ्या प्रकरणातर्गत सोहिरोबानाथांचे  जीवनचरित्राचा अभ्यास केलेला आहे संत सोहिरोबानाथांनी मराठी भाषेला

आणि एकूणच या गोमांतभूमीला दिलेले योगदान याचाही परामर्श प्रस्तुत प्रकरणात घेतलेला आहे. सोहिरोबानाथांची ग्रंथरचना सिद्धांत संहिता, अद्वयानंद, अक्षयबोध, श्रीमहदनुभवेश्वरी, पूर्णाक्षरी व देहदुर्ग बखर या ग्रंथांचा अभ्यास झालेला आहे. त्यांची रचना उपदेशपर पदे, वेदान्तपर पदे, तत्त्वज्ञानपर पदे, रामकृष्ण अवतारलीलावर्णनपर पदे, सद्गुरूविषयक पदे या त्यांच्या विविधांगी स्वरूपाच्या पदांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात झालेला आहे.

‘कृष्णाभट्ट बांदकर यांची नाट्य व काव्यसंपदा यांचा विवेचक अभ्यास’ असा तिसऱ्या प्रकरणाचा विषय असून त्यामध्ये बांदकारांच्या जीवनचरित्राचा अभ्यास केलेला असून बांदकारांची व अण्णासाहेब किर्लोसकर या दोघांच्या नाटकाबद्दल असलेले मतभेद आणि किर्लोसकरांची आणि बांदकारांची भेट डोंगरी येथे झालेली होती. याविषयी विवेचन करण्यात आलेली आहे. संत कृष्णाभट्ट बांदेकर यांचे एकमेव उपलब्ध असलेले अहिल्योउद्धार या नाटकाचा अभ्यास त्याचबरोबर स्वातमतत्वामृत शतक हा ग्रंथ आणि बांदेकरांची अभंग रचना यावर अभ्यास दुसऱ्या प्रकरणात झालेला आहे.

चौथ्या प्रकरणाचा विषय ‘गोमंतकीय संत कवयित्री सोंसूबाई सावर्डेकर यांच्या अभंगांचा अभ्यास’ असा असून सोंसूबाईंची उपलब्ध असलेली माहिती प्रस्तुत प्रकरणात देण्यात आलेली आहे. सोंसूबाईंचा ‘अभंग कुसुमावली’ ह्या ग्रंथाचा परिचय आणि सोंसूबाईंची अभंग रचना यावर विवेचक अभ्यास झालेला आहे. श्रीकृष्णाचे अभंग, श्रीरामाचे अभंग, श्री शंकराचे अभंग, ईशस्तुतीपर संकीर्ण अभंग व अभंग मनाचे अशा विविध विषयावर रचलेल्या अभंगांचा अभ्यास या प्रकरणात झालेला आहे.

पाचवे प्रकरण हे ‘गोमंतकीय संत कवी पूर्णप्रकाशानंदनाथ तथा नायकस्वामी यांच्या झुलवे या काव्याचा अभ्यास’ या विषयावर अवलंबून आहे. या विषयांतर्गत नायक स्वामी यांचे कुलदैवत श्री मंगेशाचा व मंगेशी चा इतिहास थोडक्यात सांगण्यात आलेला असून नायक स्वामी यांचा परिचय करून देण्यात आलेला आहे नायक स्वामींची ग्रंथरचना यावर अभ्यास झालेला असून मंगेशी येथे सादर होणारे झुलवे या उप विषयांतर्गत झुलवे या साधनाचा परिचय करून दिलेला आहे. त्याचबरोबर झुलवे या काव्याचे विश्लेषण करून या प्रकरणाचा शेवट झालेला आहे.

प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये सहावे प्रकरण हे ‘सद्गुरु जीवनमुक्त महाराज यांच्या अभंगांचा परामर्श’ असा विषय असून सद्गुरु जीवनमुक्त महाराज यांचा जीवन परिचय करून देण्यात आलेला आहे सद्गुरु जीवनमुक्त महाराज यांची अभंग रचना यावर अभ्यास सहाव्या प्रकरणात झालेला आहे.

**‘गोमंतकीय मराठी संत साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास’** या प्रबांधिकेचे निष्कर्ष पुढीप्रमाणे नोंदवता येईल :

## ७.२ निष्कर्ष

१. भारतात जशी संत साहित्याची परंपरा खूप प्राचीन आहे तशीच संत साहित्याची परंपरा गोमंतकातही प्राचीन असलेली दिसून येते.

२. संत साहित्यामध्ये प्रामुख्याने भक्ती, अध्यात्म व तत्त्वज्ञान या तिघांचा समन्वय साधलेला असतो.

३. ‘संत’ हा शब्द संस्कृत धातूपासून बनलेला आहे. संत हा शब्द अस्तित्व दर्शक आहे. जी सदैव एकसर व अविकृत रूपात आढळते अशी वस्तू किंवा सत्य या शब्दाच्या अर्थी सत् या शब्दाचा उल्लेख सापडतो.

४. भारतीय सांतांच्या अभंगातून संत या शब्दाचा अर्थ स्पष्ट होतो.

५. संत हे निष्पाप, सदाचारी, परोपकारी असे कितीतरी गुण संतांच्या बाबतीत सांगता येते.

६. भारतीय संतांचा अभ्यास आजवर विविध आयामांनी झालेला आहे. त्यातुलनेत गोमंतकीय संत साहित्याचा अभ्यास होणे अपेक्षित आहे.

७. प्राचीन काळापासून इतर देशांप्रमाणे भारत देश तथा गोमंतक प्रदेश हे अस्तित्वात असल्याचे समजते.

८. महाराष्ट्रातील संत आणि संप्रदायाचा प्रभाव गोमंतकीय संतावर होता.

९. संत सोहिरोबानाथ हे नाथसंप्रदायी संतकवी असल्याने त्यांची भक्ती ही निर्गुण आहे.

१०. सोहिरोबानाथांचे हिंदी, कोकणी, मराठी व संस्कृत भाषेवरही कमालीचे प्रभुत्व होते.

११.सोहिरोबानाथांनी आध्यात्मिक व तत्त्वज्ञान या विषयांवर विपुल लेखन केले.

१२.संत सोहिरोबानाथांचे साहित्य हे संख्यात्मक तथा गुणात्मक दृष्ट्या अतिशय श्रेष्ठोत्तम स्वरूपाचे आहे.

१३.सोहिरोबानाथांचे सिद्धांतसंहिता, अव्दयानंद, अक्षयबोध, श्रीमहदनुभवेश्वरी व  पूर्णाक्षरी हे पाच ग्रंथ आध्यात्मिक व तत्त्वज्ञानाचा विस्तार करणारे ग्रंथ आहे.

१४.संत सोहिरोबानाथांचा श्रीमहदनुभवेश्वरी या ग्रंथाचा मुख्य विषय योगशास्त्र हा आहे.

१५.सोहिरोबानाथांच्या उपदेशपर पदातून परखड आणि झणझणीत वाक्य रचनेने समाजातल्या लोकांना, मुमुक्षीकांना उपदेश केलेला आहे.

१६.सोहिरोबानाथांच्या वाणीला कडकडीत वैराग्याची धार लाभलेली आहे.

१७.संत कृष्णभट्ट बांदकर यांनी आपल्या आत्मचरित्रपर पदातून आपले सर्व जीवनचरित्र मांडले आहे.

१८.कृष्णभट्ट बांदकरांनी १८७० साली शुकरंभासंवाद हे नाटक लिहिले तर किर्लोसकरांनी १८८० मध्ये संगीत शाकुंतल हे नाटक लिहिले. बांदकरांचे नाटक हे खुल्या रंगमंचावर सादर झाले नाही त्यांचे नाटक हे गावाच्या चार चौकटीतच राहिले तर त्यांच्या कडून प्रेरणा घेऊन अण्णासाहेब किर्लोसकरांनी आपले नाटक हे रंगभूमीवर आणले म्हणून आपण आजवर बांदकरांच्या ऐवजी नाटकाचे जनक म्हणून अण्णासाहेबांचा उल्लेख करतात.

१९.नाटक या साहित्य प्रकाराचा उल्लेख करत असताना अण्णासाहेब किर्लोसकरांच्याही आधी कृष्णभट्ट बांदकरांचे नाव आवर्जून घेणे महत्त्वाचे ठरते.

२०.कृष्णभट्ट बांदकर हे रामभक्त व रामदासी संप्रदायाची  दिक्षा घेतल्यामुळे रामदासी पंथाचा प्रसार, प्रचार करण्यामागे बांदकरांचा खूप मोठे योगदान आहे.

२१.कृष्णभट्ट बांदकर यांचे अहिल्योद्धार ह्या नाटकाचा विषय हा भक्ती, अध्यात्म व तत्त्वज्ञान शिकवीणारा आहे.

२२.श्रीकृष्णभट्ट बांदकारांचा स्वात्मतत्वामृतशतक हा ग्रंथ अध्यात्मिक स्वरूपाची अनुभूती करून देणारा ग्रंथ आहे. अध्यात्म, तत्त्वज्ञान हा या ग्रंथाचा मुख्य गाभा आहे

२३.संत कृष्णभट्ट बांदकारांची अभंग रचना ही राम भक्तीला प्राधान्य देणारी आहे.

२४. बांदकर महाराज हे केवळ कवी, लेखक नव्हते तर ते उत्तम गायकही होते.

२५.बांदकारांची पद रचना ही त्यांच्या जीवनाच्या प्रसंगानुसार येत असताना दिसते.

२६.भक्त आणि भगवंत हे एकच तत्त्व आहे असा एक अलौकिक संबंध सोंसूबाईंच्या अभंगातून प्रकट होताना दिसतो.

२७.भक्ती हा सोसूबाईंच्या अभंगांचा केंद्रबिंदू आहे.

२८.सोंसूबाईंच्या अभंगातून येणारी विविध संदर्भ तत्कालीन जीवनाचे चित्रण करताना दिसतात.

२९.प्रत्यक्ष जीवनात दाहक अनुभव आलले नसले तरीसुद्धा वाट्याला आलेले दुःख आणि लहानपणी वैधव्य आल्यामुळे एकूणच अलौकिक जीवनातून आलेली विफलता यांचे प्रत्यक्ष दर्शन सोंसूबाई आपल्या अभंगातून मांडताना दिसतात.

३०.अल्पशिक्षित असूनही सोंसूबाईंनी अध्यात्म, तत्वज्ञान शिकविणारे अभंग रचले हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते.

३१. सोसूबाईंच्या अभंगातून येणारे विविध संदर्भ हे त्यांच्या व्यक्तिगत जीवनातून येणारे संदर्भ आहे.

३२.संत सोसूबाई यांच्यावर रामदासी संप्रदायाचा प्रभाव असलेला दिसतो.

३३.सोसूबाईंच्या अभंगांची शब्दरचना ही सरळ, साधी, सोपी, मधुर असलेली दिसून येते.

३४.सोसूबाईंच्या वाट्याला लहानपणी आलेले वैधव्य या दुःखाला कवटाळून न बसता त्यांनी ईश्वर भक्तीत सुख शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

३५.नायकस्वामींच्या अंगी लहानपणीपासूनच वैराग्य असलेले दिसून येते काणकोणच्या जंगलात मिळालेल्या सतपुरुषाने त्या वीरागीवृत्तीची जाणिव करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

३६. संत नायकस्वामी यांची झुलवे रे काव्य मंगेशी येथील श्री मंगेशाच्या पालखी समोर म्हणावयाचे भक्तीगीत ईशस्तुतीपर गीत आहे.

३७. नायकस्वामी यांचे झुलवे हे काव्य ईशस्तुतीपरगीत असले तरीसुद्धा त्यातून अध्यात्मिक उपदेश केलेला दिसून येतो.

३८. झुलवे हे भक्तीगीतपर काव्य असले तरीसुद्धा त्याचा उल्लेख शिलालेख, ताम्रपट, शामीपत्र, टाका या साधनांच्या बरोबर एक ऐतिहासिक साधन म्हणून केला जातो.

३९.नायकस्वामी यांची ग्रंथरचना ही साधी, सोपी असलेली दिसून येते.


४०.जीवनमुक्त महाराजांनी देवभक्ती बरोबर देशभक्ती करण्यासाठी समाजातल्या लोकांना प्रवृत्त केलेले दिसून येते.

४१. पोर्तुगीज सत्तेला आव्हान म्हणून १९५२ साली जीवनमुक्त महाराजांनी होम कुंड पेटवले.

४२.सद्गुरु जीवनमुक्त महाराज यांच्या अभंगातून जागृत होणारी देशभक्तीची महानता दिसून येते.

४३. सद्गुरु जीवनमुक्त महाराज वेषाने साधू पण त्यांच्या हृदयात देशभक्तीची तळमळ दिसून येते

४४. पोर्तुगीज सत्तेच्या आक्रमणानंतर गोमंतकाची झालेली विध्वंस यांची प्रत्यक्षीकरण जीवनमुक्त महाराजांच्या अभंगातून प्रकट होताना दिसते.





संत  सोहिरोबानाथ आंबिये यांची चरण पादुका

संत सोहिरोबानाथ आंबिये



संत सोहिरोबानाथांचे निवासस्थान 'पालिये'



संत कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर




संत नायकस्वामी यांची चरण पादुका



श्री मंगेश देवस्थान – मंगेशी



संत नायकस्वामी यांची समाधी





मंगेशीचा इतिहास सांगणारा कोरीवलेख



नायकस्वामी यांचे वंशज  श्री प्रमोद करंडे देसाई



श्री मंगेश



सद्गुरू जीवनमुक्त महाराज



शिवोली येथील होमकुंड

# संदर्भ सूची


१. श्री ज्ञानेश्वर वाक्य आणि कार्य, लेखक नरहर रघुनाथ फाटक, मौज प्रकाशन, प्रथमावृत्ती १९५२

२. काळे, कल्याण, नगरकर, रा.रा. (संपा) संत साहित्य अभ्यासाच्या काही विशा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर १९९२,

३. संत साहित्य आणि दालित संवेदना, संपादक प्राचार्य ग. तु. भगत. चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प्रधामावृत्ती २००३,

४. संत तुकारामांचे निवडक १०० अभंग, संपादक डॉ. श्री. पिंगे, व्हिनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली १९६२

५. सत साहित्य आणि दालित संवेदना, संपादक प्राचार्य रा. तु. भगत, बैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प्रथामावृत्ती २००३

६. सार्थ दासबोध, संपादक ह. भ. प. कै. ल. रा. पांगारकर, प्रकाशन वरदा बुक्स, पुणे, प्रथामावृत्ती (वरदा बक्स)- १९९६

७. संस्कार- दर्शन, लेखिका मालती वैद्य, सी. पढा देशपांडे, प्रकाशक मालती वैद्य, सौ. पद्या देशपांडे, मैत्रिण प्रकाशन दिन १९८८,

८. गोमंतकीय मराठी वाङ्गयाचा इतिहास खंड पहिला, संपावक डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथामावृत्ती २००३,

९. महाभारत मराठी अनुवाद, खंड चौथा, (संपा) डॉ. रा. शं. वाळिंबे, भिष्मपर्व, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणे, प्रथमावृत्ती १९८३

१०.. गोमंत – शरद, संपादक रामदास प्रभु, प्रकाशन गोमंतक साहित्य सेवक मंडळ, पहिली आवृत्ती १९७२,

११.बोरकर, बाळकृष्ण भगवंत, संत सोहिरोबानाथ आंबिये चरित्र व निवडक कविता, स्वामी विवेकनंद सोसायटी प्रकाशन, पणजी, गोवा, प्रथामावृत्ती १८९६

१२.महाजन, भक्ती गोविंद, गोमंतकीय संत कवी सोहिरोबानाथ आंबिये यांच्या साहित्याचा भाषिक व वाङ्मयिन अभ्यास, प्रबंध २०२१,

१३.सातोस्कर, बा. द, गोमंतकीय मराठी साहित्याचे शिल्पकार खंड १, सागर साहित्य प्रकाशन, प्रथमावृत्ती १९७५

१४.सोहिरोबानाथ विरचित श्रीमहवनुभवेश्वरी, गोमंतक मराठी अकादमी प्रकाशन, प्रथमावृत्ती २००५,

१५.प्रा. अडसूळ श्रीकृष्ण, गोमंतकीय साहित्य स्वरूप आणि चिकित्सा, शब्दालय प्रकाशन, प्रथमावृत्ती, २०१६

१६.सद्गुरू जीवनमुक्त महाराज, गौरव ग्रंथ, संपादक प्रा. विनय मडगावकर, भक्तिमार्ग साधन संस्था, शिवोली, गोवा,

१७.श्रीसद्गुरू कृष्ण जगन्नाथभट्ट बांदकर महाराज सचरित्र समग्र कवितासंग्रह, संपादक कृष्ण जगन्नाथ बळी, रामसेवक चित्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती १९३२

१८.बांदकर कृष्णभट्ट, अहिल्योद्धार, संकलन, विजयकुमार नाईक, हंस थिएटर ट्रेनिंग सेंटर, फोंडा, गोवा, प्रकाशन, जून २००५,

१९.मराठी विश्वचरित्र कोश खंड ३, संपादक, श्रीराम पांडुरंग कामत, प्रकाशक, कार्यवाह विश्वचरित्र संशोधन केंद्र, गोवा, प्रकाशन ७ सप्टेंबर २००५

२०.केंकरे काशिनाथ वासुदेव, गोमंतकीय लेखकांच्या मराठी ग्रंथांची सूची, मुंबई मराठी साहित्य संघ, १९६९

२१.भक्तिसहित्य : स्रोत आणि फलश्रुती, संपादक प्रा. डॉ. मच्छिंद्र मालुंजकर, प्रकाशन, दस्ताने रामचंद्र

२२.मुलाखत, प्रमोद करंडे देसाई, फोंडा, प्रियोळ, मंगेशी देवस्थान.

२३.आधार ग्रंथ, अभंग भाजनावली, जीवनमुक्त महाराज.

२४.रुक्मिणीबाई केंकरे, अभंग कुसुमावली (काव्य), संगमोदय प्रिंटिंग प्रेस, सांगे, गोवा, १९२९,